म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक १२५०
दा. क्र.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
नाटक १५४ स. १८६१

ले. परशुरामपंत गोडबोले.

वेणीसंहार नाटक.

१५४
नाटक

नाटक ९५८



# वेणीसंहारनाटक.

आवृत्ति दुसरी.

हा ग्रंथ संस्कृत मूळ ग्रंथावरून

परशुरामपंत गोडबोले

ह्यांनीं

महाराष्ट्र भाषेंत केला,

तो

मेहेरबान दैरेक्तर आफ् पब्लिक इन्स्त्रक्शन्

यांच्या हुकुमावरून


मुंबईंत,

मुंबई समाचार छापखान्यांत छापिला.

१८६१

शके १७८३.

किंमत ~~१२~~ आणे.

समागमाचें काय फळ, नीतीपासून किती सुख, आणि अनीतीपासून किती

# वेणीसंहारनाटक.

## उपोद्घात.

१ ह्या ग्रंथाचें नांव वेणीसंहार नाटक. असें नांव ठेवण्याचें कारण, भीमसेनानें प्रतिज्ञा पूर्वक द्रौपदीच्या वेणीचें संहरण केलें, ह्मणजे वेणी घातली. ही कथा या नाटकांत बांधिली आहे. संहार शब्दाचा मुख्य अर्थ गोळा करणें असा आहे. येथें वेणीसंहार शब्दानें वेणीचे केश सुटून विसकळीत झाले होते ते गोळा करून ह्मणजे जुळून त्यांची वेणी घालणें येथपर्यंत अर्थ समजावा.

२ ह्या नांवाचा मूळ ग्रंथ एका प्राचीन कवीनें संस्कृत भाषेंत रचला आहे. तो फार सुंदर, विद्वानांस मान्य आणि रसिक जनांस प्रिय असा आहे. त्याचें हें भाषांतर महाराष्ट्र भाषेंत केलें आहे. आतां भाषांतर ह्मटलें ह्मणजे शब्दास शब्द बरोबर असावे; परंतु तसें केवळ येथें नाहीं. प्रायः बरोबरी आहे, पण क्वचित् स्थळीं फेरफार केला आहे. कारण कीं, संस्कृत भाषेची रीति निराळी आणि महाराष्ट्र भाषेची रीति निराळी पडते. आणि संस्कृताप्रमाणें शब्दास शब्द लावून भाषांतर केलें असतां तें महाराष्ट्र भाषेच्या रीतीनें सर्वांशीं चांगलें दिसत नाहीं. कोठें कोठें रसभंग होतो. ह्मणून क्वचित्स्थळीं संस्कृतांतील अर्थ घेऊन महाराष्ट्र भाषेच्या रीतीनें लिहावें लागतें.

३ संस्कृत मूळग्रंथ गद्यपद्यात्मक आहे. ह्मणजे त्यांत बहुतेक छंदोबद्ध श्लोक आहेत आणि कांहीं छंदा वांचून मोकळीं वाक्यें आहेत. त्याप्रमाणेंच येथें भाषांतरांत प्रायः गद्यांचे ठिकाणीं गद्यें आणि पद्यांचे ठिकाणीं पद्यें केलीं आहेत. पद्यांमध्यें बहुत करून श्लोक आहेत, क्वचित

गीं केलीं आहेत.

४ संस्कृत भाषेंत प्रौढी, शब्दलालित्य, अर्थगांभीर्य, इत्यादि गुण आहेत, तसे महाराष्ट्र भाषेंत नाहींत; यामुळें आणि कवीच्या आंगीं जे कविता करण्याचे गुण असावे, तेही या कर्त्याच्या आंगीं नाहींत; यामुळे संस्कृतांतल्या प्रमाणें रसपरिपाक उतरला नाहीं. हें सहज विद्वानांच्या समजुतीत येईल. तथापि विद्वानांच्या समागमानें यथामति भाषेला जितकी गोडी आणवली तितकी यानें आणिली आहे असें समजावें. यांत जी उणीव असेल ती पूर्ण करणें हें विद्वानांकडे आहे.

५ मूळग्रंथांत बहुत करून संस्कृतभाषा आणि कोठें कोठें बाळभाषा अशा दोन भाषा आहेत. परंतु या भाषांतरांत एक महाराष्ट्र भाषा मात्र आहे. कोठें कोठें संस्कृत भाषेंतले शब्द घ्यावे लागले ते निरूपाय होऊन घेतले आहेत. तरी त्यांचा अर्थ समजावया जोगा आहे.

६ ह्या ग्रंथाचे मुळाच्या प्रमाणें साहा अंक ह्मणजे साहा भाग आहेत. या ग्रंथांत वीररस आणि करूणारस हे दोन रस मुख्य आहेत इतर रस अंगभूत आहेत.

७ ग्रंथांत ज्या वाक्याच्या दोहींकडे ( ) असे कंस केले आहेत, तीं वाक्यें कवीच्या भाषणांतलीं असें समजावें. आणि नांव लिहून पुढें जीं वाक्यें लिहिलीं आहेत तीं त्या त्या पात्रांचीं वाक्यें होत. पात्र ह्मणजे सभेंत येणारें सोंग. हा नाटक ग्रंथ प्रायः परस्पर संभाषणरूप आहे.

८ हा ग्रंथ करण्याचें कवीला मुख्य प्रयोजन हेंच कीं, न्यायानें वर्तल्याचें कायफळ, अन्यायानें वर्तल्याचें कायफळ, साधूवर ईश्वराची कृपा कशी असती, दुष्टांवर ईश्वराचा कोप कसा होतो. शांति, दया, क्षमा, यांचा परिणाम किती सुखकारक होतो, आणि क्रोध, लोभ, द्वेष, अभिमान यांचा परिणाम किती दुःखकारक होतो; साधुसमागमाचें काय फळ, दुष्ट

समागमाचें काय फळ, नीतीपासून किती सुख, आणि अनीतीपासून किती दुःख इत्यादि सदसत् गोष्टी लोकांस कळाव्या.

९ ह्या नाटकांत जी कथा बांधली आहे ती मुख्य भारत पुराणांतील कौरव पांडव यांच्या युद्धाची आहे. हिला मुख्य आधार भारत. परंतु नाटकाच्या नेमास व रसास अनुकूळ होण्याकरितां किती एक ठिकाणीं कवीनें नव्या गोष्टी कल्पिल्या आहेत.

१० ग्रंथांत जे कठीण शब्द आहेत त्यांचा अर्थ त्या त्या पृष्ठावर खालीं टिपेंत लिहिला आहे.

# पुढील ग्रंथांतील कथाभागांचा अनुक्रम.

## अंकपहिला.

मंगालाचरण.— सूत्रधार येऊन कथेचा प्रस्ताव करतो.— प्रथम भीमसेन आणि सहदेव येतात.— संधि करावयास कौरवांकडे श्रीकृष्णास पाठविलें हें भीमसेनास आवडत नाहीं.— द्रौपदीस खिन्न पाहून खेदाचें कारण तिला भीमसेन विचारतो.— दुर्योधनाची स्त्री भानुमती हिचें भाषण खेदास कारण झालें असें दासीमुखानें भीमास समजतें.— दुर्योधनास मारून त्याच्या रक्तानें भरलेल्या हातांनीं तुझी वेणी घालीन अशी प्रतिज्ञा भीमसेन करतो.— संधि न होतां श्रीकृष्ण परत आला, हें त्यास समजतें.— मग कौरव पांडव यांच्या युद्धास आरंभ होतो.

---

## अंक दुसरा.

अभिमन्यूचा वध ऐकून दुर्योधनास आनंद होतो.—'दुर्योधनाची स्त्री भानुमती दुष्ट स्वप्न पाहिल्यामुळें दुर्योधनास न विचारतां मोठ्या पाहांटेस उठून बागांत जाते.— तिचा शोध करावयास चोपदाराला दुर्योधन पाठवितो.— ती बागांत आहे असें चोपदार त्यास कळवितो.— दुर्योधन भानुमतीच्या भेटीस बागांत जातो.— भानुमती सखीला स्वप्नवृत्तांत सांगते.— त्यांचें संभाषण दुरून दुर्योधन ऐकतो.— दुर्योधनास प्रथम वाईट वाटतें.— मग दुर्योधनाच्या मनांत विपरीत कल्पाना येते.— पुन्हा स्वप्नां-

३८५९

## अंक दुसरा.

सला वृत्तांत समजून दुर्योधन पश्चात्ताप पावतो.— मग भानुमतीचें समाधान दुर्योधन करतो.— वावटळीच्या त्रासानें भानुमतीला तो बंगल्यांत घेऊन जातो.— वाऱ्यानें रथाचा ध्वज मोडल्याचें वर्तमान सेवक येऊन सांगतो.— जयद्रथवधाविषयीं अर्जुनाची प्रतिज्ञा ऐकून जयद्रथाची माता आणि स्त्री ह्या घाबरून दुर्योधनाकडे येतात.— दुर्योधन त्यांस धैर्य देऊन त्यांचें सांत्वन करितो.— मग दुर्योधन आवेशानें समर भूमीकडे निघून जातो.

## अंक तिसरा.

राक्षस आणि राक्षसी येऊन रणांत मेलेल्यांच्या व मरणाऱ्यांच्या कथा सांगतात.— द्रोणाचार्याचा शिरच्छेद धृष्टद्युम्नानें केल्याचें वर्तमान ऐकून भयानें सैन्य पळतें.— द्रोणाचा पुत्र अश्वत्थामा सैन्यास धीर देतो.— बाप मेल्याचें वर्तमान अश्वत्थाम्यास समजतें.— अश्वत्थामा शोक करतो.— कृपाचार्य येऊन त्याचें सांत्वन करतो.— अश्वत्थामा आणि कृपाचार्य दुर्योधनास भेटतात.— अश्वत्थाम्याच्या समक्ष द्रोणाचार्याची निंदा कर्ण करतो.— अश्वत्थामा आणि कर्ण यांचा कलह होतो.— दुर्योधन राजा कर्णाचें आणि कृपाचार्य अश्वत्थाम्याचें निवारण करतात.— अश्वत्थाम्यास सोडून कर्णास सैनापत्यदेण्याचा निश्चय होतो.— अश्वत्थामा त्या रागावर कर्ण मरेपर्यंत शस्त्रधरणार नाहीं अशी प्रतिज्ञा करितो.— दुःशासनास मारण्याविषयीं भीमसेन त्यास गांठतो.— कर्ण व दुर्योधन त्यास सोडवायास जातात.— शेवटीं दुःशासनाचें ऊर फोडून भीमसेन रक्त पितो, आणि त्यास ठार मारतो.

## अंक चवथा.

दुर्योधनराजा शस्त्रघातानें मूर्छित झाल्यामुळें सारथी त्यास रणभूमी-पासून दूर नेतो.— कौरवसैन्य भयानें पळतें, त्यास कृपाचार्य धैर्य देतो.— भीमसेन दुःशासनाचा वध केल्यामुळें उन्मत्त होऊन सर्वांस हाक मारून आ-पलें कर्म सांगतो.— भीमसेनाच्या भयानें दुर्योधनाचा सारथी दुर्योधनास एकीकडे नेतो.— राजा सावध होत नाहीं ह्मणून तो दैवास निंदितो. दुर्यो-धन सावध होऊन दुःशासन मेल्याचें वर्तमान ऐकून शोक करतो.— कर्णा-चा दूत दुर्योधनास शोधितो.— तो दुर्योधनास भेटून कर्णाकडील वर्तमान सांगतो.— कर्णाचा पुत्र आणि अर्जुन या उभयतांचें मोठें युद्ध होतें.— या युद्धांत वृषसेन पडतो.—वृषसेनाचें मरण ऐकून दुर्योधन शोक करतो.— तो दूत कर्णाचा निरोप दुर्योधनास सांगतो.— त्याच दूताबरोबर दुर्योधन कर्णास निरोप सांगून पाठवितो.— धृतराष्ट्र आणि गांधारी उभयतां संज-यास बरोबर घेऊन दुर्योधनाकडे येतात.

---

## अंक पाचवा.

धृतराष्ट्र आणि गांधारी दुर्योधनाचा समाचार घेऊन त्याचें सांत्वन करतात.— दुर्योधन आपणास निंदून घेतो.— धर्म राजाशीं साम करण्या विषयीं माता पितर बोध करतात, परंतु मानी पुत्र दुर्योधन मानीत नाहीं. युद्धांत कर्ण पडल्याचें वर्तमान ऐकून दुर्योधन शोक करतो.— दुर्योधन यु-द्धास जाण्यास निघतो.— धृतराष्ट्र गांधारी त्याचा निषेध करितात.— दुर्यो-धनाला सोधीत भीमसेन आणि अर्जुन येतात.—ते दोघे धृतराष्ट्रास मर्म भे-दक भाषण करून वंदितात.— दुर्योधनाचें आणि भीमार्जुनांचें संभाषण होतें.— इतक्यांत धर्माची आज्ञा ऐकून भीमार्जुन परत जातात.— पित्याच्या वधामुळें क्रुद्ध झालेला अश्वत्थामा येतो.— दुर्योधन आणि अश्वत्थामा यांचें परस्पर उपरोधिक भाषण होतें.— अश्वत्थामा रागानें निघून जातो.

# अंक साहावा.

धर्मराज, द्रौपदी, सेवकजन एकत्र बसून विचार करतात.– धर्मराज दुर्योधनाचा शोध करण्याविषयीं सहदेवास निरोप पाठवितो.– इतक्यांत दुर्योधनाच्या शोध लागल्याचें वर्तमान सांगावयास पांचालक येतो.– त्यास युद्धांतील वर्तमान धर्मराजविचारतो.– भीमाशीं दुर्योधनाचें गदायुद्ध चालू झालें असें तो सांगतो.– ऐकून धर्मराज व द्रौपदी चिंता करतात.– मंगलसमारंभ चालू करण्याविषयीं श्रीकृष्णाचा निरोप पांचालक सांगतो.– इतक्यांत एक मुनिवेषधारी राक्षस येतो.– त्याचें आतिथ्य धर्मराज करतो.– तो राक्षस श्रमून बसतो.– श्रम होण्याचें कारण धर्मराज त्यास विचारतो.– युद्धचमत्कार पाहात समरांगणांत फिरल्यामुळें श्रम झाला असें सांगून अर्जून दुर्योधन यांचे गदायुद्ध चालल्याचें वर्तमान तो सहजांत बोलतो.– तें ऐकून धर्मराजास दुःख होतें.– भीमसेनः पूर्वींच गदायुद्धांत पडला असें त्याच्या मुखावाटे निघतें.— तें ऐकूस धर्मराज व द्रौपदी शोक करतात.— धर्मराज आणि द्रौपदी अग्निप्रवेश करावयास इच्छितात.— उभयतां अंतकाळीं सहदेवास, कुंतीस, आणि अर्जुनास निरोप सांगून पाठवितात.– मृतबांधवांस शेवटली जलांजली देतात.– इतक्यांत दुर्योधनास मारून भीमसेन भयंकर वेषानें द्रौपदीचा शोध करीत येतो.– प्रथम तो दुर्योधन आहे अशी शंका होते.— यामुळें धर्मराज द्रौपदी भय पावून अग्नींत उडी टाकावयास पाहातात.— इतक्यांत भीमसेन जवळ जाऊन त्यांचें निवारण करतो.— भीमसेन कृतकार्य होऊन आला असें पाहून सर्वांस आनंद होतो.— दुर्योधन मारल्याचें वर्तमान सांगून भीमसेन द्रौपदीची वेणी बांधतो.— इतक्यांत श्रीकृष्ण आणि अर्जुन विजय संपादून येतात.— धर्मराज त्यांस भेटतो.– धर्मराज श्रीकृष्णाची स्तुति करतो.– धर्मराजास राज्याभिषेकाचा समारंभ होतो.— श्रीकृष्ण त्यास आशीर्वाद देऊन निघून जातो.

## अंक चवथा.

दुर्योधनराजा शस्त्रघातानें मूर्छित झाल्यामुळें सारथी त्यास रणभूमीपासून दूर नेतो.— कौरवसैन्य भयानें पळतें, त्यास कृपाचार्य धैर्य देतो.— भीमसेन दुःशासनाचा वध केल्यामुळें उन्मत्त होऊन सर्वांस हाक मारून आपलें कर्म सांगतो.— भीमसेनाच्या भयानें दुर्योधनाचा सारथी दुर्योधनास एकीकडे नेतो.— राजा सावध होत नाहीं ह्मणून तो दैवास निंदितो. दुर्योधन सावध होऊन दुःशासन मेल्याचें वर्तमान ऐकून शोक करतो.— कर्णाचा दूत दुर्योधनास शोधितो.—— तो दुर्योधनास भेटून कर्णाकडील वर्तमान सांगतो.—— कर्णाचा पुत्र आणि अर्जुन या उभयतांचें मोठें युद्ध होतें.—— या युद्धांत वृषसेन पडतो.—वृषसेनाचें मरण ऐकून दुर्योधन शोक करतो.— तो दूत कर्णाचा निरोप दुर्योधनास सांगतो.— त्याच दूताबरोबर दुर्योधन कर्णास निरोप सांगून पाठवितो.— धृतराष्ट्र आणि गांधारी उभयतां संजयास बरोबर घेऊन दुर्योधनाकडे येतात.

---

## अंक पाचवा.

धृतराष्ट्र आणि गांधारी दुर्योधनाचा समाचार घेऊन त्याचें सांत्वन करतात.— दुर्योधन आपणास निंदून घेतो.— धर्म राजाशीं साम करण्याविषयीं माता पितर बोध करतात, परंतु मानी पुत्र दुर्योधन मानीत नाहीं. युद्धांत कर्ण पडल्याचें वर्तमान ऐकून दुर्योधन शोक करतो.— दुर्योधन युद्धास जाण्यास निघतो.— धृतराष्ट्र गांधारी त्याचा निषेध करितात.— दुर्योधनाला सोधीत भीमसेन आणि अर्जुन येतात.—ते दोघे धृतराष्ट्रास मर्म भेदक भाषण करून वंदितात.— दुर्योधनाचें आणि भीमार्जुनांचें संभाषण होतें.— इतक्यांत धर्माची आज्ञा ऐकून भीमार्जुन परत जातात.— पित्याच्या वधामुळें क्रुद्ध झालेला अश्वत्थामा येतो.— दुर्योधन आणि अश्वत्थामा यांचें परस्पर उपरोधिक भाषण होतें.— अश्वत्थामा रागानें निघून जातो.

---

# अंक साहावा.

धर्मराज, द्रौपदी, सेवकजन एकत्र बसून विचार करतात.— धर्मराज दुर्योधनाचा शोध करण्याविषयीं सहदेवास निरोप पाठवितो.— इतक्यां दुर्योधनाचा शोध लागल्याचें वर्तमान सांगावयास पांचालक येतो.— त्यास युद्धांतील वर्तमान धर्मराजविचारतो.— भीमाशीं दुर्योधनाचें गदायुद्ध चालू झालें असें तो सांगतो.— ऐकून धर्मराज व द्रौपदी चिंता करतात.— मंगलसमारंभ चालू करण्याविषयीं श्रीकृष्णाचा निरोप पांचालक सांगतो.— इतक्यांत एक मुनिवेषधारी राक्षस येतो.— त्याचें आतिथ्य धर्मराज करतो.— तो राक्षस श्रमून बसतो.— श्रम होण्याचें कारण धर्मराज त्यास विचारतो.— युद्धचमत्कार पाहात समरांगणांत फिरल्यामुळें श्रम झाला असें सांगून अर्जून दुर्योधन यांचे गदायुद्ध चालल्याचें वर्तमान तो सहजांत बोलतो.— तें ऐकून धर्मराजास दुःख होते.— भीमसेन पूर्वींच गदायुद्धांत पडला असें त्याच्या मुखावाटे निघतें.— तें ऐकून धर्मराज व द्रौपदी शोक करतात.— धर्मराज आणि द्रौपदी अग्निप्रवेश करावयास इच्छितात.— उभयतां अंतकाळीं सहदेवास, कुंतीस, आणि अर्जुनास निरोप सांगून पाठवितात.— मृतबांधवांस शेवटली जलांजली देतात.— इतक्यांत दुर्योधनास मारून भीमसेन भयंकर वेषानें द्रौपदीचा शोध करीत येतो.— प्रथम तो दुर्योधन आहे अशी शंका होते.— यामुळें धर्मराज द्रौपदी भय पावून अग्नींत उडी टाकावयास पाहातात.— इतक्यांत भीमसेन जवळ जाऊन त्यांचें निवारण करतो.— भीमसेन कृतकार्य होऊन आला असें पाहून सर्वांस आनंद होतो.— दुर्योधन मारल्याचें वर्तमान सांगून भीमसेन द्रौपदीची वेणी बांधतो.— इतक्यांत श्रीकृष्ण आणि अर्जुन विजय संपादून येतात.— धर्मराज त्यांस भेटतो.— धर्मराज श्रीकृष्णाची स्तुति करतो.— धर्मराजास राज्याभिषेकाचा समारंभ होतो.— श्रीकृष्ण त्यास आशीर्वाद देऊन निघून जातो.

# वेणीसंहारनाटक.

## अंक १

स्थळ,

सेनाशिबिर.

पात्रें.

| | |
|---|---|
| सूत्रधार. | नाटक खेळणारा. |
| पारिपार्श्वक. | त्याचा सोबती. |
| भीमसेन. | धर्माचा धाकटा भाऊ. |
| सहदेव. | त्याचा धाकटा भाऊ. |
| द्रौपदी. | पाडवांची मुख्य स्त्री. |
| दासी, बुद्धिमतिका. | तिची वटीक. |
| कंचुकी, मैत्रेयनामा. | चोबदार धर्माचा. |

३८

# वेणीसंहारनाटक.

## प्रारंभ.

### अंक १.

मंगलाचरण.

आर्या १.

नमितों गजमुख ज्याची करि अनुकंपा जडासही सुकवी ॥
सुकवी विघ्न शतातें दुस्तर संसार सागरा सुकवी ॥ १ ॥

पद २.

विघ्नहराममविघ्नहराया लवकरयेईगजवदना ॥ ध्रुवपद ॥ एकदंतलंबोदरसुंदर रक्तमाल्यरंजितवसना ॥ शूर्पकर्णशुभशुंडामंडित अंबासुतकृतरिपुकदना ॥१॥ चतुर्बाहुचतुराननवंदित चंद्रभालचंचलकर्णा ॥ चिदानंदचिद्रूपचिदंबर चित्तचोरचित्सुखसदना ॥ २ ॥ भक्तकामकल्पद्रुमभासुर भानुकोटिभास्वद्वर्णा ॥ पाशांकुशधरवरदाभयकर खंडितदानवशुभरदना ॥ ३ ॥ विघ्नविनाशनविद्यामयवपु विकटामूषकपतिवहना ॥रंगायेंउनिरंगभरावा आश्रयद्यावायाकवना ॥४॥

पद ३.

पुष्पांजलिहाहरिच्याचरणा वाहिनभावेंकरुनिस्मरणा ॥ ध्रु० ॥ श्यामाजीदिनकरकरशिरती मुकुलत्वाचाभेदीचकरिती ॥ १ ॥ पु० ॥ मकरंदालामधुकर लुटती सुवारितांहातेथुनिनुठती ॥ २ ॥ पु०॥ साधुसभेलामंगलसिद्धी देवोकविलाउत्तमबुद्धी ॥ ३ पु० ॥

---

१ गणपति. २ कृपा. ३ मुराख.

### श्लोक ४.

कालिंदी पुलिनांत केलि[1]कुपिता जी जाहली राधिका ॥
गेली सोडुनि रास[2] माधवजिला[3] मानी शरीराधिका ॥
जातां मागुनियां तिच्या उमटल्या पायींच देतां पदा ॥
जी रोमांचित जाहली हरितनू ती घालवू आपदा[4] ॥ ४ ॥

### श्लोक ५.

रक्षो प्रेमें सतीनें भय धरुनिमनीं पाहिला आसुरांनीं ॥
विष्णूनें विस्मयें जो सकरूण ह्रदयें शांत चित्तीं मुनींनीं ॥
घेऊनी शस्त्र गर्वें अर्जुनि निजवधू संभ्रमा दैत्यवारीं[5] ॥
आनंदें देवतांनीं मयपुर दहनीं आपणा तो पुरारी ॥ ५ ॥

### आर्या ६.

ज्यापासुनि उद्भवलें त्रिजगाचें बीज दिव्य जोनाभी ॥
श्री हरिचा जय पावो देवो आह्मांस नित्य तो नाभी[6] ॥ ६ ॥

### आर्या ७.

जो क्षीरसागरच्या मध्यें शेषावरी करी शयन ॥
तो कृष्ण कृष्ण सागर दुसरा भावोनि शांतवा नयन ॥ ७ ॥

( असें मंगलाचरण झाल्यानंतर )

**सूत्रधार**— ( पुढें येतो ) पुरे पुरे फार कशास पाहिजे. आणखी एवढें मंगल करा ह्मणजे झालें. ( ह्मणतो. )

### आर्या ८.

दीनहितव्यसनी[7] जो विषयीं उदासीन ही असोन मन ॥
जो भारता मृतातें करि त्या व्यासा सदा असो नमन ॥ ८ ॥

---

१ क्रीडाकरितांनारागावली. २ रासक्रीडा. ३ कृष्ण. ४ त्रिविधताप. ५ दैत्यसमुदायानें. ६ अभय. ७ दीनाच्या हितानें व्यसनं ज्याला.

अहो सभा नायकहो, आपणांस माझी थोडी विनंती आहे. कृपा करून ऐकावी.

आर्या १.

बुधहो पुष्पांजलिसा समर्पितों काव्य बंध हा रुचिर ॥
मधुबिंदूंसि मधुपसे[1] विरलहि गुणलेश घ्या तुह्मी सुचिर ॥ १ ॥

तो काव्यबंध कोणता ह्मणाल तर, मृगराज उपनावाचा जो भट्ट नारायण कवि, त्यानें वेणी संहारनामें नाटक रचलें आहे तो. त्याचा प्रयोग (ह्मणजे खेळ) यासभेपुढें करून दाखवावा, असें माझ्या मनांत आहे याजकरितां कवीच्या परिश्रमास्तव, अथवा उत्तम कथेच्या गौरवास्तव, किंवा नवीन नाटकाच्या कौतुकास्तव आपलें सर्वांचें अवधान इकडे असावें. (इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो.) अरे नाटकाचार्या, त्वरा कर त्वरा कर, सिद्धता करण्याविषयीं सर्व खेळ करणाऱ्यांस विदुराच्या आज्ञेनें भालदार सांगत आहेत कीं, वाद्यांची आणि सोंगांची तयारी लौकर करावी कांकीं, कौरव पांडवांचें वैर मोडून भरत कुलाचें हित करावें या हेतूनें उभयतांचा संधि करण्याकरितां देवकीचा पुत्र जो भगवान् श्रीकृष्ण, तो वसिष्ठ, वामदेव, जामदग्न्य, नारदप्रभृति मुनींचा समाज बरोबर घेऊन धर्मराजाचें दूतत्व स्वीकारून दुर्योधनराजाच्या मंदिरास जाण्याकरितां निघाला. त्याचा हा प्रवेशकाळ आहे.

सूत्रधार– (तें ऐकून आनंदानें बोलतो.) वाहवा! काय चांगली गोष्ट झाली! अहो, जगाची उत्पत्ति, स्थिति, संहार, करणारा जो साक्षात् भगवान् श्रीकृष्ण, तो कौरवपांडवांचा पुढें प्रदीप्त होणारा जो युद्धरूप कल्पांतानल त्याची शांति करण्याची इच्छा धरून स्वतां दूत होऊन उभयतांचा संधि करण्यास निघाला. येणेंकरून त्यानें आज भरतकुलावर आणि सर्व राजमंडलावर मोठा अनुग्रह केला असें मला वाटतें.

---

१ भ्रमर.

( पडद्यापलीकडून ) अरे पारिपार्श्वका, अझून तूं आपल्या सोबत्यांस बरोबर घेऊन गाण्यास आरंभ कां करित नाहीस ?

पारिपार्श्वक– ( ऐकून ) बरें तर आरंभ करतों. पण, कोणत्या कालावरचें गाणें गावें बरें ?

सूत्रधार– अरे विचारतोस काय ? ह्याच शरत् कालाविषयींचें गाणें गाऊं लाग. पहा ह्या शरत्कालांत चांदणें, नक्षत्रें, क्रौंचपक्षी, हंसपक्षी सप्तपर्णवृक्षांचीं पांढरीं फुलें, श्वेतकमळें, काशपुष्यांचे पराग ह्या शुभ्र पदार्थांच्या योगानें आकाश आणि दिशामंडळ, हीं किती शुभ्र दिसत आहेत, आणि सरोवरें नद्या ह्यांचीं उदकें किती स्वच्छ आणि मिष्ट झालीं आहेत! तर अशा समयास सोडून दुसऱ्या कोणास गाणार ? आणखी पहा शरदृतूंव चमत्कार.

आर्या १०.

सत्पक्ष मधुरवाणी प्रसाधिताश प्रकाम[1] मद वरिते ॥
हे धार्तराष्ट्र येती कालवशेंकरुनि भूतळावरि ते ॥ १० ॥

पारिपा०– ( सभय होऊन ) अरे बाबा! इडापीडा टळो, अमंगळ पळो.

सूत्रधार०– ( विस्मययुक्त हास्य करून ) मारिषा, तुला कां वाईट वाटलें! अरे शरत्काल वर्णनाच्या प्रसंगीं हंसांस धार्तराष्ट्र ह्मणण्याचा सांप्रदाय आहे. यांत अमंगल तें काय ?

पारिपा०– असो काय असेल तें या तुमच्या बोलण्याचें तात्पर्य, मंगलाविषयीं कीं अमंगला विषयीं मला कळत नाहीं; पण तें ऐकून माझें तर ह्रदय थरथर कांपलें बाबा.

सूत्रधार–० मारिषा, तुला तसें जरीं वाटलें तरी ज्यापक्षीं कंसारिच[2] स्वतां संधि करण्यास प्रवृत्त झाला त्यापक्षीं त्यानें सर्व अमंगल नष्ट केलें असें समज. कसें तें पहा.

---

१ पुष्कळ, २ श्रीकृष्ण.

### ओंव्या ११.

शत्रूचें झालिया शमन[१] ॥ विझोनिजातां वैरदहन[२] ॥
आनंद करोत पांडु नंदन ॥ श्रीकृष्णा समवेत ॥ १ ॥
रक्त प्रसाधित भूमंडळ ॥ क्षत विग्रह होऊनिसकळ ॥
स्वस्छ होवोत कुरुराजबाळ ॥ मित्रभृत्यां समवेत ॥ २ ॥

( पडद्यापलीकडे धिक्कारयुक्त शब्द होतो. )

हा दुष्टा मंगलपाठ करणाऱ्या गायकाच्या लेंका, काय बोलतोस हें ? बोलावयास तुला शंका वाटत नाहीं काय ? अरे.

### ओंव्या १२.

जिहीं लाक्षागृहीं जाळिलें ॥ विषान्न चारुनि जळीं बुडविलें ॥
कपट द्यूतें सर्वस्व लुटिलें ॥ कुरुवृद्धां समक्ष आमचें ॥ १ ॥
जे आमच्या प्राण धनावरी ॥ दरवडा घालूनि भोगिती थोरी ॥
वीर वधूच्या केशांवरीं ॥ हात घालिती ओढावया ॥ २ ॥
ऐसे दुरात्मे अंधकुमार ॥ साधु द्वेष्टे महाचोर ॥
जीवंत असतां भीमवीर ॥ स्वस्छ कैसे होतील ॥ ३ ॥

**सूत्र॰ पारि॰**— ( ऐकून दोघे दचकतात. )

**पारि॰**— काय हो कोण बोलला हें ?

**सूत्र॰**— ( मागें पडद्याकडे पाहून. ) अहो, हा भीमसेन ! श्रीकृष्ण संधि करावयास गेला तें ह्यास आवडलें नाहीं, ह्मणून क्रुद्ध झाला आहे. ह्याचें कपाळ पहा केवढें विस्तीर्णदिसतें; त्यावरील भ्रुकुटी पहा कशा चढून वक्र झाल्या आहेत, जसे काय यमाच्या दरवाज्यावरचे बांधलेले त्रिशूळ; आणि दृष्टि पहा कशी उग्र आहे, कीं जाणो आतां आह्मांसर्वांस गिळून टाकील. असा हा सहदेवास बरोबर घेऊन इकडेसच येत आहे. तर आतां याच्या पुढें उभें राहाणें आप-

१ नाश. २ अग्नि.

णांस बरें नव्हे. याजकरितां चला आपण येथून दुसरे कडे जाऊं.

( असें ह्मणून दोघे निघून जातात. )

( ही पुढील कथेची सूचना झाली. )

( तदनंतर सहदेवा सहवर्तमान क्रुद्ध झालेला भीमसेन येतो. )

**भीमसेन**— हा दुष्टा वृथा मंगलपाठ करणाऱ्या गायकाच्या लेंका. (जिंहीं लाक्षा गृहीं जाळिलें, इत्यादिक पूर्वोक्त ओंव्या ह्मणतो. )

**सहदेव**— दादा शांत व्हा शांत व्हा. तुह्मांस येवढा क्रोध कां आला बरें ? या भरत पुत्राचें वाक्य आपणांस अनुकूळच आहे. कसें ह्मणाल, तर पाहा, शत्रूचें झालियाशमन ही पहिली ओंवी तर यथार्थच आहे. आतां दुसऱ्या ओंवीचा अर्थ, मित्रभृत्यांसहवर्तमान कौरव रुधिरालंकृत भूपृष्टभाग आणि क्षतशरीर असे होत्साते स्वस्छ ह्मणजे स्वर्गस्छ होवोत, असा त्याच्या बोलण्याचा भाव दिसतो.

**भीम०**— छी छी, असें ह्मणू नकोहो. कौरवांचें अनिष्ठ चिंतावयास तुह्मी योग्य नव्हां, कसे झाले तरी ते तुमचे भाऊ होत. त्यांचे अपराध मनांत न आणितां त्यांच्यांशीं तुह्मी संधिच करावा. आँ.—

**सह०**— (सरोष होऊन )दादा काय सांगू ?

**आर्या १३.**

अंध सुतांनीं केले अपराध पदोपदीं मृषा काय ॥
त्वद्भ्राता कोणीही नसाहता जरि न वारिता राय ॥ १३ ॥

**भीम०**— हाँ हाँ असें काय! खरेंच. असो तुमच्या मनांत काय असेल तें. या साठींच मी आज पासून तुह्मांहून निराळा होणार. पहा,

**श्लोक १४.**

माझें वैर त[1]यांसवें शि[2]शुपणा पासूनि जें वाढलें ॥
त्याला कारण आ[3]र्य फा[4]ल्गुन न[5]कीं दोघें तुह्मि ही मुलें ॥

---

१ कौरवांशीं. २ लहानपणापासून. ३ धर्मराज. ४ अर्जुन. ५ नकुलसहदेव.

फाटे आणि जडे जसा उर जरासंधानृपाचा महा ॥

तैसा संधि करा तुह्मीच कुरुंशीं मोडी तसे भीमहा ॥१४॥

**सहदेव**— भीमदादा, असे जेव्हां तुह्मी अतिशयित क्रोधाविष्ट होतां तेव्हां कधीं कधीं धर्मराजालाही खेद होतो. नाहीं असें नाहीं.

**भीम०**— काय ह्मणतोस, धर्मराजाला खेद होतो ? मुला, खेद ह्मणजे काय पदार्थ आहे हें त्याच्या गावीं तरी आहे काय ? पहा,

**श्लोक १५.**

मर्भेमध्यें साध्वी[1] तशि[2] बघुनिया स्वस्थ बसलों ॥

वनीं व्याघ्रांसंगें जरि धरुनि वल्कें[3]हि वसलों ॥

विराटाच्या गेहीं अनुचित[4]हि कर्मे करुंकिरे ॥

तरीया धर्माच्या हृदय भवनीं खेद नशिरे ॥१५॥

तर सहदेवा, आतां जा तूं तिकडे, आणि फार दिवसांपासून अतिशयित वाढलेल्या क्रोधाग्नीनें माझें त्हदय जळत आहे,यासाठीं माझ्या वचनेंकरून धर्मराजाला माझी विनंति सांग.

**सहदेव**— भीमदादा, कोणती विनंती आहे ती ?

**भीम०**— अरे अशी विनंति सांग, कीं,

**ओंव्या १६.**

त्वदाज्ञा लंघन जीवनां ॥ स्पर्श ही सर्वथा नयावा मना ॥

परित्याजीवनीं निमडजना ॥ करोनि मी राहिलों ॥ १ ॥

सत्वधीर माझे अनुज ॥ त्यांमाजि निंदित होईन आज ॥

परि तेंही मानवलें मज ॥ दुःख आतां नसोसवे ॥ २ ॥

मी झालों क्रोधाचे वश ॥ नसुचे कर्त्तव्याकर्त्तव्य लेश ॥

उच्छिन्न करावा धृतराष्ट्रवंश ॥ हें मज मद्गदा सांगतसे ॥ ३ ॥

ह्मणूनियां आजचा दिवस ॥ राया माझा तूं गुरु नव्हेस ॥

मीही तुझा नव्हें दास ॥ हें निश्चयें जाणिजे ॥ ४ ॥

---

१ द्रौपदी. २ ओढलेली. ३ वल्कलें. ४ अयोग्य. ५ उदकास,

(असें बोलून आवेशानें इकडे तिकडे फिरतो.)

सहदेव—(त्याचे मागें मागें चालतो, आणि आपले मनांत ह्मणतो.) अरे! भीमदादातर पांचाळीच्या[1] चौकांत शिरले, हें काय? असो, आतां आपण पुढें जाऊं नये. येथेंच उभें राहावें.

(असें ह्मणून तेथेंच उभा राहातो.)

भीम०— (मागें परतून सहदेवाकडे पाहून) सहदेवा, जा जा तूं धर्मराजाकडे, आणि त्याच्या मर्जी प्रमाणें वाग. मी आयुधगृहांत जाऊन आयुधें घेऊन सज्ज होतों.

सह०— दादा, हें आयुधगृह नव्हे. हा पांचाळीचा चौक.

भीम०— काय हें आयुधगृह नव्हे? हाका पांचाळीचा चौक? (किंचित् हासून) तर मग पांचाळीस भेटून तिला विचारून गेलें पाहिजे. (सहदेवाचा हात धरून) वत्सा तूंच पाहा बरें? हा धर्मराज कौरवांशीं सांधि करण्याची इच्छा धरून आह्मास कसें दुःख देत आहे तें! (दोघे बोलत बोलत चौकांत शिरतात.)

सह०— ही येथें बैठक घातली आहे, हिजवर आपण बसावें, आणि कृष्णागमनाची[2] प्रतीक्षा[3] करावी.

भीम०— वत्सा, कृष्णागमनाची प्रतीक्षा करावी, असें त्वां ह्मटलें यावरून मला कृष्णाचें स्मरण झालें. कीं भगवान् कृष्ण कोणत्या प्रकारानें संधि करण्याकरितां त्या दुर्योधनाकडे पाठविला बरें?

सह०— दादा, पांच गाव मागून.

भीम०— (कानांवर हात ठेवून) हर हर, अजातशत्रु जो धर्मराज त्याजकडे हलकेपणा येतो काय? फार वाईट. ऐकून माझें तर त्हृदय खरेंच कांपलें. (उठून इकडे तिकडे फिरून पुनः येऊन बसतो.) असो, वत्सा, ही गोष्ट त्वां सांगितली नाहीं, आणि म्यां ऐकिलीही नाहीं. अरे,

१ द्रौपदीच्या. २ द्रौपदीच्या आगमनाची. ३ वाट पहावी.

आर्या १७.

ह्या भूपतिच्या आंगीं अत्युग्रक्षात्र तेज जें होतें॥
वाटे द्यूतामध्यें येणें सर्वहि गमाविलें होतें ॥१७॥

(पडद्यापलीकडे शब्द होतो.) बाईसाहेब सावध व्हा सावध व्हा.

सह०— (पडद्याकडे पाहून मनांत ह्मणतो.) अहो हें काय! ही याज्ञसेनी[1] वारंवार डोळ्यांतून अश्रुधारा गाळीत भीमदादाकडे येत आहे. तस्मात् हा प्रसंग मोठा कठीण आला आहे. काय होतें पाहावें.

आर्या १८.

वैद्युत[2] वन्हीस जशी प्रावृट्[3]ताशि हेहि वायको पातें॥
अश्रूंच्या भीमाच्या निश्चयाचि क्षोभवील कोपातें॥१८॥

(इतक्यांत सांगितल्या प्रमाणें द्रौपदी दासिसहवर्त्तमान येते.)

द्रौपदी०— (रडत रडत श्वासोश्वास टाकिते.) अगे काय करूं?

दासी०— बाईसाहेब धीर सोडूं नका. स्वस्थ असा कौरवांशीं बद्धवैर जो युवराज भीमसेन तो तुमचा कोप शांत करील.

द्रौपदी०— अगे, असें घडेल, पण ते जर महाराजांशीं[4] प्रतिकूळ होतील तर.

दासी०— बाईसाहेब, हा युवराज भीमसेन येथेंच बसला आहे पहा. आपण जवळ जावें.

द्रौपदी०— गडे तसेंच करूं आपण. (दोघी कांहीं पुढें जातात.)

दासी— महाराजांचा जयजयकार असो.

भीम०— (कोपावेशानें न ऐकतां) ह्या भूपतिच्या आंगींअत्युग्र क्षात्रतेज जें होतें ॥ वाटेद्यूतामध्यें येणेंसर्वहिगमाविलेंहोतें ॥ (ही पूर्वोक्त आर्या पुनः ह्मणतो.)

दासी— अहो बाईसाहेब. युवराज क्रोधांत आहे असें दिसतें. तो आपणांकडे पाहात नाहीं.

द्रौपदी— अगे असें जर असेल, तर हा अवमान मला आश्वासन देतो असें

---

१ द्रौपदी. २ विजेचा अग्नि. ३ वर्षाकाळें. ४ धर्मराजाशीं. ५ भीमसेन.

मी समजतें. तर आतां आपण येथेंच क्षणभर उभें राहून प्राणनाथ काय बोलतो तें पाहूं बरें !

( असें ह्मणून दोघी तेथेंच उभ्याराहातात. )

भीम०— ( सहदेवाकडे पाहून ) कायरे सहदेवा, पांच गांव घेऊन संधि करावयाचा काय ?

श्लोक १९.

मारीन कौरवशता समरांत शुद्धा ॥
दुःशासना रुचिरानि[1] पीइन मी अशुद्धा ॥
संचूर्णमी करिंनऊरु[2] सुयोधनाचे ॥
संधिकरोचि तुमचा नृप[3]सत्यवाचे ॥ १९ ॥

द्रौपदी— ( हर्ष पावून आपणाशीं बोलते. ) प्राणनाथा, हें असें वचन अश्रुतपूर्व आहे; मला फार आवडलें. पुनः ह्मण, मला ऐकूंदे आणखी.

भीम०— ( कोपानें न ऐकलेंसें करून, "मारींनकौरवशता" हा श्लोक पुनः ह्मणतो )

सह०— भीमदादा, आपल्या महाराजांचा निरोप काय निरर्थक वाटला ?

भीम०— अरे कशाचा अर्थ आणि कशाचा स्वार्थ.

सह०— असें कां ह्मणतां ? महाराजांनीं त्याला निरोप पाठविला आहे.

भीम०— कोणाला ?

सह०— दुर्योधनाला.

भीम०— कसा निरोप तो बोल पाहूं.

सह०— निरोप असा पाठविला आहे कीं,

श्लोक २०.

इंद्रप्रस्थ वृकप्रस्थ जयंती वारणावती ॥
दे हे मला चारगांवें कांहीं आणिक पांचवें ॥ २० ॥

भीम०— अँः यांत काय आहे ?

---

१ रक्त. २ मांड्या. ३ धर्मराज.

**सह०**– यांत इतकेंच आहे कीं, चार गांव मागितले त्यांचीं नांवें तर बोलून दाखविलींच. पांचवें काहीं ह्मणून जें मोघम ठेविलें, यावरून विषभोजन, लाक्षागृहदहन, कपटद्युत, सभेंत अपमान, इत्यादि जे अपराध त्यानें केले ते त्याच्या मनास लागावे. हाच याचा अभिप्राय असें मला वाटतें.

**भीम०**– (क्रोधयुक्त होऊन.) वत्सा, असें करून केलें काय ?

**सह०**– दादा, केलें इतकेंच कीं, लोकांमध्यें अपकीर्ति आणि स्वकुलाचा क्षय ह्या दोन गोष्टी नव्हाव्या असें जें मनांत होतें तें उघड केलें, आणि कौरवांशीं संधि करणें अयोग्य हें ही दर्शविलें.

**भीम०**– हें पोकळ बोलणें. यांत कांहीं जीव नाहीं. अरे कौरवांशीं संधि करणें अयोग्य हें तर तेव्हांच ठरलें आहे, जेव्हां त्यांनीं आह्मांस वनांत घालविलें, आणि आह्मीं सर्वांनीं कुरुकुलाच्या नाशाविषयीं प्रतिज्ञा केली. आणखी विचारतों, कायरे सहदेवा,– कुरुकुलाचा क्षय तुह्मांस लोकांमध्यें लज्जाप्रद आहे काय ? आहारे मूर्खहो.

### श्लोक २१.

तुह्मां लाजवितो भारी लोकीं शत्रुकुलक्षय ॥
नलाजवि सभेमध्यें दारांचें[1] केशकर्षण ॥ २१ ॥

**द्रौपदी०**– (आपणाशीं.) प्राणनाथा, नाहींरे नाहीं, हे लाजत नाहींत, आतां माझा अभिमान तुला असूंदे, तूं तरी विसरूं नको.

**भीम०**– वत्सा, कांबरें इतका उशीर लागला पांचाळीला[2] ?

**सह०**– दादा, उशीर कशाचा, ती केव्हांच आली आहे, पण क्रोधाच्या आवेशांत आपण होतां ह्मणून, ती जवळ आली असतांही पाहिली नाहीं.

**भीम०**– खरेंच काय ? ती केव्हां आली ? (मागें द्रौपदीकडे पाहून.) हे प्रिये, क्रोधाच्या आवेशामुळें, तूं जवळ आलीस तरी म्यां तुला

---

१ स्त्रियांचें २ द्रौपदीला.

पाहिलें नाहीं. याची क्षमा कर. मजवर कोप करूं नको.

द्रौपदी— प्राणनाथ, तुह्मी उदासीन राहिलां तर खरीक कोप, पण कुपित झालां तर मला कोप नाहीं.

भीम०— असें आहे तर आज तुझीं सर्व दुःखें दिगंतास गेलीं असें समज. (द्रौपदीस हातीं धरून उजवे बाजूस बसवितो, आणि तिच्या मुखाकडे पाहून ह्मणतो.) सखे, आज तूं उद्विग्नशी दिसतेस. तर काय बरें उद्वेगाचें कारण झालें?

द्रौपदी— प्राणनाथें, कांहीं नाहीं. तुह्मी जवळ असतां उद्वेगाचें कारण कोठून होणार?

भीम०— सखे, कांबरें तूं मला सांगत नाहींस? (तिच्या केशांकडे पाहून मनांत ह्मणतो) अथवा सांगावयास कशास पाहिजे. उघडच आहे. हरहर!

### आर्या २२.

असतां जीवंत सकळ गेले नसतांहि पांडुसुत दूर ॥
पांचाळराजपुत्री[1] भोगितसेही अशीदशा क्रूर[2] ॥ २२ ॥

द्रौपदी— अगे बुद्धिमतिके, आतां प्राणनाथाला तूं सर्व वृत्तांत सांग. कांकीं, माझा अपमान ऐकून दुसरा कोण खेदपावणार आहे?

दासी— महाराज, ह्यापेक्षांही अधिक असें कांहीं आज देवीस कोप येण्यास कारण झालें.

भीम०— काय ह्मणतेस? ह्याहूनही अधिक? तें कोणतें. सांग सांग. (आपणाशीं बोलतो.)

### आर्या २३.

कौरव्य वंश[3] दावीं जळावया कोण हो शलभ[4] झाला ॥
जो मुक्त केश कृष्णा धूमशिखेला[5] नभी शिवायाला ॥२३॥

दासी०— ऐकावें महाराज, सांगतें. आज आमचीं बाईसाहेब सुभद्रा

१ द्रौपदी. २ दुःखदायक. ३ कौरववनासदावानल. ४ टोळ. ५ अग्निझालेला.

आदिकरून सपत्नीवर्गास[1] बरोबर घेऊन गांधारीसासूबाईचें पादवंदन करण्याकरितां गेलीं होतीं.

**भीम०**— योग्य आहे. असेंच करावें. वडील मनुष्यें आपणांस वंद्यच आहेत.

**दासी**— तेथून परतली तों इतक्यांत भानुमती बाईनें यांजकडे पाहिलें.

**भीम०**— आँ—शत्रूच्या स्त्रीनें हिजकडे पाहिलें? मग ठीकच क्रोध आला. बरें मग पुढें?

**दासी**— मग ती आमच्या बाईसाहेबांकडे पाहून आणि आपल्या सखीच्या मुखाकडे दृष्टि देऊन किंचित् सगर्व हास्य करून बोलली.

**भीम०**— केवळ हिजकडे पाहिलें इतकेंच नाहीं. अणखी बोलली देखील ना? आँ—काय करूं हो! बरें मग पुढें?

**दासी**— ती ह्मणाली, अगे, याज्ञसेनी तुझे भर्त्ते पांच गांव मागत आहेत असें ऐकतों. मग अझून तुझी वेणी मोकळी कां बरें? बांधीत कां नाहींस?

**भीम०**— सहदेवा, ऐकिलेंना हें कसें मर्मभेदक भाषण तें?

**सहदेव**— दादा काय बोलावें. दुर्योधनाचेंच कुटुंब तें जो नवऱ्याचा स्वभाव तोच बायकोचा. पहा.

### आर्या २४.

पति सहवासें स्त्रीचें चित्त पतिसमान होतसे दुष्ट ॥
विष वृक्षाश्रितवल्ली मधुरहि मूर्छित करीतसे स्पष्ट ॥ २४ ॥

**भीम०**— बुद्धिमतिके, मग तुझ्या धणिनीनें काय उत्तर दिलें?

**दासी**— महाराज, जवळ कोणी चाकर माणूस नसतें तर हीं स्वतां उत्तर देतीं.

**भीम०**— हां हां ठीकच. बरें त्वां तरी काय उत्तर दिलें?

**दासी**— महाराज, म्यां असें उत्तर दिलें. अहो भानुमतीबाई, तुमचे केशपाश मोकळे झाले नसतां अगोदर आमच्या बाईसाहेबांचे केश कसे बांधले जातील?

---

१ सवतींस.

पाहिलें नाहीं. याची क्षमा कर. मजवर कोप करूं नको.

द्रौपदी– प्राणनाथ, तुह्मी उदासीन राहिलां तर बरीक कोप, पण कुपित झालां तर मला कोप नाहीं.

भीम०– असें आहे तर आज तुझीं सर्व दुःखें दिगंतास गेलीं असें समज. ( द्रौपदीस हातीं धरून उजवे बाजूस बसवितो, आणि तिच्या मुखाकडे पाहून ह्मणतो. ) सखे, आज तूं उद्विग्नशी दिसतेस. तर काय बरें उद्वेगाचें कारण झालें ?

द्रौपदी– प्राणनाथे, कांहीं नाहीं. तुह्मी जवळ असतां उद्वेगाचें कारण कोठून होणार ?

भीम०– सखे, कांबरें तूं मला सांगत नाहींस? (तिच्या केशांकडे पाहून मनांत ह्मणतो ) अथवा सांगावयास कशास पाहिजे. उघडच आहे. हरहर!

आर्या २२.

असतां जीवंत सकळ गेले नसतांहि पांडुसुत दूर ॥
पांचाळराजपुत्री[1] भोगितसेही अशीदशा क्रूर[2] ॥ २२ ॥

द्रौपदी– अगे बुद्धिमतिके, आतां प्राणनाथाला तूं सर्व वृत्तांत सांग. कां कीं, माझा अपमान ऐकून दुसरा कोण खेदपावणार आहे ?

दासी– महाराज, ह्यापेक्षांही अधिक असें कांहीं आज देवीस कोप येण्यास कारण झालें.

भीम०– काय ह्मणतेस ? ह्याहूनही अधिक ? तें कोणतें. सांग सांग. ( आपणाशीं बोलतो. )

आर्या २३.

कौरव्य वंश दावीं[3] जळावया कोण हो शैलभ[4] झाला ॥
जो मुक्त केश कृष्णा धूमशिखेला[5] नभी शिवायाला ॥२३॥

दासी०– ऐकावें महाराज, सांगतें. आज आमचीं बाईसाहेब सुभद्रा

१ द्रौपदी. २ दुःखदायक. ३ कौरववनासदावानल. ४ टोळ. ५ अग्निज्वालेला.

आदिकरून सपत्नीवर्गास[1] बरोबर घेऊन गांधारीसासूबाईचें पादवंदन करण्याकरितां गेलीं होतीं.

भीम०— योग्य आहे. असेंच करावें. वडील मनुष्यें आपणांस वंद्यच आहेत.

दासी— तेथून परतली तों इतक्यांत भानुमती बाईनें यांजकडे पाहिलें.

भीम०— आँ—शत्रूच्या स्त्रीनें हिजकडे पाहिलें? मग ठीकच क्रोध आला. बरें मग पुढें?

दासी— मग ती आमच्या बाईसाहेबांकडे पाहून आणि आपल्या सखीच्या मुखाकडे दृष्टि देऊन किंचित् सगर्व हास्य करून बोलली.

भीम०— केवळ हिजकडे पाहिलें इतकेंच नाहीं. अणखी बोलली देखील ना? आँ—काय करूं हो! बरें मग पुढें?

दासी— ती ह्मणाली, अगे, याज्ञसेनी तुझे भर्त्ते पांच गांव मागत आहेत असें ऐकतों. मग अझून तुझी वेणी मोकळी कां बरें? बांधीत कां नाहींस?

भीम०— सहदेवा, ऐकिलेंना हें कसें मर्मभेदक भाषण तें?

सहदेव— दादा काय बोलावें. दुर्योधनाचेंच कुटुंब तें जो नवऱ्याचा स्वभाव तोच बायकोचा. पहा.

आर्या २४.

पति सहवासें स्त्रीचें चित्त पतिसमान होतसे दुष्ट ॥
विष वृक्षाश्रितवल्ली मधुरहि मूर्छित करीतसे स्पष्ट ॥ २४ ॥

भीम०— बुद्धिमतिके, मग तुझ्या धणिनीनें काय उत्तर दिलें?

दासी— महाराज, जवळ कोणी चाकर माणूस नसतें तर हीं स्वतां उत्तर देतीं.

भीम०— हां हां ठीकच. बरें त्वां तरी काय उत्तर दिलें?

दासी— महाराज, म्यां असें उत्तर दिलें. अहो भानुमतीबाई, तुमचे केशपाश मोकळे झाले नसतां अगोदर आमच्या बाईसाहेबांचे केश कसे बांधले जातील?

[1] सवतींस.

### श्लोक २५.

केश तूमचे अजून मुक्तनाहिं जाहले ॥
बाइ तोंच ही कशी करील बद्ध आपले ॥
ऐकतांच उत्तरा मनांत फार खोंचली ॥
वाटलें तिला उरीं जणो सुरीच टोंचली ॥ २५ ॥

भीम.० –(संतोष पाऊन) शाबास बुद्धिमतिके शाबास, ठीक उत्तर दिलें आमच्या सेवकांस योग्य तेंच बोललीस. (आंगावरील आभरणें काढून तिला बक्षीस देतो.) (द्रौपदी कडे पाहून) अगे पांचाल राजतनये द्रौपदी, फार काय सांगू ? ऐक, अल्पकाळेंकरूनच अशी गोष्ट होईल.

### श्लोक २६.

जी ही गदा ममकरांत सदैव नाचे ॥
घातें इच्या चुरिन ऊरु सुयोधनाचे ॥
रक्तें तयांतिल विलेपिन मी स्वपाणी ॥
त्यांहींच बांधिन सखे तव मुक्त वेणी ॥ २६ ॥

द्रौपदी– प्राणनाथ, तुह्मी कुपित झाला असतां तुह्मांस कोणतेंच कर्म दुष्कर नाहीं. पण ह्या तुमच्या निश्चयास तुमचे भ्रात मात्र अनुकूळ असावे.

सह०– आहों बरें आह्मी सर्व या गोष्टीस अनुकूळ.

(इतक्यांत पडद्यापलीकडे मोठा शब्द होतो.)

(सारे कान देऊन ऐकतात.)

भीम०– (मनांत ह्मणतो.) हा कशाचा ध्वनि. ?

### श्लोक २७

हा गंभीर ध्वनि जलधिच्या[१] मंथनीं मंदराचा ॥
कीं हा चंड प्रलय जलदोन्योन्य[२] संघट्टनाचा ॥

१ समुद्राच्या. २ मेघ.

वाटे ऐसा ध्वनि परिसतां शत्रुचें ऊर फाटे॥
अस्मत् सिंहध्वनिसखमहा दुंदुभि ध्वान वाटे ॥ २७ ॥

( धर्मराजाचा कंचुकी घाई घाईनें आंत येतो. )

**कंचुकी**— अहो भीमसेन महाराज, हा भगवान् वासुदेव (इतकेंच ऐकून सर्व हात जोडून उभे राहातात. )

**भीम०**— कुठे कुठे भगवान् कुठे आहे?

**कंचुकी**— हा पांडवांचा पक्षपाती ह्या द्वेषामुळें दुर्योधन त्यास बद्ध करावयास प्रवृत्त झाला.

( सर्व घाबरतात. )

**भीम०**— काय भगवंतास बद्ध केलें ?

**कंचुकी**— नाहीं नाहीं, बद्ध करावयास प्रवृत्त झाला.

**भीम०**— मग देवानें काय केलें.

**कंचुकी**— तो काय त्याच्या बापाला बद्ध होतो ? तो अनंतशक्तिमान् ईश्वर, त्यानें तत्क्षणीं जें काय विश्वरूप प्रकट केलें त्याचें तें उग्र तेज पाहून सर्वांची बोबडी वळली. सर्व कौरव मंडळ भयभीत होऊन मूर्छित पडलें. अशा युक्तीनें त्या दुष्टांचा पराभव करून भगवान् श्रीकृष्ण निघाला तो आमच्या शिबिरास येऊन पोंहोंचला. त्यानें तुम्हांस लौकर बोलाविलें आहे.

**भीम०**— ( किंचित् उपहास करून ) कायहो दुष्ट दुर्योधन हा! भगवंतास बद्ध करावयास इच्छितो! (आकाशाकडे पाहून) हा दुष्टा दुर्योधना; कुरुकुलधमा, असा तूं अमर्याद झालास, तर तुझ्या नाशाविषयीं पांडवांचा क्रोध निमित्त मात्र असो. तूं आपल्या कर्मानेंच नष्ट झालास.

**सह०**— दादा, हा दुरात्मा सुयोधन जो साक्षात् भगवान् वासुदेव त्याला वास्तवरूपानें जाणत नाहीं ?

**भीम०**— अरे मूर्खच तो. जो दुरात्मा त्यानें ईश्वरास कसें जाणावें बरें ?

### श्लोक २८.

आत्माराम स्थिरमतिमुनी निर्विकल्पीं समाधीं[1] ॥
तत्वज्ञानें विघटिततमो[2] ग्रंथि[3] होऊनि आधीं ॥
जें पाहाती मनिं पलिकडे ज्योतिच्या कीं तमाच्या ॥
कैसा जाणो पशुमति तया सत्स्वरूपास त्याच्या ॥ २८ ॥

भीम०— अरे मैत्रेया, आपले थोरले महाराज यासमयीं कोणता विचार करीत आहेत ?

कंचुकी— आपली स्वारी गेली ह्मणजे महाराजांचा कोणता काय विचार चालला आहे हें आपण स्वतांच जाणतील. (असें बोलून निघून जातो.) (इतक्यांत बाहेर कलकल्यानंतर मोठा शब्द होतो.) अहो द्रुपदविराट वृष्ण्यंधक सहदेवप्रभृति आह्मां कडील सेनानायकहो, आणि कौरवसैन्यांतील प्रधानयोद्धेहो, सर्व तुह्मी कान देऊन ऐका.

### ओंव्या २९.

जोदूतारणी[4] पासाव उद्भवला ॥ सती[5] केशांबर कर्षणें वाढला ॥
परीक्षमा भस्में आछादिला ॥ महा यत्नें क्रोधाग्नि ॥ १ ॥
सत्यव्रत भंगाचें भय ॥ हृदयीं वागवी जो अक्षय ॥
कुरुकुळाचा न व्हावा क्षय ॥ ऐसें चित्तीं जयाच्या ॥ २ ॥
त्या युधिष्ठिरें क्षमा शीलें ॥ आज पर्यंत जें उपेक्षिलें ॥
तें समय येतां दुणावलें ॥ क्रोधाग्नीचें ज्योतिहें ॥ ३ ॥
हे आतां कौरव महारण्यातें ॥ गिळावया पसरीतसे मुखातें ॥
सर्व तुह्मी सावधान चित्तें ॥ कौतुक पाहा वीरहो ॥ ४ ॥

भीम०— (ऐकून हर्ष क्रोधांनीं युक्त होत्साता ह्मणतो.) पसरो, पसरो, युधिष्ठिराच्या क्रोधाग्नीचें मुख अप्रतिबंध, पसरो.

द्रौपदी— प्राणनाथ, प्रलय मेघासारिखा गंभीर आणि भयंकर असा समर

१ अखंडसमाधींत. २ नाशित. ३ अज्ञानग्रंथि. ४ अग्निमंथनकाष्ठ. ५ द्रौपदी.

दुंदुभीचा चंडघोष क्षणक्षणीं कोठें होत आहे बरें ?

**भीम०**— ( हे प्रिये, दुसरें काय ? यज्ञ चालू झाला.

**द्रौपदी**— कोणता यज्ञ प्राणनाथा ?

**भीम०**— अगे हा रणयज्ञ. कसा तो सांगतों.

**श्लोक ३०.**

आह्मी ऋत्विज चार सत्य भगवान् कर्मोपदेष्टा हरी ॥
संग्रामाध्वरिं दीक्षित [१]क्षितिपतूं पत्नीव्रता जी धरी ॥
अंधाचे [२]सुत ते पशू फल तव क्लेशोपशांती महा ॥
वाटे राजनिमंत्रणार्थ करितो कीं दुंदुभिध्वानहा ॥ ३० ॥

**सहदेव**— दादा, चला आपणं जाऊं आतां, आणि धर्मराजाच्या आज्ञेप्रमाणें यथायोग्य समरकर्म करूं.

**भीम०**— हे आपण सिद्धच आहों महाराजाची आज्ञा करावयास. ( उठून ) हे प्रिये, जातों बरें आह्मी आतां कुरुकुलांचा क्षय करावयास, तूं स्वस्थ ऐस.

**द्रौपदी**— ( डोळ्यांत अश्रु आणून ) दैत्यांशीं युद्ध करण्याकरितां जेव्हां विष्णु निघाला तेव्हां जे त्यास शुभ शकुन झाले तेच शकुन आज तुह्मांस असोत.

**दासी**— महाराज, बाईसाहेबांची आणखी एक विनंती आहे कीं, आपण लौकरच समरविजयी होऊन याल आणि माझें आश्वासन कराल अशी मी आशा करीत बसतें ती पूर्ण करावी.

**भीम०**— हे प्रिये, काय तसल्या कोरड्या आश्वासनानें. तुला एकच सांगतों.

**ओंवी ३१.**

स्त्रीपरिभवें जो दुखावला ॥ लज्जामळें जो मुखीं मळला ॥
तो निःकौरव्य भूमंडळा ॥ नकरितां मुख न दाखवी ॥ ३१ ॥

---

१ धर्मराज, २ कौरव.

द्रौपदी— प्राणनाथ, नका नका असें करूं नका. याज्ञसेनीच्या परिभवानें[1] तुमच्या हृदयांत कोपानळ प्रदीप्त झाला आहे खरा, परंतु तुह्मी आपल्या शरीराकडे नपाहतां समरांत संचार करूं नका. कांकीं, शत्रूंच्या सैन्यांत फार सावधपणानें वर्त्तावें लागतें असें ऐकतों. तुह्मी खुशाल तरच सर्व गोष्टी नीट.

भीम०— हे सुक्षत्रिये. ऐकतेस ! आह्मी शत्रुसैन्यांत कसा ही संचार करण्यास हमर्थ आहों. तूं काळजी करूं नको.

ओंव्या ३२.

जेथें गजमस्तकें थडकती ॥ रुधिरमांसांचे चिखल होती ॥
ध्वजांसहित बुडोनि जाती ॥ रहंवर[2] ज्यास्थळीं ॥ १ ॥
बुडालिया रथांवरी पायठेवूनि वीर चतुरीं[3] ॥
विक्रमाची कला कुसरी ॥ दाखवीजे ज्यामाजी ॥ २ ॥
मांसाशनें रुधिरपानें ॥ भोलू ओरडती विक्राळस्वनें ॥
तींचमंगलतूर्यें भावोनिमनें ॥ कबंधें जेथें नाचती ॥ ३ ॥
ऐशिया लोक भयंकरीं ॥ संग्राम महार्णवा भीतरीं ॥
संचार करावया भूमीवरी ॥ पंडित एक पांडुपुत्र ॥ ४ ॥

( असें बोलून सर्व निघून जातात. )

पहिल्या अंकांतील पद्यें.

१२ आर्या. १३ श्लोक. १७ ओंव्या. २ पदें. एकून पद्यें ४४

---

१ शत्रूकडूनझालेल्या अपमानानें. २ रथ. ३ ज्यारणांगणांत.

# प्रथमअंकसमाप्त.

# अंक २.

स्थळ,

चिमणबाग.

## पात्रें.

| | |
|---|---|
| कंचुकी. | दुर्योधनाचा चोबदार |
| दुर्योधन. | कौरवांचा राजा. |
| भानुमती. | दुर्योधनाची स्त्री. |
| सुवदना. | भानुमतीची सखी. |
| तरलिका. | भानुमतीची दासी. |
| द्वारपालिका. | द्वाराचें रक्षण करणारी स्त्री. |
| जयद्रथमाता. | दुर्योधनाच्या मेव्हण्याची आई. |
| दुःशीला. | दुर्योधनाची बहीण. |

# वेणीसंहारनाटक.

## अंक २.

( यानंतर दुर्योधनाचा कंचुकी येतो. )

कंचुकी.– दुर्योधन महाराजांनीं मला अशी आज्ञा केली आहे कीं, " अरे विनयंधरा, जाऊन शोध कर, प्रिया भानुमती आईसाहेबांचें पादवंदन करून माघारी आली कीं नाहीं. कारण कीं, आज ज्या कर्णजयद्रथादि महावीरांनीं अभिमन्यूचा वध केला, त्यांचा समरांगणांत जाऊन मला सत्कार करावयाचा आहे, याजकरितां तिला भेटून मला लौकर तिकडे गेलें पाहिजें."– कायहो आमच्या महाराजांचा मोठेपणा सांगावा ! मी जरेनें व्याप्त झालों असें पाहून कांहीं तरी काम असावें ह्मणून मला अंतः पुरांतील कामगिरी सांगितली आहे. अथवा जराच कशास पाहिजे, जे अंतःपुरांत वागतात त्यांची अशीच अवस्था असते. पहा,

### ओंव्या १.

नेत्र असतां वर न पाहावें ॥ श्रोत्र असतां न ऐकावें ॥
शक्ती असोनी हातीं धरावें ॥ अधिकार ह्मणोनियष्टीतें ॥ १ ॥
चुकी नपडावी याभावें ॥ मनसर्वदा सावध ठेवावें ॥
उद्धतपणें नवागावें ॥ अंतःपुरीं राहोनी ॥ २ ॥
परसेवन नसेचिभलें ॥ परि उपजीवनार्थ पथकरिलें ॥
सहजवृद्धपण आंगीं आलें ॥ केलें अधिक काय जरेनें ॥ ३ ॥

( इकडेतिकडे फिरून आकाशाकडे पाहून ह्मणतो. )

कायगे [१]विहंगिके, सासूबाईच्या पायांचें दर्शन करून भानुमतीबाई परत आली काय ? ( कान देऊन उत्तर ऐकलेंसें करून )काय बोलतेस ? "दादा, ही भानुमतीबाई महा[२]राजांस समरांगणीं विजय

---

१ कोणीदासी. २ दुर्योधनास.

प्राप्त व्हावा याइच्छेनें गुरुदेवता यांच्या पायांस वंदन करून आजपासून कांहीं नियम धरून देवतेच्या आराधनासाठीं ह्या चिमणबागेंत देवमंदिरांत बसली आहे " असें ह्मणतेस काय ? बरें, बरें समजलों. जातूं आपल्या उद्योगाला. मीही महाराजांकडे जाऊन भानुमतीबाई ह्या चिमणबागेंत आहेत ह्मणून कळवितों. ( असें बोलून इकडे तिकडे फिरून ह्मणतो. ) शाबास पतिव्रते शाबास. जातीची स्त्री असून तूं बरी. आमचे महाराज असे नाहींत. ते सबळ असोत कीं निर्बळ असोत, पण ज्यांचें साह्य भगवान् वासुदेव करीत आहे असे पांडुपुत्र शत्रु छातीवर उभे असतां अद्यापि महाराजांचें चित्त अंतः पुरांतील सुखांत निमग्न आहे. ( थोडा विचार करून ह्मणतो. ) हें अयोग्य करणें महाराजांचें. कांतर.

### श्लोक २.

ज्याचा[1] शत्रुकुळीं अंखडपरशू त्याचाहि जेता[2] जरी ॥
पांडूच्या कुमरीं शरीं निजविला बाधा[3] न झाली तरी ॥
प्रौढांनीं बहुतीं अशस्त्रसमरीं जो श्रांतही जाहला ॥
एकाकी अभिमन्युबाळ वधितां राजासुखा पाव्ला ॥ २ ॥

असो आतां आमचें सर्व प्रकारें दैव काय बरें करील तें करो. आपण देवी भानुमती ह्याठिकाणीं आहे हें तर महाराजांस जाऊन सांगूंया. ( असें ह्मणून निघून जातो. ) ( ही पूर्वोत्तर कथेची सूचना. ) ( तदनंतर भानूमती, तिचीसखी सूवदना, दासी तरलिका, ह्या तिघी येतात. भानूमती आसनावर बसते. सखी आणिदासी बाजूस उभ्या राहातात. )

**सुवदना**.— अगे सखी भानुमती, तूं अभिमानी महाराज दुर्योधन ह्याची पट्टराणी असून एवढ्याशा स्वप्नदर्शनामुळें अगदीं धैर्य सोडून अति संताप कां पावतेस बरें ?

---

१ भार्गवरामाचा. २ भीष्म. ३ दुःख.

तरलिका– बाईसाहेब, सुवदना सखी चांगलें योग्य बोलते.

भानुमती– अगे, खरें, पण तसें नव्हे तें.

तरलिका– अहो, मनुष्य झोपीं गेल्यावर स्वप्नांत काय काय पाहात नाहीं, आणि काय काय बोलत नाहीं!

भानुमती– अगे तूं ह्मणतेस तें सारें खरें, पण मला जें स्वप्न पडलें हें चांगलें नाहीं. अनिष्ट सूचक आहे, असें मला वाटतें.

सुवदना – हे प्रियसखी, जर असें आहे तर सांग बरें, त्वां काय स्वप्न पाहिलें तें. ऐकूंदे आह्माला. आह्मी ही धर्माच्या प्रशंसेनें, देवतांच्या संकीर्त्तनानें, आणि दूर्वादिकमंगळ पदार्थांच्या ग्रहणानें त्याचा परिहार करूं.

तरलिका – बाईसाहेब, ही सुवदना बरें बोलते. जीं दुष्ट स्वप्नें असतात तीं देवतांच्या स्तुतीनें कुशळपरिणामी[१] होतात असें ऐकतों.

भानुमती – असें आहे, तर मी सांगतें. पण चित्ताचें अवधान इकडे असूंदे हो.

सुवदना – माझें अवधान आहे. प्रियसखी, सांग आतां ऐकूंदे.

भानुमती – स्वप्न असें पाहिलें. कीं, मी प्रमदवनांत बसलें आहें, तों तिकडून फार सुंदर एक नकुळ[२] आला, आणि त्यानें शंभर सर्प मारिले.

सखी आणि दासी – ( दोघी मनांत चपापतात. ) इडा पीडा टळो, अमंगळ पळो, ( उघडपणें. ) बरें पुढें काय झालें?

भानु०– अगे भयानें मला विस्मृति झाली. अंमळ थांब, मी आठवून सांगतें.

( चिंताग्रस्त होऊन बसते. )

(इतक्यांत दुर्योधन आणि कंचुकी उभयतां येतात.)

दुर्योधन – कोणी ह्मटलें आहे, तें खरें आहे.

आर्या. ३

जो साक्षाद्दुष्टमहा लघु अन्येंवास्वयेंचि अपकार ॥
अपकाऱ्याला केला तो हृदयाप्रीति देतसे फार ॥ ३ ॥

१ शुभ फल देणारीं. २ मुंगूस.

ह्मणून आज द्रोण कर्ण जयद्रथादिकांनीं अभिमन्यु मारिला हें ऐकून माझें चित्त अंमळ स्वस्थ झालें.

**कंचुकी** — महाराज, एका द्रोणाचार्याच्या शस्त्रप्रभावास हें कांहीं कठीण नाहीं. मग कर्ण जयद्रथ या वीरांची यांत कोणती मोठी श्लाघा आहे?

**दुर्योधन** — विनयंधरा तुझ्या बोलण्याचा अभिप्राय मी समजलों, तूं काय ह्मणतोस? कीं, बाल अभिमन्यु एकाकी शस्त्र रहित असतां बहुतांनीं मिळून मारिला यांत काय श्लाघा, एवढेचना? पहा,

### श्लोक ४.

मारितांवृद्ध गांगेय शिखंडी करुनी पुढें ॥
जी श्लाघा पांडु पुत्रांची तीच होईल आमुची ॥ ४ ॥

**कंचुकी** — ( मनांत किंचित् भय मानून ) महाराज, अशी भलतीच कल्पना मनांत आणूं नये. आपल्या पराक्रमाचा प्रतिघात आह्मी पूर्वीं कधींच पाहिला नाहीं, ह्मणून असें बोललों. क्षमा असावी.

**दुर्योधन** — हां असेंच आहे हें काम! ( तोंडानें फुटफुटतो. )

### श्लोक ५.

सहभृत्यगणा सबांधवा सहमित्रा ससुता सहानुजा ॥
निर्वटील[1] सुयोधना स्वयें समरीं सत्वर पांडु नंदन ॥ ५ ॥

**कंचुकी** — ( कानांत बोटें घालून किंचित् सभय होऊन ) इडा पीडा टळो, पाप अमंगळ जळो.

**दुर्योधन** — विनयंधरा, असें कां बोललास? म्यां काय ह्मटलें?

**कंचुकी** — ( सह भृत्यगणा सबांधवा हा श्लोक ह्मणून दाखवितो. ) येथें महाराजांच्या बोलण्यांत किंचित् विपर्यास, पडला. ह्मणून भय वाटलें.

**दुर्योधन** — कसारे विपर्यास पडला?

१ मारिल.

कंचु०— विपर्यास असा पडला, कीं पांडुनंदना सुयोधन असें मुखावाटे यावें तें निवटील सुयोधना पांडुनंदन असें आलें हाच कायतो विपर्यास.

दुर्यो०— विनयंधरा, आजप्रिया भानुमती नित्या प्रमाणें मला विचारल्यावाचून मंदिरांतून सकाळींच वाहेर निघून गेली ह्यामुळें माझें मन उद्विग्न झालें आहे. ह्मणून तितकें अनुसंधान राहिलें नाहीं. असो, पण भानुमती कोठें आहे तें ठिकाण मला लौकर दाखीव.

कंचु०— इकडे या महाराज, दाखवितों. ( दोघे पुढें जातात. कंचुकी पुढें पाहून आसमंताद्भागींचा गंध घेऊन ह्मणतो. ) महाराज पहा हा तुमचा चिमणवाग. ज्याला तुह्मी बालोद्यान ह्मणतां.

## कटाव ६.

राजेंद्राउद्यानाची अद्भुतहेशोभादिसती ॥ ध्रुवपद ॥ झालासुखकरप्रातःकाळ॥ वारावाहतसेझुळझूळ ॥ मंदसुगंधआणिशीतळ ॥ त्याचाहोतोस्वनमंजूळ ॥ चाल ॥ हिमकण[1]मिश्रितवाहतिवारे ॥ लागलियासर्वांगथरारे ॥ त्यांच्यावेगेंप्रसे[2]वबंधनें ॥ तुटोनिखालींपडतीसुभनें[3] ॥ तरूतळींसुमराशी[4]पडल्या ॥ पुष्पांच्याजणुशय्यारचिल्या ॥ वृक्षतळींचेपाटपाचुचे ॥ आलवालचितमाणिक्याचे ॥ स्फटिकबद्धपदपद्धतिसुंदर[5] ॥ हवाशीरजळमंदिरत्यामधें ॥ कारज्यांचेउडतिफवारे॥ धाराधर[6]सेधारावर्षति॥पाहुनिमोर समोर तांडवकरिती॥१ ॥राजेंद्राउद्यानाची॥ अद्भुतहेशोभादिसती ॥ १ ॥ फुलझाडांच्याअसख्यपंक्ती ॥ जिकडेतिकडेपुष्पितदिसती ॥ अनेकरंगीअनेकजाती ॥ लिखितचित्रपटतुल्यभासती ॥ चाल॥ जाइजुईशेंवतीमोंगरी ॥ पारिजातमोगरादुहेरी ॥ शुभ्रकणेरीलालशेंदरी ॥ रायमुनीनेवाळिमालती ॥ नागकुंदमंदारकेतकी ॥ मोतीयाघमघमितसुवासिक ॥ सुवर्णचंपकबकुलमनोहर ॥ गुलानारगुलदावरिगुलाब ॥ मुलछब्बूगुलबासगुलाली ॥ सोनटकामाधवीचमेली ॥ कमलकंजकल्हारकुशेशय ॥ यापरिपुष्पद्रुमहेफुलले ॥ नानापरिचेपरिमळसुटले ॥ पुष्पांचेमकरंद[7]गळाले ॥ त्यांवरि

---

१ बर्फ. २ डेरखें. ३ फुलें. ४ पुष्प राशी. ५ वाट. ६ मेघ. ७ पुष्परस.

## कटाव ६.

मधुकरजाउनिजडले [1] ॥ तेमधुलोभेंतेथुनिनचउठती ॥ ॥ राजेंद्राउद्यानाची ॥ अद्भुतहेशोभादिसती ॥ २ ॥ नानापरिचोंहींफळझाडें ॥ फळलींसुंदरचोंहींकडे ॥ घेउनिउपायन[2]तुजपुढें ॥ उभींअसतींवाडेंकोडें[3] ॥ चाल ॥ आम्रपनसअक्रोडबदामी ॥ मातुलिंगअंजीरदाडिमी ॥ लिंबोणीनारिंगचकोत्री ॥ इडनिंबीवंपारकरमरी ॥ तुतीआंवळीरायआंवळी ॥ रामफळीसीताफळिकदली ॥ बिहीत्रदरपेरूकरवंदी ॥ द्राक्षाखिरणीसाकरनिंबी ॥ सोनकेळजांबूळअनानस ॥ परोपरीचींफळझाडेंफळभारेंवलल्लींअसती ॥ राजेंद्राउद्यानाची ॥ अद्भुतहेशोभादिसती ॥ ३ ॥ ॥ होतांसुंदरप्रातःकाळ ॥ तमजाउनिनभझालेंउजाळ ॥ जागृतझालेपक्षिसिकळ ॥ किलबिलकरितीत्यांचेबाळ ॥ चाल ॥ पक्षीकोटया बाहेरनिघती ॥ जाउनिवृक्षस्कंधींवसती ॥ चंचूनींनिजपक्षशोधिती ॥ थरथर फडफडपंखझाडिती ॥ मंजुळसुस्वरशब्दकाढिती ॥ उडावयाचीइच्छाधरिती ॥ राजहंसकलहंसबलाका ॥ हंसचाषकादंबझिल्लिका ॥ कंककाकसारंगमल्लिका ॥ क्रौंचकरेटूकुकुटचटक ॥ द्रोणकाकचातककोकाव्हय ॥ बकशुककोलिलपिक पारावत ॥ लावकगृध्रश्येनमधुव्रत ॥ मयूरतित्तिरचकोरसारस ॥ धार्तराष्ट्रभारद्वजखंजन ॥ यापरिपक्षीभक्षातेंशोधायाउडोनिजाती ॥ राजेंद्राउद्यानाची ॥ अद्भुतहेशोभादिसती ॥ ४ ॥

महाराज प्रभात काळचा आणखी चमत्कार पहा.

### श्लोक ७.

प्रालेय मिश्र मकरंद कराल कोशां ॥  
पुष्पांसमेत पडल्या रजनी विकाशां ॥  
अर्कांशुभिन्न मुकुलोदर गंध वातें ॥  
जाताति भृंगतति सूचित पंकजातें ॥ ७ ॥

दुर्यो०— आणखी एक या प्रातःकालीं फार रमणीय आणि चमत्कारिक मौज दिसते. पहा,

---

१ भुंगे. २ भेट. ३ कौतुकानें.

### श्लोक ८.

प्रोन्मीलद्दलसंधिमाजि शिरत्या जागेरवीच्या करीं ॥
झाले हालवुनी बळे उठविले राजे जसे त्यापरी ॥
सस्त्री भृंगपरागरंजिततनू झाले कसे हे अहा ॥
होतां जृंभितपद्म गर्भशयना सोडोनिजाती पहा ॥ ८ ॥

### ओंव्या ९.

उघडूंलागतां पंकजकोश ॥ दलसंधींतूनि सावकाश ॥
करती भानुकर प्रवेश ॥ अंतर्भाग उजळावया ॥ १ ॥
कमलगर्भी भ्रमरनिद्रित ॥ करस्पर्शें होती जागृत ॥
भाग्यवंत नरनाथ ॥ परिजन हस्तें ज्यापरी ॥ २ ॥
घनपरिमलें सुपरागें ॥ ज्यांचीं माखिलीं सर्वांगें ॥
जेंवि विलासी अंगरागें ॥ रंजित तनू दीसती ॥ ३ ॥
स्पष्टउघडतां पंकजातें ॥ सोडूनियां मृदुशयनातें ॥
घेऊनि आपुल्या ललनातें ॥ उडूनिजाती षट्पद ॥ ४ ॥

**कंचुकी**— महाराज, ही पहा भानुमती देवी येथें आहे. सुवदना आणि तरलिका ह्या दोघी तिच्या सेवेंत तत्पर आहेत. आतां आपण जवळ जावें.

**दुर्योधन**— ( तिला पाहून ) विनयंधरा, तूंजा आणि माझा युद्धाचा रथ सिद्ध करून आण, इतक्यांत मीही प्रियेला भेटून मागोमाग हाच आलों ह्मण.

**कंचुकी**— आज्ञा मराराज, ( असें ह्मणून निघून जातो. ) ( तिकडे त्या तिघींचें संभाषण चाललें. )

**सुवदना**— हे प्रियसखी, आठविलें त्वां पुढलें कायतें ?

**भानु०**— सखी, आठविलें, सांगतें ऐक. आज मी प्रमदवनांत बसलें आहे, तों माझ्या अग्रभागीं एक सुंदर नकुळ आला, आणि त्यानें शंभर सर्प मारिले.

दोघी– ( मनांत ) इडापीडा टळो. ( बाहेर ) बरें हें तर ऐकीलें. पण पुढें काय झालें तें सांग.

भानु०– अगे सखे, संतापानें माझें ह्रदय व्याप्त झाल्यामुळें मी पुनः विसरलें.

दुर्यो०– अहो प्रिया भानुमती, ही सुवदना आणि तरलिका ह्यांजबरोबर कांहीं गुह्य गोष्टी बोलत आहे,. तर आपण एव्हां पुढें जाऊं नये येथेंच जाळीच्या आड उभें राहून ह्या काय मोकळे मनानें बोलतात हें ऐकावें. ( असें ह्मणून जाळीच्या आड उभा राहतो. )

सुवदना– प्रियसखे, नकोगे असा संताप करूं पुढें सांग काय तें.

दुर्यो०– हें काय! हिला संताप होण्यास काय बरें कारण असावें ? हाँ खरी गोष्ट· आज सकाळीं मला विचारल्यावांचून जेव्हां ही बाहेर निघून गेली, तेव्हांच माझ्या मनांत आलें कीं, कांहीं तरी हिचा कोप मजवर झाला आहे. ( आपले ठिकाणीं ) अगे सखे भानुमती, हा दुर्योधन तुझ्या कोपास पात्र नव्हे बरें. पहा.

## साक्या १०.

कांगे कोपातें करिशी ॥ चित्तीं तापातें धरिशी ॥ ध्रुव० ॥
माझ्या अज्ञे वांचुनि पाउल टाकित नाहींस अशी ॥
मजला पुसल्यावांचुनीबाहिर निघूनिगेलीस कशी ॥ १॥
कांगे मजवरि मनःप्रिये त्वां ऐसा केला रोष ॥
तुझिया कोपा विषय नव्हे हा लावुंनको मजदोष ॥ २ ॥
कायचुकी मजपासुनि घडली ह्मणुनि मला सोडोनी ॥
निघूनि गेलिस नकळत पुसतों हात तुला जोडोनी ॥ ३ ॥
जें दृढ बंधन तवकंठीं म्या निज भुज पाशें केलें ॥
होतां निद्रावशें प्रमादें काय शिथिल तें झालें ॥ ४ ॥
किंवा निद्राभरांत सखये कुशीस वळतां चुकलों ॥
वदन तुजकडे नकरुनि पाठीमोरा होउनि निजलों ॥ ५ ॥
अन्यस्त्रीशीं भाषण करितां स्वप्नीं दिसलों तुजला ॥

यास्तव शंका धरूनि चित्तीं दोष लाविशी मजला ॥ ६ ॥
तव अपमान सखे मज पासुनि झाला असेल शयनीं ॥
परिम्या समजुनि नाहीं केला पाहसि हें तूं नयनीं ॥ ७ ॥
तुजला सोडुनि शयनिं कधींही आधीं नाहीं उठलों ॥
तुझिया संगें विषय सुखातें कधिंही नाहीं विटलों ॥ ८ ॥
कायनसें मी तुजवश किंवा नकरीं त्वदूचित कांहीं ॥
मीना वनसें[1] तूं मज जीवनं दुसरें जाणत नाहीं ॥ ९ ॥
तूं देवी मी भक्त तुझा अपराधा ठेवीं न मनीं ॥
आहे आज्ञांकितदास तुझा तत्पर तुझिया भजनीं ॥ १० ॥
कांगे कोपातें करिशी ॥ चित्तीं तापातें धरिशी ॥ ध्रुव० ॥

(मनांत किंचित् विचार करून.) अथवा असें असेल.

आर्या ११.

प्रेमा फारचि मजवरि यास्तवही प्रेम बद्ध चित्तानें ॥
अपराध वळें कल्पुनि रुसलीच असेल त्या निमित्तानें ॥ ११ ॥

बरें पुढें काय बोलते तें ऐकूं तर खरें.

**भानुमती**– अगे त्या नकुलाचें सुंदर रूप पाहून मी फार उत्सुक झालें.

**दुर्योधन**–काय ह्मणतेही? नकुलाचें सुंदर रूप पाहून मी फार उत्सुक झालें? आँ, तर काय ही त्या माद्रीसुतावर अनुरक्त होऊन माझी अशी प्रतारणा करिते काय? (कांहीं कल्पना मनांत आणून, "प्रेमा फारचि मजवरि" ही आर्या पुनःह्मणतो.) हा मूढा दुर्योधना, अरे ही जारिणी तुझी आंतून अशी प्रतारणा करीत असतां तूं आपणास व्यर्थ मोठें मानून घेतोस तर आतां कां बोलत नाहींस. हाँ आतां समजलों. ह्यासाठींच मोठ्या सकाळीं एकांत स्छळीं जाऊन बसणें आणि सखीजनाशीं गुजगोष्टी सांगणें आवडलें तें! दुर्योधना, तूं तर काम मोहित होऊन जारिणीचें हृदय नजाणतां विश्वासानें स्वस्छ राहिलास. हा रांडे दुष्टे, निर्लज्जे,

१ जळ.

श्लोक १२.

भीरुत्व माझ्या पुढतींच तैसें ॥ मागें तुझें साहस कर्म ऐसें ॥
प्रेमा तुझा मद्विषयीं कसागे ॥ चित्तीं असा दुष्पथ काय वागे ॥१२

आर्या १३.

चित्तींह्मणतों तुज मी साध्वीकीं सत्कुलीं तुझें जन्म ॥
दाउनि विश्वास मला पापिष्टे करिशि हें असें कर्म ॥ १३ ॥

सुवदना— मग पुढें काय झालें.

भानु०— मग मी मोठ्या त्वरेनें ह्या ठिकाणीं लतागृहांत शिरलें, इतक्यांत माझ्या मागून तोही आंत आला.

दुर्यो०— कायहो ह्या पापिष्ठेचें जारिणीसारखें पाप कर्म हें! अगे निर्लज्जे

श्लोक १४.

जेथें मदीय[1]रतिनिर्भर हार्द[2]योग ॥
आलीस तूं कथित मत्सुरतोपभोग ॥
तेथेंच दु[3]श्चरित आत्म सखी जनाला ॥
नाहींच लाज तुज आज कथावयाला ॥ १४ ॥

दोघी— मग पुढें काय झालें ?

भानुमती— त्या नकुलानें गर्विष्ठपणानें आपला हात पुढें करून माझ्या स्तनावरचा पदर ओढला.

दुर्योधन— ( मनांत ) काय ? त्यानें गर्विष्ठपणानें आपला हात पुढें करून माझे स्तनावरचा पदर ओढला, असें ह्मणते काय ? झालें तर, आतां या पुढची गोष्ट काय ऐकावयाची आहे. असो, आतां जाऊन परस्त्रीच्या आंगास हातलावणारा जो दुष्ट माद्रीसुत नकुल त्याचे प्राण घेतों. (असें ह्मणून चालता होतो. पुनः मनांत ह्मणतो.) क-

१ प्रीतीचा अतिशय. २ सुखें विलास. ३ दुर्वृत्त.

यास्तव शंका धरूनि चित्तीं दोष लाविशी मजला ॥ ६ ॥
तव अपमान सखे मज पासुनि झाला असेल शयनीं ॥
परिस्या समजुनि नाहीं केला पाहसि हें तूं नयनीं ॥७॥
तुजला सोडुनि शयनिं कधींही आधीं नाहीं उठलों ॥
तुझिया संगें विषय सुखातें कधिंही नाहीं विटलों ॥ ८ ॥
कायनसें मी तुजवश किंवा नकरीं त्वदूचित कांहीं ॥
मीना वनेंसें तूं मज जीवनें दुसरें जाणत नाहीं ॥ ९ ॥
तूं देवी मी भक्त तुझा अपराधा ठेवीं न मनीं ॥
आहे आज्ञांकितदास तुझा तत्पर तुझिया भजनीं ॥ १० ॥
कांगे कोपातें करिशी ॥ चित्तीं तापातें धरिशी ॥ ध्रुव० ॥

(मनांत किंचित् विचार करून.) अथवा असें असेल.

### आर्या ११.

प्रेमा फाराचि मजवरि यास्तवही प्रेम बद्ध चित्तानें ॥
अपराध वळें कल्पुनि रुसलीच असेल त्या निमित्तानें ॥ ११ ॥

बरें पुढें काय बोलते तें ऐकूं तर खरें.

**भानुमती**— अगे त्या नकुलाचें सुंदर रूप पाहून मी फार उत्सुक झालें.

**दुर्योधन**—काय ह्मणतेही? नकुलाचें सुंदर रूप पाहून मी फार उत्सुक झालें? आँ, तर काय ही त्या माद्रीसुतावर अनुरक्त होऊन माझी अशी प्रतारणा करिते काय? (कांहीं कल्पना मनांत आणून, "प्रेमा फाराचि मजवरि" ही आर्या पुनःह्मणतो.) हा मूढा दुर्योधना, अरे ही जारिणी तुझी आंतून अशी प्रतारणा करीत असतां तूं आपणास व्यर्थ मोठें मानून घेतोस तर आतां कां बोलत नाहींस. हाँ आतां समजलों. ह्यासाठींच मोठ्या सकाळीं एकांत स्थळीं जाऊन बसणें आणि सखीजनाशीं गुजगोष्टी सांगणें आवडलें तें! दुर्योधना तूं तर काम मोहित होऊन जारिणीचें हृदय नजाणतां विश्वासानें स्वस्छ राहिलास. हा रांडे दुष्टे, निर्लज्जे,

१ जळ.

### श्लोक १२.

भीरुत्व माझ्या पुढतींच तैसें ॥ मागें तुझें साहस कर्म ऐसें ॥
प्रेमा तुझा मद्विषयीं कसागे ॥ चित्तीं असा दुष्पथ काय वागे ॥१२ ॥

### आर्या १३.

चित्तींह्मणतों तुज मी साध्वीकीं सत्कुलीं तुझें जन्म ॥
दाउनि विश्वास मला पापिष्ठे करिशि हें असें कर्म ॥ १३ ॥

**सुवदना**— मग पुढें काय झालें.

**भानु०**— मग मी मोठ्या त्वरेनें ह्या ठिकाणीं लतागृहांत शिरलें, इतक्यांत माझ्या मागून तोही आंत आला.

**दुर्यो०**— कायहो ह्या पापिष्ठेचें जारिणीसारखें पाप कर्म हें! अगे निर्लज्जे.

### श्लोक १४.

जेथें मदीय[1]रतिनिर्भर हार्द[2]योग ॥
आलीस तूं कथित मत्सुरतोपभोग ॥
तेथेंच दु[3]श्चरित आत्म सखी जनाला ॥
नाहींच लाज तुज आज कथावयाला ॥ १४ ॥

**दोघी**— मग पुढें काय झालें ?

**भानुमती**— त्या नकुलानें गर्विष्ठपणानें आपला हात पुढें करून माझ्या स्तनावरचा पदर ओढला.

**दुर्योधन**— ( मनांत ) काय ? त्यानें गर्विष्ठपणानें आपला हात पुढें करून माझे स्तनावरचा पदर ओढला, असें ह्मणते काय ? झालें तर, आतां या पुढची गोष्ट काय ऐकावयाची आहे. असो, आतां जाऊन परस्त्रीच्या आंगास हातलावणारा जो दुष्ट माद्रीसुत नकुल त्याचे प्राण घेतों. (असें ह्मणून चालता होतो. पुनः मनांत ह्मणतो.) क-

---

१ प्रीतीचा अतिशय. २ सुखें विलास. ३ दुर्वृत्त.

झाला, पहिल्यानें हिचेच तुकडे पाडावे. (असें मनांत आणून माघारा फिरतो.)

दोघी– बाईसाहेब, मग पुढें काय झालें ?

भानु०– इतक्यांत मी महाराजांच्या प्रभातकाळच्या मंगलवाद्यांचा आणि वारांगनांच्या गायनाचा शब्द ऐकून जागी झालें.

दुर्यो०– काय जागी झालें ह्मणते? यावरून हिनें स्वप्नांतली गोष्ट सांगितली असें सिद्ध होतें.

(विचार करून.) आसो यावर तिची सखी काय बोलते त्यावरून स्पष्ट होईल.

दोघी– (विषाद पावून एकमेकींकडे पहातात.)

सुवदना– यांत जें काय अनिष्टसूचक असेल त्याचा भागिरथीप्रमुख पवित्र नद्यांच्या जलस्पर्शानें परिहार होवो, आणि ब्राह्मणांच्या आशीर्वादानें व अग्नीच्या हवनानें अरिष्ट नाशाप्रत पावो.

दुर्यो०– आतां विपरीत कल्पना करणें नको. ही सारी स्वप्नांतली गोष्ट आहे. असें असतां म्यां मूर्खानें भलतेंच मनांत आणिलें. बरेंझालें कीं, अशी गोष्ट घडली नाहीं.

### श्लोक १५.

अर्धी ऐकुनि गोष्ट मी न सहसा क्रोधें निघालों बरा॥
गोष्टीच्या कथनामधेंहि कठिणा नाहीं दिलें उत्तरा॥
द्याया प्रत्यया विमूढहृदया दैवें कथा संपली॥
मिथ्या दूषित जी तिणें बिरहिता पृथ्वीनसे जाहली॥१५॥

भानु०– अगे सखे, या स्वप्नांत शुभ काय आणि अशुभ काय तें मला सांग बरें.

दोघी– (एकमेकींकडे तोंडें करून आपणांत बोलतात) यांत कांहींच शुभ दिसत नाहीं. खोटें बोलावें तर अपराधी व्हावें. ही विश्वासानें विचारते त्यापक्षीं खरें असेल तेंच सांगावें हें बरें.

सुवदना— सखे भानुमती, खरें पुसशील तर, यांत कांहींच शुभ दिसत नाहीं. सारें अशुभच दिसतें. तर देवतांच्या आराधनानें आणि दूर्वादि मंगलपदार्थांच्या ग्रहणानें अशुभाचा परिहार होईल. स्वप्नांत नकुलादि क्रूर पशूंचें दर्शन, सर्पशतवध हीं चांगलीं नव्हत असें मोठमोठे ह्मणतात, ह्मणून मी ह्मणतें.

दुर्योधन— सुवदना खरें बोलली. नकुलानें शत सर्प मारिले आणि स्तनावरचा पदर ओढला हें सर्व अनिष्टसूचक आहे खरें, असें मला ही वाटतें. पाहिलें असतां असें आहे कीं,

**आर्या १६.**

स्वप्नाचे अर्थ कधीं सत्य कधीं ते असत्यही होती ॥
परि काय वदूं ही शत संख्या मज सानुजा कडे येती ॥ १६ ॥

(इतक्यांत डावा डोळा लवलासें दाखवितो.) अरे मला दुर्योधनाला हीं असलीं दुश्चिन्हें भिववितात काय? (गर्वयुक्त होऊन) तथापि हीं दुश्चिन्हें भित्र्याला भिवविणारीं, यांची गणना दुर्योधन करितो काय? याविषयीं अंगिराऋषीचें वचन आहे.

**श्लोक १७.**

ग्रहें[1] संचरितें स्वप्नें दुश्चिन्हें ही उपश्रुति ॥
कदाचित् सत्यही होती बुधं त्यांस न मोजिती ॥ १७ ॥

यासाठीं स्त्रीस्वभावेंकरून भानुमतीच्या हृदयांत जी भीति उत्पन्न झाली आहे ती दूर केली पाहिजे.

भानु०— अगे सुवदने, हा भगवान् सहस्रकर सूर्य उदयाचलावर किती आला पहा. संध्याराग[2] जाऊन याचें मंडळ पहा कसें स्वच्छ आणि दैदीप्यमान दिसतें तें!

तरलिका— खरेंच बाईसाहेब, क्रुद्धपुरुषाच्या कर्णा प्रमाणें आरक्त[3] याचें

१ ग्रहांचीं राश्यंतरें. २ उदयकाळचा तांबडा रंग. ३ तांबडें.

किरणजाल[1] झालें आहे. आणि तें किरणजाल लतांच्या पल्लवसंधींतून ज्या ज्या भूमिभागावर पडलें आहे तो तो भूमिभाग कुंकुमानें सारविल्याप्रमाणें तांबडा दिसत आहे. असा हा सहस्ररश्मि सूर्य शत्रूसारखा नेत्रांनीं पाहण्यास अशक्य असा झाला आहे. तर रक्तचंदन रक्तपुष्पयुक्त अर्घ्यप्रदानेंकरून ह्याची पूजा करण्यास हा समय योग्य आहे.

भानु०— अगे तरलिके, माझें पूजापात्र घेऊनये. भगवान् सहस्ररश्मि सूर्ययाची मी पूजा करितें.

तरलिका— आज्ञा बाईसाहेब. ( असें ह्मणून बाहेर जाऊन पूजापात्र घेऊन आंत येते. ) हें आणिलें पूजापात्र. आतां भगवान् सहस्ररश्मि याची पूजा करावी.

दुर्यो०— प्राणसखीच्या जवळ जाण्यास हा समय चांगला आहे. ( हळूच जवळ जातो. )

सुवदना— ( राजाला पाहून ) अरे, महाराजांची स्वारी आली! हाय हाय! माझ्या प्रियसखीच्या पूजा नियमाचा भंग झाला !

भानुमती— ( राजा आला हें नजाणतां सूर्याभिमुख होऊन हात जोडून प्रार्थिते. ) हे आकाशमहासरोंच्यासहस्रपत्रका[2][3], हे पूर्वदिग्वधूच्यामुखमंडन[4] कुंकुमतिलका, हे सकलभुवनैकरत्नदीपका, हे भक्तदुरिततमोनाशका, बालार्का, हा मी तुला प्रणाम करितें. माझ्या स्वप्नानें जें काय अनिष्ट किंवा अशुभ दर्शविलें असेल तें ह्या तुझ्या प्रणामेंकरून बंधूसहवर्तमान माझ्या प्राणनाथास कुशलप्रद होवो. ( अर्घ्य देऊन ह्मणते. ) अगे तरलिके, आणखी फुलें दे, इतर देवतांची पूजा करावयास. ( फुलें घ्यावयास हात लांब करिते. ) ( राजा खुणेनें त्या दोघींस दूर सारून आपण फुलें घेऊन जवळ जातो, आणि तो तिच्या हातांत घालावयास लागतो. इतक्यांत हातास धक्का लागलासें करून फुलें खालीं पाडतो. )

---

१ समुदाय. २ मोठेंसरोवर. ३ कमळ. ४ भूषण.

भानु०— ( रोषानें. ) काय दांडगेपणा हा परिजनाचा ! ( वळून राजास पाहातांच भयानें लज्जित होते,

दुर्यो०— हे देवी, अशा सेवेविषयीं हा परिजन केवळ अनभ्यस्त आहे. तर यास नीट शिकविण्याविषयीं तूं समर्थ आहेस.

श्लोक १८.

प्राणप्रिये करि सहास कटाक्ष वृष्टी ॥
या सेवकावरि नको करूं वक्र दृष्टी ॥
बोलेमशीं मधुर मंजु उदार वाणी ॥
सेवेसि तत्पर तुझ्या असती स्वपाणी ॥ १८ ॥

भानुमती— मी कांहीं नियम धरण्याचें मनांत आणिलें आहे त्याविषयीं महाराजांची अनुज्ञा असावी.

दुर्यो०— मला समजलें. मी तुझा स्वप्नवृत्तांत सर्व ऐकिला. तूं उगेंच आपल्या सुकुमार देहास दुःख देऊं नको.

भानु०— महाराज, स्वप्न पाहून मला मोठी शंका उत्पन्न झाली आहे. त्याच्या शांत्यर्थ मी कांहीं नियम धरणार आहें. तर याविषयीं आपण अनुमोदन दिलें पाहिजे.

दुर्यो०— (गर्वानें) अगे, कशाला ही शंका मनांत धरिलेस? पहा.

श्लोक १९.

ज्या सेनाधरणीस कांपविति जे द्रोणादि सेनापती ॥
तूतें खेदजरी फलश्रुति[1]मला त्यांची[2] असे कोणती ॥
माझ्या भ्रातृशतांचिया भुजतरूछायेंत कीं राहसी ॥
तूं दुर्योधनकेसरींद्र[3]गृहिणी शंका तुला कायसी ॥ १९ ॥

भानु०— महाराज, आपण जवळ असतां मला शंका धरण्याचें प्रयोजन नाहीं जशी महाराजांची मर्जी असेल तसें.

दुर्यो०— सखे, माझी मर्जी एवढीच आहे कीं, यासमयीं तुजबरोबर यथेष्ट विहार करावा.

---

१ उपयोग. २ सेना आणि सेनापति. ३ दुर्योधन सिंहाचीस्त्री.

## श्लोक २०.

प्रेमदर्शनतनिर्मीलितलोचन तेजहरी फुलत्या कमळाचें ॥
लाजबहूतचि यास्तवभाषण अस्फुट हास्यहि मंदजयाचें ॥
देउनिचुंबनशांतकरींमन यासमर्थी तुझिया वदनाचें ॥
हाकरि पूर्णमनोरथ सुंदरि इच्छित हेंचिमदीय मनाचें ॥ २० ॥

(इतक्यांत पडद्यापलीकडे मोठा शब्द होतो.)

(सर्व कान देऊन ऐकतात.)

भानु०— (भय पावून राजास आलिंगिते.) महाराज मला संभाळा.

दुर्यो०— (चहूंकडे पाहून) सखे भिऊंनको. हा वारा सुटला आहे.

## ओंव्या २१.

वायुवेगें कडाडती ॥ ढाळ्या उडोनि गगनीं जाती ॥
धुळीचे कल्लोळ ऊठती ॥ व्याप्तहोती दशदिशा ॥ १ ॥
गरगरफिरतां अतिसत्वर ॥ वरती चढती पांसुनिकर ॥
अंतरिक्षीं ध्वजाकार ॥ स्तंभदिसती धुळीचे ॥ २ ॥
भूमि पृष्ठावरोनिखडे ॥ उडोनिजाती चोहींकडे ॥
स्कंधघर्षणीं अग्निपडे ॥ धूमपुंज उठताती ॥ ३ ॥
प्रासादांचियाशिखरीं ॥ शिरतां गवाक्षा भीतरी ॥
नवीन मेघांचियापरी ॥ गंभीरध्वनी उद्भवती ॥ ४ ॥
हीप्रचंड वाताची उकळी ॥ शांतहोईलअल्पकाळीं ॥
मीअसतां तुझ्याजवळी ॥ कांव्यर्थ भीशी भयशीले ॥ ५ ॥

सुवदना— महाराज, खरेंच ह्या वाऱ्यानें पहा कसा अनर्थापात केला आहे तो. धुळीनें सर्वांचे डोळे भरून गेले, झाडांमाडांचा चुराडा झाला, याच्या भयंकर शब्दानें खासपागेंतील घोडे उधळून बाहेर पडले, रस्ते बंद झाले. आतां काय होतें असा लोकांस धाक पडला आहे, तर हा उच्छेदकारी[1] भयंकर वारा सुटला आहे तोंवर आपण ह्या

१ सर्वांचा नाशकरणारा.

खजीन्याच्या बंगल्यांत प्रवेश करावा असें मला वाटतें.

दुर्यो०– (आनंद पावून) वाहवा! कायहो, ह्या वाऱ्यानें मज सुयोधनावर केवढा उपकार केला हा! ज्याच्या प्रसादें करून देवीनें आपाप नियम सोडून माझा मनोरथ पूर्ण केला. कसा तो पहा.

श्लोक २२.

मोडीनाभ्रुकुटी न बाष्पसलिलें नेत्रांसकीं झाकिलें॥
नाहींत्रासुनि आनना फिरविलें नाहींमला वारिलें॥
हेइभंगपयोधरा अशिमिटी घालीतसे ही मला॥
जोमोडीनियमास तो मज खरा वारा सखा वाटला॥ २२॥

मी पूर्णमनोरथ झालों. आतां पाहिजे तसा विहार करण्यास कांहीं अडचण नाहीं. तर आतां ह्या खजिन्याच्या बंगल्यांत प्रवेश करावा खरा.

(सर्वजण वाऱ्यानें पीडित होऊन चालतात.)

(दुर्योधन भानुमतीस ह्मणतो.)

श्लोक २३.

हळु हळू सखि पाउल टाकणें॥ त्यजुनिभीति तुवांनच कांपणे॥
पडसि यास्तव तूं निजबाहुनीं॥ दृढ धरी मजला कवटाळुनी॥२३॥

(प्रवेश करून) ही जागा चोहींकडून कोंडलेली आहे ह्मणून येथें वाऱ्याची पीडा कमी वाटते. हे प्राणसखे, आतां डोळ्यांवरची धूळ पुसून खुशाल डोळे उघड. कांहीं भिऊं नको.

भानु०– ह्या मेल्या उत्पातवायूची पीडा एकदाची टळली, बरें झालें.

सुवदना– महाराज, बंगल्याचा जिना चढून वर जाण्याविषयीं आमच्या प्रियसखीच्या मांडयांत सामर्थ्य राहिलें नाहीं. मग महाराज अझून येथेंच कां आसनावर विराजमान होत नाहींत?

दुर्यो०– (भानुमतीकडे पाहून) कायगे प्राण सखे, तुला ह्या वाऱ्यानें फारच उपद्रव दिला नाहीं बरें? उलटें तुझ्या अवयवांनीं वाऱ्यास साह्य केलें.

### दिंडा २४.

नेत्र तुझे वीशाळ या गुणानें ॥ धूलि बाधा देतसे अधिक मानें ॥
ऊर आक्रमिला पीन कुचभरानें ॥ श्वास देतो तुज फार दुःख दानें ॥ १ ॥
मंद मंदहि चालशी गजगतीनें ॥ तुझ्या मांड्या कांपती पीन जघनें ॥
साह्य केलें तुझिया अवयवानें ॥ ह्मणुनि पीडा दीधली तुला पवनें ॥ २ ॥

( सर्व खालीं बसतात. )

**दुर्योधन—** प्राणसखे, खालीं आसन नाहीं कांहीं नाहीं. आशा कांण शिला तलावर कां बसतेस ? माझ्या मांडीवर बस ये.

### श्लोक २५.

लोलांशुकास अनिलें अपनीत वास ॥
त्वत्दृष्टि हारि ममलोचन बांधवांस ॥
रछापावयाचिर तुझ्याजघन स्थलास ॥
माझें मृदूरूयुगयोग्य जसें तशास ॥ २५ ॥

( इतक्यांत कवाड उघडून घाबऱ्या घाबऱ्या कंचुकी आंत येतो. )

**कंचुकी—** महाराज, मोडलें तुमचें, मोडलें.

( सर्व सभय होऊन पाहातात. )

**दुर्यो०—** अरे काय ह्मणतोस काय ?

**कंचुकी—** महाराज, मोडलें तुमचें भीमें.

**दुर्यो०—** आँः कायरे बडबडतोस ?

**भानु०—** कायरे बाबा, ही अनर्थाची विपरीत गोष्ट बोललास ?

**दुर्यो०—** अरे पुरतें बोल कायतें. असें अर्धें अर्धें काय बोलतोस.

**कंचु०—** ( सभय होऊन ) थांबा महाराज सर्व सांगतों ऐका.

### श्लोक २६.

मोडिलें तुमचें भीमें मारुतें रथ केतन ॥
पडलें भूतळीं घंटा शब्दें करितरोदन ॥ २६ ॥

दुर्यो०— अरे प्रचंड वारा सुटला होता त्याच्या वेगानें सर्व भुवन कंपित झालें. तेव्हां रथाचा ध्वज मोडला असेल. यांत आश्चर्य काय आणि उगीच, मोडलें तुमचें, मोडलें तुमचें, ह्मणून ओरडत सुटलास यास काय ह्मणावें ?

कंचु०— नाहीं महाराज, कांहीं नाहीं. परंतु ह्या दुष्ट चिन्हाची शांति करण्याविषयीं महाराजांस विनंती केल्यावांचून या सेवकाला राहवेना ह्मणून हा ओरडला. याची क्षमा आसावी महाराज.

भानु०— कांहीं असो पण ब्राह्मणांच्या वेद घोषानें आणि अग्नीच्या हवनानें ह्या अरिष्टाची शांति महाराजांनीं करावी हें बरें.

दुर्यो०— ( अवज्ञा करून ) औं: यांत कशाचें अरिष्ट आणि कशाची शांति. बरें तुह्मी इच्छा असली तर कां होईना. अरे विनयंधरा, सुमित्रपुरोहिताला सांग जा ह्याची शांति करावयास.

कंचु०— आज्ञा महाराज. (असें ह्मणून निघून जातो.) ( इतक्यांत द्वारपालिका प्रवेश करून राजा जवळ जाऊन मोठ्या उद्वेगानें ह्मणते.)

द्वारपालिका— जयजयकार असो. महाराज, आपल्या मेव्हण्याची माता आणि आपली बहीण दुःशीला उभयतां द्वारापाशीं आल्या आहेत. महाराजांची भेट घ्यावयास इच्छितात.

दुर्यो०— (आपल्या मनांत) काय जयद्रथाची माता आणि आमची ताई दुःशीला ह्या आल्या! ह्या यासमयीं कां आल्या बरें? कदाचित् अभिमन्युवधानें क्रुद्ध झालेल्या पांडुपुत्रांनीं कांहीं भलतेंच तर केलें नसेलना! (उघडपणें) जाजा दोघींस लौकर आंत घेऊन ये.

द्वारपा०— आज्ञा महाराज, (असें ह्मणून बाहेर जाते आणि दोघींस घेऊन आंत येते ) ( जयद्रथमाता आणि दुःशीला घाबऱ्या घाबऱ्या जवळ जातात आणि डोळ्यांत आसवें आणून दुर्योधनाच्या पायांवर पडतात. )

ज० माता— कुरुनाथ आमचें संरक्षण करो.

दुःशाला— ( रडूंलागते. ) दादा आतां काय करूं ?

दुर्यो०– ( त्वरेनें उठून ) बाई स्वस्थ असा. झालें तरी काय ? समरांगणीं वीरजयद्रथास कुशल आहेना ?

ज० माता– बाबा, कशाचें कुशल.

दुर्यो०– कांबरें असें कां ह्मणतां ?

ज० माता– ( साशंक होऊन ) राजा, पुत्रवधानें क्रुद्ध होऊन अर्जुनानें आज घोरप्रतिज्ञा केली आहे कीं, आज सूर्यास्त झाला नाहीं तों मी जयद्रथाचा वध करीन. —आतां पुढें कसें करावें ?

दुर्यो०– ( किंचित् हांसून ) हाँ, हेंच्र बाईच्या आणि ताईच्या अश्रुपातास कारण. पुत्रशोकानें संतप्त होऊन अर्जुनानें बडबड केली असेल, त्यामुळें ह्यांची अशी अवस्था झाली असावी. काय बायकांचा वेडेपणाहा ! बाई, दुःख करूंनका. ताई, नकोगे डोळ्यांस पाणी आणूं. अगे वेडे, ह्या, दुर्योधनाचे बाहुपरिघ ज्याचें रक्षण करतात त्या महारथी जयद्रथास विपत्ति देण्याजोगा प्रभाव अर्जुनामध्यें कोठचा असणार बरें ? हें कसें तुमच्या मनांत येत नाहीं ? तुह्मी कां उगीच घाबरतां ?

ज० माता– बाबा, पुत्रवधाच्या रोषानें ज्यांचा कोपावल प्रदीप्त झाला आहे असे ते पांडव वीर हातावर शिर घेऊन तयार झाले आहेत. ते काय न करतील ?

दुर्यो०– ( उपहास करून ) असेंच आहे. पांडवांचा रोष कितपत आहे तो सर्व जनांस विदित आहे पहा.

श्लोक २७.

जेव्हां राजसभेंत वस्त्र कचही दुःशासनें वोढिले ॥
पांचाळीप्रति पाहुनी सकळही गौगौं असें बोलिले ॥
तेव्हां काय सभेंत गांडिव[1]धनुर्धारी नव्हता जया ॥
रोषक्षत्रिय वंशजा सुतरूणा आली न लज्जा तया ॥ २७ ॥

ज० माता– आणखी असें ऐकतों, कीं जयद्रथवधाची प्रतिज्ञा सिद्धीस न-

[1] अर्जुन.

गेली, तर आत्मवध करीन. असें ही तो बोलून गेला आहे.

**दुर्यो०—** असें जर आहे तर आनंद मानावयाचा सोडून व्यर्थ खेद कां करितां ? आतां बंधूसहवर्तमान युधिष्ठिराची खचित समाप्ति झाली असें माना. बाई तुम्हांला एकच सांगतों. तुमच्या पुत्राचें नांव ही काढावयास अर्जुनाच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या आंगीं शक्ति नाहीं. कांकीं, आह्मी शंभर भाऊ त्याच्या संरक्षणाविषयीं तत्पर आहों. आणि कृपाचार्य, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कर्ण आदिकरून सर्व महारथी त्याच्या पाठीवर आहेत. येणेंकरून त्याच्या आंगीं असें तेज व असा पराक्रम वृद्धिंगत झाला आहे कीं, त्याजकडे पाहील कोण ? बाई, अझून तुह्मांला तुमच्या पुत्राचा पराक्रम ठावका नाहीं.

### श्लोक २८.

नाहीं कथा यम[1]युधिष्ठिर या तिघांची ॥
जे राहिले परि वृकोदर[2] सव्यसाची[3] ॥
त्यांतील एकहि न सिंधुपतीस[4] पाहे ॥
गांठावया समरिं कोण समर्थ आहे ॥ २८ ॥

**भानुमती—** महाराज, असें जरी आहे तरी धनंजयाची[5] प्रतिज्ञा जड दिसती. तेव्हां ही गोष्ट शंकास्पद खरी.

**ज० माता—** शाबास मुली, त्वां समयोचित भाषण केलें.

**दुर्यो०—** अहाहा ! मला दुर्योधनाला शंकास्थान पांडव ? काय बोलतेस हें ? पहा,

### श्लोक २९.

जयांचीं शस्त्रास्त्रें लखलखति विद्युत्समरणीं ॥
तसें माझे भाते बळजलनिधी ज्यां वरि धणी ॥
निजास्त्रें मेरूचे क्षण नलगतां फोडिति कडे ॥
अशा माझ्या कोट्यावधि फिरति सेना चहुंकडे ॥ २९ ॥

अगे पांडवांच्या आंगीं सामर्थ्य आहे किती हें तुला ठाऊक नाहीं

१ नकुलसहदेव. २ भीम. ३ अर्जुन. ४ जयद्रथ. ५ अर्जुनाची.

काय ? आणि तूंही अशी शंका धरितेस ? तुला कळलें ? पांडवांच्या सर्व प्रतिज्ञा पोकळ. यांत कांहीं अर्थ नाहीं. पहा,

### ओंवी ३०.

जीदुःशासनहृदयाच्यारुधिरपानीं ॥ जीदुर्योधनाच्याऊरुमर्दनीं ॥
प्रतिज्ञा केली पांडववीरांनीं ॥ ती जयद्रथवधीं जाणावी ॥ ३० ॥

बाई तुह्मी स्वस्थ जा, ताई, जा तूं कांहीं काळजी वाहूं नको.—कोण आहेरे तिकडे, माझा विजयरथ आणावयास सांग. मी समरांगणीं जाऊन मिथ्या प्रतिज्ञेनें दुसऱ्यांस भय घालणारा जो मूर्ख पृथेचा पोर त्याला शस्त्रपूत मरण नयेतां तो अग्नींत जळून मरेल असें करितों.

कंचुकी— ( प्रवेश करून ) महाराज रथ सिद्ध आहे.

### श्लोक २१.

बांधिल्या नवघटिका शुचिचामरें बहुलोंवती ॥
आयुधें बहुठेविलीं ध्वजउच्च ज्यासहि शोभती ॥
जोडिले हय ज्यास उत्तम भग्नशत्रुमनोरथ ॥
आणिला नृपते पहा करुनीहि सज्ज तुझारथ ॥ २१ ॥

दुर्यो०— सखे, आतां तूं अंतःपुरांत जा. मी समरांगणीं जाऊन मिथ्या प्रतिज्ञेनें दुसऱ्यास भय घालणारा जो पृथापुत्र त्याला अशस्त्रपूत मरणाचा उपदेश करितों.

( सर्व निघून जातात. )

---

दुसऱ्या अंकांतील पद्यें.

श्लोक, २१ आर्या ३, ओंव्या १३, साक्या १०, दिंड्या २, कटाव १.
एकून पद्यें ५०.

---

## द्वितीयअंकसमाप्त.

# अंक ३.

## स्थळ.

रणभूमि.

## पात्रें.

| | |
|---|---|
| राक्षसी वसागंधा | मांसाहारी वनचरी. |
| राक्षस रुधिरप्रिय | तिचा नवरा. |
| अश्वत्थामा | द्रोणाचार्याचापुत्र. |
| अश्वसेन | द्रोणाचा सारथी. |
| कृपाचार्य | अश्वत्थाम्याचा मामा. |
| दुर्योधन | मुख्यराजा. |
| कर्ण | दुर्योधनाचा मित्र. |

# वेणीसंहारनाटक.

## अंक ३.

( तदनंतर विक्राळ व बीभत्स वेष धरणारी राक्षसी येते. )

**राक्षसी—** ( वेडेंवाकडें तोंड करून मोठयानें हंसून हर्षानें बोलते. ) मेलेल्या माणसांचें मांस खाण्याकरितां म्यां वसांनीं[१] हजार घागरी भरून ठेविल्या आहेत. बरीच चंगळ झाली. आतां रात्रंदिवस माणसांचें रगतपीत जाईन आणि मांस खात जाईन. ईश्वर करो आणि ही लढाई शंभर वर्षेपर्यंत अशीच चालो. ( नाचत नाचत मोठ्या हर्षानें ह्मणते. ) आहा ! जयद्रथवधाच्या दिवशीं अर्जुनानें सैन्याचा जसा सप्पा उडविला तसाच जरतो रोज रोज करील तर माझ्या घरांतील कोठारें मांस रक्तांनीं तोंडो तोंड भरून आमची खूप बेगमी होईल. बरें, पण आतां माझा आवडता नवरा रुधिरप्रिय कोठें असेल कोण जाणें. तर ह्या समरांगणांत त्याला शोधलें पाहिजे (इकडे तिकडे फिरते.) असो मोठ्यानें आरोळी मारावी ह्मणजे जवळ पास असला तर येईल. (मोठ्यानें आरोळी मारते.) अरे रुधिरप्रिया! अरे रुधिरप्रिया! इकडेये इकडेये. (इतक्यांत तिच्या सारखा विक्राळ वेषधारी राक्षस येतो. )

**राक्षस—** (थकल्यासारखें करून) यावेळेस जर नुकत्या मारलेल्या माणसाचें ऊन्ह ऊन्ह रगत आणि मांस मिळतें तर माझा थकवा क्षणांत नाहींसा झाला असता.

**राक्षसी—** (पुनः हाक मारते.)अरे रुधिरप्रिया, इकडेये.

**राक्षस—** (हाक ऐकून )अरे मला कोण हाक मारतें? (पाहून ) काय ही माझी लाडकी बायको वसागंधा हाक मारते! (जवळ जाऊन )अगे माझे लाडके वसागंधे, कां मला हाक मारीत होतीस?

**राक्षसी—** अरे रुधिरप्रिया, हें म्यां तुझ्याकरितां ताजें मांस आण ताजें र[२]

---

१ चरबी. २ कलल.

गत आणिलें आहे. नुकताच कोणी मोठा लठ्ठ राजर्षि पडला होता त्याच्या शरीरापासून हें काढून घेतलें आहे. यांत चरबी पुष्कळ आहे. हें खाऊन तर पहा कसें लागतें तें!

**राक्षस**– (आनंद पावून) शाबास वसागंधे शाबास, फार चांगलें केलें त्वां. मला बळकट ताहान लागली आहे. यावेळेस त्वां ताजें रगत मला आणून दिलें काय मौज झाली!

**राक्षसी**– रुधिरप्रिया अरे ज्या समरांगणांत हजारों माणसें, हत्ती, घोडे वरचेंवर मरून पडत आहेत, त्यांच्या मांसाचा चिखल आणि रक्ताच्या नद्या होत आहेत. अशा समरांगणांत तूं फिरत असतां ताहानेनें फार पीडित झालों ह्मणतोस हें मोठें आश्चर्य वाटतें!

**राक्षस**– (क्रोधयुक्त होऊन) अगे वसागंधे, काय मला येवढेंच काम आहे? पुत्रघटोत्कचाच्या शोकेंकरून आपल्या स्वामिणी हिडिंबादेवीचें त्द्दय संतप्त झालें आहे, ह्मणून तिच्या समाचारास मी गेलों होतों.

**राक्षसी**– अरे रुधिरप्रिया, अद्यापि आपल्या स्वामिणी हिडिंबादेवीचा पुत्रशोक शांत झाला नाहीं काय?

**राक्षस**– अगे, शोक शांत कोठून होणार. कांतर, अभिमन्यूच्या वधामूळें समदुःखी ज्या सुभद्रा आणि द्रौपदी ह्या तिचें सांत्वन करीत बसल्या आहेत. तेव्हां शोकाची शांति तर दूरच, पण वृद्धिमात्र होत आहे.

**राक्षसी**– रुधिरप्रिया, तूं फार दमला आहेस. यास्तव हत्तीच्या डोक्यांतील ताजें रुचकर मांस आणिलें आहे हें थोडें खा आणि थोडेंसें रक्त पी.

**राक्षस**– (तसें करून समाधान पावतो.) वसागंधे, आतां खरेंच सांग, बरें त्वां वसा[1], रुधिर[2], आणि मांस किती सांठवून ठेविलें आहे?

**राक्षसी**– अरे रुधिरप्रिया, पहिला सांठा तर तुला ठाउकच आहे. आतां नवा साठा सांगतें ऐक. भगदत्ताचें रुधिर एक घागर, जयद्रथाच्या वसा दोन घागरी, शिवाय विराट, भूरिश्रवा, सोमदत्त, बाल्हीक इत्यादि मोठमोठे राजे आणि इतर पुरुष ह्यांच्या रुधिरवसामांसांच्या हजार घागरी भरून दादरे बांधून घरांत ठेवल्या आहेत.

---

१ चरबी. २ रक्त.

राक्षस– (आनंदानें तिला आलिंगन देऊन) शाबास माझे सुघरणी शाबास. ह्या तुझ्या सुघरणपणानें आणि स्वामिणी हिडिंबादेवीच्या कामगिरीनें माझें दारिद्र्य पळालें.

राक्षसी– रुधिरप्रिया, स्वामिणी हिडिंबादेवीनें कोणती कामगिरी तुला सांगितली?

राक्षस– आज स्वामिणी हिडिंबादेवीनें मला बहुमानानें बोलावून आज्ञा केली कीं, हेरुधिरप्रिया, आजपासून तूं समरामध्यें राजपुत्र भीमसेन ह्याच्या पाठीमागून हिंडतजा. आतां तसें जेव्हां मी करूं लागेन तेव्हां हतमनुष्यांच्या मांसाचा चिखल आणि रक्ताच्या नद्या पाहून माझी ताहानभूक हरेल, आणि त्यामुळें मला येथेंच स्वर्गलोक प्राप्त झाला असें वाटेल. आतां तूंही स्वस्थ होऊन निःशंकपणें रुधिर वसा मांस ह्यांच्या आणखी हजार घागरी भरून संग्रहीं ठेव.

राक्षसी– बरें पण, रुधिरप्रिया, त्या भीमसेनाच्या पाठीमागून कशासाठीं हिंडलें पाहिजे?

राक्षस– अगे वसागंधे, महाराजा भिमसेनानें दुःशासनाच्या हृदयाचें रक्त पिण्याविषयीं प्रतिज्ञा केली आहे. तें रक्त आह्मीं राक्षसांनींच भीमसेनाच्या देहीं प्रवेश करून प्यावें असा आमच्या स्वामिणीचा अभिप्राय आहे.

राक्षसी– (हर्षित होऊन) शाबास स्वामिणी शाबास, माझ्या नवऱ्याला ठीक योग्य कामगिरी सांगितली.

(इतक्यांत पडद्यापलीकडे मोठा कलकलाट होतो. दोघें कान देऊन ऐकतात.)

राक्षसी– (ऐकून किंचित् घाबरून ह्मणते) अरे रुधिरप्रिया. कशाचा बरें हा गलबला ऐकूं येतो.)

राक्षस– (पाहून) अगे वसागंधे, धृष्टद्युम्नानें द्रोणाचार्यांवर निकर मांडला आहे. तो असाकीं, द्रोणाचार्यांचे केश धरून त्यास समरांगणीं ओढून खड्गानें त्याचा गळा कांपावा अशा बेतांत तो धृष्टद्युम्न आहे.

**राक्षसी**– (हर्ष पावून) रुधिरप्रिया, अरे रुधिरप्रिया, तर चला आप जाऊं आणि त्या द्रोणाचें ताजें रक्त पिऊं.

**राक्षस**– (सभय होऊन) छी छी वसागंधे, असें मनांत आणूं नको, ब्राह्मणाचें रगत गळ्याला जाळीतच जाईल आंत, ह्मणून त्याच इच्छा करूं नको हो.

(पुनःगलबला होतो.)

**राक्षसी**– रुधिरप्रिया, फिरून हा गलबला कशाचा ऐकूं येतो?

**राक्षस**– (तिकडे पाहून) अगे हा अश्वत्थामा, हातांत नागवी तरवार घे ऊन इकडेसच येत आहे. वड्याचें तेल वांग्यावर तशी गत हा धृष्ट द्युम्नावरच्या क्रोधामुळें कदाचित् आमचेंच कांडात काढील कीं काय नकळे! याकरितां चला आपण येथून जाऊं.आणि स्वामिणी हिडिं बादेवीनें जी आज्ञा केली आहे ती करूं. (असें बोलून दोघे निघून जातात.)

(इतक्यांत हातांत नागवी तरवार घेऊन गलबला ऐकत अश्वत्थामा येतो, आणि तोंडानें बोलतो.)

**ओंव्या १**

महाप्रळयींच्या मारुतें[1]॥ क्षोभविल्या घनांचीं गर्जितें॥
त्यांच्या चंडप्रतिध्वनीतें ॥जो वारंवार अनुकारी[2]॥ १॥
जो श्रवणीं पडतां भयंकर॥ द्यावा[3] पृथ्वीचें अंतर॥
भरोनि व्यापी गिरिकंदर॥ ऐसाहा शब्द कोठील॥ २॥
हा वाटे अश्रुतपूर्व॥ घोर कोलाहलरव॥
सेनासमुद्रा पासाव ॥ आज किंनिमित्त उद्भवला॥ ३ ॥

(अंमळ मनांत विचार करून)

हाँ खरें, अर्जुन, भीम, किंवा सात्यकी ह्या तिघांतून कोणी तरी ए- कानें आपल्या तारुण्याच्या मदेंकरून अमर्यादपणे माझ्या पित्यास

१ वाऱ्यानें. २ अनुकरण करी. ३ स्वर्ग.

क्षोभविलें असेल. ह्मणून तात द्रोणाचार्य हा शिष्यप्रीतीचा त्याग करून आपल्या पराक्रमास योग्य असें कांहीं समरकर्म करीत असेल असें वाटतें

### श्लोक २.

जें दुर्योधन पक्षपात सदृश प्राणांत्ययीं[1] वाटलें ॥
जें शस्त्र ग्रहणास योग्यअपुल्या वीर्यास ही भासलें ॥
जें क्रोधास धनुर्धराधिपतिला जें योग्यसें पाहिलें ॥
मत्तातें रिपुघस्मरें[2] सरंभसें[3] तेंकर्म आरंभिलें ॥२॥

( पाठीमागें पाहून ह्मणतो ) आतां रथाची वाटपाहून उपयोग नाहीं शस्त्र हातांत आहेच. स्वतां पायांनींच समरभूमीस जावें. (असेंह्मणून चालूं लागतो,—( इतक्यांत डावा डोळा लवलासें करून ह्मणतो) अ- रे जो संग्राम महोत्सवाच्या आनंदानें परिपूर्ण, आणितात द्रोणाचार्या- च्या पराक्रमाच्या दर्शनाविषयीं उत्सुक[4] अशा मला अश्वत्थाम्यालाहीं दुश्चिन्हें भिववून समरगमनास विघ्न करतात काय? असो, मी तर हा निघालोंच. ( गर्वानें चालता होतो, आणि पुढें पाहून ह्मणतो.) अहो हें काय झालें! हीं चतुरंग सैन्यें कांपळत सुटलीं! यांनीं क्षात्रधर्माचा त्याग केला किंवा लज्जेचा उत्सर्ग[5] केला, किंवा स्वामिकार्याची यांस विस्मृति पडली, ह्मणून हीं रणभूमि सोडून आपल्या कुलाकडे, वयाकडे व नांवा- कडे, नपाहातां तडक पळत आहेत. त्यांचाच हा गलबला उठला आहे खरा. (न्यहाळून पाहून) हाय हाय धिक्कार असो. अहो हे महारथ क- र्णादिवीर तेही समरापासून पराङ्मुख होतात. माझा तात द्रोणाचार्य सेनापति असतां सैन्याची अशी अवस्था व्हावी काय ? असो आपण ह्यांस हाक मारून मागें फिरवावें. (हाक मारतो) अहो वीरहो, अहो कौरवसेनासमुद्राच्या मर्यादेचें पालन करणारे महामहीधर[6] हो, पुरे पुरे आतां तुमचें समरपरित्यागरूप साहस, फिरा, माघारे फिरा. काय तुह्मांस ह्मणावें ? अहो कांहीं विचार करा.

---

१ मरणसमयीं. २ शत्रुनाशकें. ३ वेगानें. ४ उत्कंठित. ५ त्याग. ६ पर्वत.

### श्लोक ३

समरसोडुनि मृत्युचुकेजरी ॥ रणपलायनयुक्त दिसेतरी ॥
परिअवश्यजना मरणें असे ॥ मळवितां स्वयशास तुह्मीकसे ॥ ३ ॥

### आणखी श्लोक ४

जो शत्रुसेना जलधीस और्व[1] ॥ धन्वीगुरू[2] मानिति ज्यासिसर्व ॥
सेनापतीतो असतां तुह्मांतें ॥ कांभीतसां सोडुनि विक्रमातें ॥ ४ ॥

### आणखी श्लोक ५

कर्णाकृपासोडुनि संभ्रमातें ॥ जावें तुह्मी त्या समरांगणातें ॥
घेऊनि चापा रणधूरवाहे ॥ मत्तात आतां भय काय आहे ॥ ५ ॥

( पडद्यापलीकडे शब्द होहो )

कोठचारे बाबा अझून तुझा तात !

**अश्वत्थामा**— ( ऐकून) काय ह्मणतां? कोठचा अझून तुझा तात ? हारे क्षुद्रांनो, हा समरभिऱ्यांनो, काय तुह्मी बडबडतां असें ! हें बोलतांना तुमची जिव्हा सहस्रधा विदीर्ण[3] कशी न झाली ! अद्यापि तसें कांहीं झालें नाहीं. पहा,

### श्लोक ६

विश्वें जाळूं प्रखर किरणीं अर्क नाहीं उदेले ॥
नाहीं वारे दिशिदिशि तसे सप्तधाभिन्न झाले ॥
नाहीं केलें प्रळयजलदीं छन्न आकाशसाचें ॥
रेपाप्यांनो अशुभचि[4] कसें बोलतां मत्पित्याचें ॥ ६ ॥

( इतक्यांत घायाळ झालेला द्रोणाचार्यांचा सारथी अश्वसेन घाबऱ्या घाबऱ्या येतो. )

**सारथी**— महाराज माझें रक्षण करा, माझें रक्षण करा ( असें बोलून पायां पडतो. )

---

१ वडवाग्नि. २ धनुर्धर. ३ चिरली. ४ वाईट.

अश्वत्थामा– ( त्याजकडे पाहून ) अहो हा माझ्या ताताचा सारथी अश्वसेन ! – आर्या अश्वसेना, त्रैलोक्याचें संरक्षण करण्यास समर्थ जो माझा तात द्रोण त्याचा तूं सारथी असतां मजपासून रक्षण इच्छितोस हें काय ?

सार०– [ गाडिवर आणून ] कोठचारे बाबा, अझून तुझा तात.

अश्व०– ( घाबरून ) काय तातच नाहीं ?

सार०– तर दुसरें कायरे बा ?

अश्व०– हातात २ [ असें ह्मणून मूर्छित पडतो. ]

सार०– महाराज, सावधव्हा, सावध व्हा.

अश्व०– [ सावध होतो, त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहतात. ) हा ताता, हा सुतवत्सला, हा लोकत्रयैकधनुर्धरा, हा परशुरामास्त्रसर्वस्वपात्रा, तूं मला सोडून कसारे गेलास ? हाय हाय आतां मी कोणाकडे पाहूं ?

सार०– महराज, असें काय करतां ? इतका अत्यंत शोक करूं नका वीरपुरुषांस जी विपत्ति उचित तीच तुमच्या पित्यास प्राप्त झाली असतां तुह्मी शोक कां करतां ? आतां तुह्मी ही तदनुरूप वीर्यें करून शोकसागर तरून सुखी व्हा.

अश्व०– ( आसवें ढाळून ) आर्या अश्ववेना, सांग सांग बरें, येवढा भुजवीर्य सागर जो माझा पिता तोही क्षणांत सुकून गेला, ही गोष्ट झाली तरी कशी ! खरेंच सांग बरें असें तर झालें नसेल ?

**श्लोक ७ चरणशः**

भीमापासुनि कायतो गुरु गदा ही दक्षिणा पावला ॥

सार०– शिव शिव असें मनांत आणूं नका .

अश्व०– [ दुसरा चरण ह्मणतो. ]

किंवा सोडुनि जिष्णुनें नयपथा आचार्य आसादिला ॥

सार०– असें तरी कसें होईल.

**अश्व०**— ( तिसरा चरण ह्मणतो. )

किंवा श्रीहरिनें सुदर्शन महाधारापथीं आगिला ॥

**सार०**— असें ही झालें नाहीं.

**अश्व०**— [ चवथा चरण ह्मणतो. ]

चौथ्यापासुनि मृत्युची स्वगुरूच्यां नाहींच शंका मला ॥ ७ ॥

**सार०**— महाराज, कसें झालें तें सांगतों ऐका.

### श्लोक ८.

रुद्रापरी कुपित जाहलिया गुरुशी ॥
भीमादि काय करितील बरोबरीशी ॥
शोकामुळें समरशस्त्रहि टाकिजेलें ॥
तें कर्म तुच्छ रिपुनें अति घोर केलें ॥ ८ ॥

**अश्व०**— सुता, शोकामुळें शस्त्र टाकलें ह्मणतोस काय? माझ्या तातास शोकाचें आणि शस्त्र परित्यागाचें काय बरें कारण झालें ?

**सार०**— महाराज, आपणच कारण झालां.

**अश्व०**— काय मीच कारण झालों ? कसारे ?

**सार०**— ऐकावें महाराज, आपण कारण कसे झालां तें सांगतों. [ अश्रु ढाळून ]

### श्लोक ९.

अश्वत्थामा हत अशि पृथासूनुची[1] स्पष्ट उक्ती ॥
झाली शेतेगज अशि हळू बोलण्याची सुयुक्ती ॥
ती ऐकोनी दयिततनयें[2] त्याचिया प्रत्ययानें ॥
अस्त्रें[3] शस्त्रें समचि समरीं टाकिलीं त्वत्पित्यानें ॥ ९ ॥

**अश्व०**— हातात, हा सुतवत्सल, हा शौर्यराशे, हा शिष्यप्रिय, हा युधिष्ठिर पक्षपातिन्, माझ्यासाठीं व्यर्थ त्वां जीविताचा परित्याग केला. हायरे ताता, आतां मी तुला कोठें पाहूं ?

**सार०**— महाराज हें काय असें करतां ? तुह्मां सारख्यांनीं असें अतिदुः-

१ धर्मराजाची. २ द्रोणानें. ३ अश्रु.

ख करूंनये. तुह्मी असे दीन झाल्यावर आह्मीं काय करावें ! आह्मांकडे पहा.

**अश्व०**— [ शोक करतो. ]

### पद १०

कैसेंटाकूनियांमजला ॥ वाटलेंजावेंसेंतुजला ॥धृ०॥ ऐकुनिमाझावधखोटा ॥ झालाशोकतुलामोठा ॥ नेणुनिशत्रूच्याकपटा ॥ केलास्वहिताचातोटा ॥ कसाबातुलामोहपडला ॥ वाटलेंजावेंसें तुजला ॥१॥ पुत्रप्रेमास्तवजाणा ॥ सहसाटाकुनिधनुबाणा ॥ सोडिलेआपुलियाप्राणा ॥ बातूवीरांचाराणा ॥ कांहींधीरनसेधरिला ॥ वाटलेंजावेंसेंतुजला ॥२॥ कैसें० ॥ जरिमजगेलासोडुनितात ॥ तरीमीआहेंकींजीवंत ॥ ऐशाक्रूरसुतींसंतत ॥ धरिलास्नेहव्यर्थचित्तांत ॥ अरिनींकसाघातकेला ॥ वाटलेंजावेंसेंतुजला ॥३॥ ऐसाअश्वत्थामाशूर ॥ झालापितृशोकानेंचूर ॥ वाहतिनेत्रांतुनिजलपूर ॥ होताजवळसूतचातूर ॥ त्यानेंबहुत बोध केला ॥ सावधहोउनियांउठला ॥४॥

**अश्व०**— (पुनः मोह पावतो. सारथी त्यास सावध करितो. इतक्यांत खिन्न होत्साता कृपाचार्य येतो.)

**कृपाचार्य**— (आपणाशीं बोलतो)

### श्लोक ११

धिक्सानुजा कुरुपतीस[1] युधिष्टिरातें ॥
धिक् भूभृतां[2] विफल शस्त्र धरां आह्मांतें ॥
केशग्रह[3] प्रकट तैं द्रुपदात्मजेचा[4] ॥
ज्यांहीं असे निरखिला अजि हा गुरूंचा[5] ॥११॥

तस्मात् अश्वत्थाम्यास कसें आह्मीं तोंड दाखवावें ? आणि काय त्याशीं बोलावें अथवा त्याचें हृदय वज्रासारखें कठोर आहे, आणि लोकांची स्थिति त्यास विदित आहे त्यापक्षीं त्याचेठायीं अत्यंत शोकाची शंका करावी नलगे. परंतु पित्याचा असंभावनीय

१ दुर्योधनास. २ राजांस. ३ केशओढणे. ४ द्रौपदीचा. ५ द्रोणाचा.

परिभव ऐकून या वेळेस तो काय करीत असेल कोण जाणें! किंवा

### आर्या १२.

एका कचग्रहाचा झाला परिणाम दारुण असा हा ॥
ह्या दुसऱ्याचा वाटे निश्चित बुडतील सर्व लोक अहा ॥१२॥

( निरखून पाहून ) अहो, वत्स अश्वत्थामा येथेंच आहेहा. बरें त्याच्या जवळ जाऊं. (जवळ जाऊन घाबरून ह्मणतो. ) वत्सा, अश्वत्थाम्या, सावधहो, सावधहो.

अश्व०– [ सावध होतो आणि डोळ्यांत अश्रू आणून बोलतो ] हा ताता, हा सकलभुवनैकगुरो, आतां तुला कोठें पाहूं? [ आकाशाकडे पाहून ] अरेरे युधिष्ठिरा, अजातशत्रो, सत्यवादिन् अरे तुझें सद्धार्मिकत्व[1] आजकोठें गेलें ?

### श्लोक १३.

जन्मापासुनिही असत्य वदणें नाहींच केलें जनीं ॥
तूंतें सर्व अजातशत्रु ह्मणती कीं द्वेष नाहीं मनीं ॥
मत्तातीं अपुल्या गुरुद्विजवरीं त्वां आजि केलें असें[2] ॥
मत्दुर्दैवबळें तुझें सकळ तें[3] अस्तासि गेलें कसें ॥ १३

सारथी– महाराज, तुमचा मामा कृपाचार्य तुमच्या मागें जवळच उभा आहे. त्याकडे पहा.

अश्व०– [मागें पाहून ] मामा ! अरे मामा, तूं एकटा आलास आणि तो कोठें आहे ?

### श्लोक १४.

ज्या सेनापतिच्या बरोबरचि तूं गेलासि कींरे रणा ॥
शूरांच्या गुरुयुद्धकंडुशमनीं जो होतसे नीषणा[4] ॥
ज्याशीं चित्रविनोद नित्य करिशी ज्याला असेना तुला[5] ॥
भर्त्ताश्लाध्यहितो तुझ्या भगिनिचा गेलाकुठे मातुला ॥ १४ ॥

---

१ धर्मनिष्ठपणा-२ असत्यभाषण. ३ सद्धार्मिकत्व- निसंणाखगर २ साम्य-

ख करूंनये. तुह्मी असे दीन झाल्यावर आह्मीं काय करावें ! आह्मांकडे पहा.

अश्व०— [ शोक करतो. ]

पद १०

कैसेंटाकूनियांमजला ॥ वाटलेंजावेंसेंतुजला ॥धृ०॥ ऐकुनिमाझावधखोटा ॥ झालाशोकतुलामोठा ॥ नेणुनिशत्रूच्याकपटा ॥ केलास्वहिताचातोटा ॥ कसाबातुलामोहपडला ॥ वाटलेंजावेंसें तुजला ॥१॥ पुत्रप्रेमास्तवजाणा ॥ सहसाटाकुनिधनुबाणा ॥ सोडिलेआपुलियाप्राणा ॥ बातूवीरांचाराणा ॥ कांहींधीरनसेधरिला ॥ वाटलेंजावेंसेंतुजला ॥२॥ कैसें०॥ जरिमजगेलासोडुनितात ॥ तरिमीआहेंकींजीवंत ॥ ऐशाक्रूरसुतींसंतत ॥ धरिलास्नेहव्यर्थचित्तांत ॥ अरिनींकसाघातकेला ॥ वाटलेंजावेंसेंतुजला ॥३॥ ऐसाअश्वत्थामाशूर ॥ झालापितृशोकानेंचूर ॥ वाहतिनेत्रांतुनिजलपूर ॥ होताजवळसूतचातूर ॥ त्यानेंबहुत बोध केला ॥ सावधहोउनियांउठला ॥४॥

अश्व०— (पुनः मोह पावतो. सारथी त्यास सावध करितो. इतक्यांत खिन्न होत्साता कृपाचार्य येतो.)

कृपाचार्य— (आपणाशीं बोलतो)

श्लोक ११

धिक् सानुजा कुरुपतीस[1] युधिष्ठिरातें ॥
धिक् भूभृतां[2] विफल शस्त्र धरां आह्मांतें ॥
केशग्रह[3] प्रकट तैं द्रुपदात्मजेचा[4] ॥
ज्यांहीं असे निरखिला अजि हा गुरूचा[5] ॥११॥

तस्मात् अश्वत्थाम्यास कसें आह्मीं तोंड दाखवावें ? आणि काय त्याशीं बोलावें अथवा त्याचें ह्रदय वज्रासारखें कठोर आहे, आणि लोकांची स्थिति त्यास विदित आहे त्यापक्षीं त्याचेठायीं अत्यंत शोकाची शंका करावी नलगे. परंतु पित्याचा असंभावनीय

१ दुर्योधनास. २ राजांस. ३ केशओढणें. ४ द्रौपदीचा. ५ द्रोणाचा.

परिभव ऐकून या वेळेस तो काय करीत असेल कोण जाणें! किंवा

**आर्या १२.**

एका कचग्रहाचा झाला परिणाम दारुण असा हा ॥
ह्या दुसऱ्याचा वाटे निश्चित बुडतील सर्व लोक अहा ॥१२॥

( निरखून पाहून ) अहो, वत्स अश्वत्थामा येथेंच आहेहा. बरें त्याच्या जवळ जाऊं. (जवळ जाऊन घाबरून ह्मणतो. ) वत्सा, अश्वत्थाम्या, सावधहो, सावधहो.

अश्व०– [ सावध होतो आणि डोळ्यांत अश्रू आणून बोलतो ] हा ताता, हा सकलभुवनैकगुरो, आतां तुला कोठें पाहूं? [ आकाशाकडे पाहून ] अरेरे युधिष्टिरा, अजातशत्रो, सत्यवादिन् अरे तुझें सद्धार्मिकत्व[1] आजकोठें गेलें ?

**श्लोक १३.**

जन्मापासुनिही असत्य वदणें नाहींच केलें जनीं ॥
तूतें सर्व अजातशत्रु ह्मणती कीं द्वेष नाहीं मनीं ॥
मत्तातीं अपुल्या गुरुद्विजवरीं त्वां आजि केलें असें[2] ॥
मत्दुर्दैवबळें तुझें सकळ तें[3] अस्तासि गेलें कसें ॥ १३

सारथी– महाराज, तुमचा मामा कृपाचार्य तुमच्या मागें जवळच उभा आहे. त्याकडे पहा.

अश्व०– [मागें पाहून ] मामा ! अरे मामा, तूं एकटा आलास आणि तो कोठें आहे ?

**श्लोक १४.**

ज्या सेनापतिच्या बरोबरचि तूं गेलासि कीं रे रणा ॥
शूरांच्या गुरुयुद्धकंडुशमनीं जो होतसे नीषणा[4] ॥
ज्याशीं चित्रविनोद नित्य करिशी ज्याला असेना तुला[5] ॥
भर्त्ताश्लाध्यहितो तुझ्या भगिनिचा गेलाकुठे मातुला ॥ १४ ॥

---

१ धर्मनिरुपणा-२ असत्यभाषण. ३ सद्धार्मिकत्व- निसंणाखगर २ साम्य-

कृपाचार्य– वत्सा, आज तो गेला, उद्यां आपणाला जावयाचें आहे. आतां व्यर्थ इतका शोक करूं नको. पुरे आतां शोक करून कांहीं फळ नाहीं.

अश्व०– मातुला, बरें तर, आतां मी दुःखशोकाचा त्याग केला. आतां जिकडे माझा सुतवत्सल तात तिकडे हा मी चाललों पहा.

कृपाचार्य– वत्सा, असें अविचाराचें करणें तुझ्या सारख्याला योग्य नव्हे.

सार०– महाराज, असें अतिसाहस करूं नका.

अश्व०– आर्या, काय बोलतोस हें ? अरे पहा.

श्लोक १५.

मद्वियोगभयें गेला परलोकास येथुनी ॥
ऐशा वत्सल[1] ताताला देऊं विरह[2] मी कसा ॥ १५ ॥

कृपाचार्य– बाबारे, संसार ह्मटला ह्मणजे परलोकयात्राही सिद्धच आहे. तर जे सत्पुत्र आहेत त्यांनीं या लोकीं आणि परलोकीं पित्याची सेवा करावी हें योग्यच आहे. पहा·

आर्या १६.

येथेंही पितरांचें ऋण फेडाया समर्थ होशील ॥
श्राद्धांजलि दानानें जाउनियां अधिककाय करशील ॥ १६ ॥

सार०– महाराज, कृपाचार्यमामा ठीक ह्मणतात.

अश्व०– आर्या, तुह्मी ह्मणतां तें सारें खरें आहे. परंतु काय करूं ! हा शोकभार माझ्यानें सोसवत नाहीं. मी तातावांचून क्षणभरही प्राणधारण करण्यास समर्थ नाहीं. यास्तव जेथें माझा दयाळू तात आहे तेथें मी जाईन. आणि त्याला पाहून सुखी होईन. ( शोकाच्या वेगानें उठतो. उठतां उठतां शस्त्राकडे पाहून ह्मणतो. ) आतां शस्त्रधा

१ दयाळू. २ वियोग.

रण करणें पुरे. हे भगवंता शस्त्रा, आतां मी तुला येवढीच प्रा
र्थना करतों.

### श्लोक १७.

जेणें तूं धरिलेंस आत्मविजया नाहीं जरी योग्यता ॥
ज्याच्या शौर्यबळें तुला विषयतो झाला नसे कोणता ॥
तेणें तूं त्यजिलेंस पुत्रविषयें शोकें भयानें नसो ॥
शस्त्रा मीहि तुला तसा त्यजितसें कल्याण तूतें असो ॥ १७ ॥

( असें ह्मणून शस्त्र टाकावयास सिद्ध होतो. इतक्यांत पडद्याबाहेर मोठ्यानें शब्द होतो. ) अहो राजांनो, अहो वीरांनो, ह्या महानुभाव गुरुद्रोणाचार्यांचा परिभव ह्या दुष्ट घातक्यानें केला असतां तुह्मी सारे ह्याची कशी उपेक्षा करतां ?

अश्व० — (ऐकून ) (हळू हळू शस्त्राकडे हात नेतो. ) काय गुरु द्रोणाचा परिभव ? (पुनः पडद्या पलीकडे शब्द होतो. )

### साक्या १८.

समरीं सुत शोकास्तव केला ज्यानें शस्त्रन्यास[१] ॥
अश्रु जलानें भिजला ह्मणती त्रिभुवन गुरुही ज्यास ॥
कैसेंसंकट हेंवीरा ॥ कैशगिति झाली धीरा ॥ ध्रुवपद ॥ १ ॥
स्वकरें सर्वासमक्ष कापुनि त्याच्या पलित[२] शिरातें ॥
धृष्टद्युम्न निघाला जाया हा अपुल्या शिबिरातें[३] ॥
अन्याय सहायाचा ॥ किंवा उलट करा याचा ॥ ध्रुव० ॥

### ओंव्या १९.

त्रिभुवन गुरू आचार्य द्रोण ॥ पुत्र शोकें करूनि जाण ॥
जेणेंत्यागिलें धनुष्य बाण ॥ समरीं युद्ध सांडोनी ॥ १ ॥
शोकाश्रूंच्या प्रवाहेंकरून ॥ झालें जयाचें आर्द्र आनन ॥

---

१ शस्त्रत्याग. २ पिकल्याकेंसांच्या मस्तकातें. ३ डेऱ्यातें.

त्याच्या पलित शिरासी शिवोन ॥ नृशंस कर्म केलेंकीं ॥ २ ॥
प्रायोपविष्ट[1] ब्राह्मण ॥ असतां केलें मौलि खंडण ॥
कोण्हीं न केलें त्याचें वारण ॥ धिकार तुह्मां सर्वांतें ॥ ३ ॥
सर्वांसमक्ष क्रूर हिंसन ॥ करूनि चालिला धृष्टद्युम्न ॥
करितसे स्वशिबिरा गमन ॥ हेंकसें तुह्मां सोसवे ॥ ४ ॥

अश्व० — ( सक्रोध आणि सकंप होऊन कृपाचार्य आणि सारथी ह्यांस ह्मणतो ) कायहो, हें ऐकिलेंना ?

### श्लोक २०.

माझा गुरू पलितमौलि[2] निमीलिताक्ष[3] ॥
प्रायोपविष्ट[4] असतां नृपतीं समक्ष ॥
त्याच्या शिरांसि शिवला अतिनीचकर्मा ॥
शस्त्रें अशस्त्र असतां करुनी अधर्मा ॥ २० ॥

कृपाचार्य — असें ह्मणतात खरें.

अश्व० — काय — माझ्या ताताच्या मस्तकास दुष्टानें स्पर्श केला ?

सार०— ( भिऊन. ) हा त्या वीर शिरोमणीच्या परिभवाचा नवाच अवतार झाला.

अश्व० — हा ताता, हा पुत्रवत्सला, ह्या मज मंदभाग्याकरितां शस्त्रपरित्याग करून, त्या तसल्या नीचाच्या हातून आपली विटंबना करून घेतली ! काय बोलावें ! हाय हाय. अथवा कशाची विटंबना.

### श्लोक २१.

परित्यक्ता देहा समरिं सुतशोकांधमनसें ॥
शिवोंखाकीं काक द्रुपदसुत कोणी तरिं तसें ॥
बळाचा विद्येचा अभिमद जयां फार कटकीं ॥
शिरीं त्याच्या देतों न करपद जोडयासकट कीं ॥ २१ ॥

१ समाधिस्थ. २ पिकल्या केंसांचा. ३ डोळे झांकून. ४ ध्यानस्थ. ५ धृष्टद्युम्नातें.

हारे दुष्टा पांचाल[1]कुलाधमा, हें कर्म करतांना तुला भय वा-टलें नाहीं काय ?

### ओंव्या २२.

रे मत्तातें शस्त्र ठेविलें ॥ हें निश्चयें जाणोनि वहिलें ॥
निर्भय पण चित्तीं मानिलें ॥ यथेष्ट कर्म करावया ॥ १ ॥
निःशंक होऊनि मानसीं ॥ मत्पित्याच्या उत्तमांगासी[2] ॥
स्पर्श करावया धांवलासी ॥ निर्भय पणें त्यावेळीं ॥ २ ॥
पांचाळ सेना तूळराशी[3] ॥ लीलेनेंचि दश दिशांशीं ॥
जो समर्थ उडवावयाशी ॥ प्रत्यक्ष प्रलय मारुत ॥ ३ ॥
ऐसा अश्वत्थामा शूर ॥ अरिहंता धनुर्धर ॥
काय तुझ्या स्मृति पथावर ॥ नाहीं आला त्यावेळीं ॥ ४ ॥

अरेरे युधिष्टिरा, आजात शत्रो, सत्य वादिन्, धर्मपुत्रा, खरें च सांग बरें, तुझें किंवा तुझ्या भावांचें त्यानें काय वाईट केलें होतें ? अथवा याला काय ह्मणावें. हा खोट्या स्वभावाचाच, अरे अर्जुना, हे सात्यके, हे महाभुजा भीमा, हे माधवा, हें तुह्मास वास योग्यना ? अरे जो सुरासुरमनुष्यांत एक धनुर्धर, जो जातीचा ब्राह्मण त्यांत ह्मतारा, आणि जो सर्वांचा गुरु त्यांत विशेषें करून अश्वत्थाम्याचा बाप, अशा पुरुषाचा मस्तक त्या दुष्टा द्रुपदकुलकलंका नरपशूनें स्पर्शिला आसतां तुह्मीं उपेक्षिला. तर या ठिकाणीं उपेक्षा करणें तुह्मास बरें वाटलें ना ? अथवा हे सारेच पातकी, यांस बोलून फळ काय ? असो आतां एकच सांगतों.

### श्लोक २३.

ज्या ज्या शस्त्रधरीं तुह्मीं नृपशुनीं दुष्कर्म आरंभिलें॥
केलें वा आनुमोदिलें दुरुनियां दोषास या पाहिलें ॥
त्यांची भीम किरीटिकृष्णसकटां काढोनि मांसें पहा ॥
देतो मी सकळांदिशांस बळि हें मत्कर्म आतां सहा ॥ २३ ॥

---

१ धृष्टद्युम्ना. २ मस्तकास. ३ कापसाचा ढीग.

कृपा०— वत्सा, तूं काय नकरशील? शस्त्रास्त्र विद्येंत महापंडित आणि बळाचा सागर असा दुसरा द्रोणाचार्यच तूं. तुझे ठायीं कोणतीही गोष्ट नसंभवेल असें नाहीं.

अश्व०— अरे पांडव, मत्स्य, सोमक, पांचाळ, मागधेय आदिकरून दुष्ट क्षत्रियांनो, ऐका.

### श्लोक २४.

पित्याच्या शीर्षातें[1] सदरि शिवतां त्या भृगुसुतें ॥
कुठारें जें केलें श्रुतिंस[2] तुमच्या संगत नतें ॥
तसा अश्वत्थामा रिपुरुधिरसंसिक्त धरणीं ॥
करायातें सिद्ध त्वरित न कसा होइल रणीं ॥२४॥

अरे सूता, तूं जा आणि संग्रामाच्या सर्व साहित्यासहित, आणि सर्व आयुधांसहित माझा लढाईचा मोठा रथ लवकर घेऊन ये.

सार०— आज्ञा महाराज, (असें ह्मणून रथ आणावयास निघून जातो.)

कृपा०— वत्सा, ह्या दारुण परिभवाग्नीचा प्रतीकार अवश्य केला पाहिजे खरा. तर आह्मां सर्वांमध्यें तुझ्यावांचून दुसरा कोण प्रतीकार करणारा आहे. ?

अश्व०— मग काय ह्मणतां मामा ?

कृपा०— ह्या समरांगणांत सर्व सैन्याची व्यवस्था करण्यासाठीं तुला सैनापत्याचा अभिषेक करवावा असें माझ्या मनांत आहे.

अश्व०— मामा, ही गोष्ट पराधीन आहे; आणि तसें करण्यांत ही कांहीं अर्थ नाहीं.

कृपा०— ही गोष्ट पराधीन आणि निरर्थक असें मनांत आणूंनको. पहा.

### आर्या २५.

भीष्मद्रोण विरहिता ही सेना सांग कोण रक्षील॥
तत्तुल्य[3] पराक्रम तूं बाजरि हीचा[4] पती न होशील ॥ २५ ॥

---

१ सार्भूचाशत्रुसहस्रार्जुन. २ श्रवणास. ३ भींष्म द्रोणतुल्य. ४ सेनेचा.

वत्सा, त्वां जर कमर बांधली तर त्रैलोक्य ही तुझ्या पुढें उभें राहावयास समर्थ होणार नाहीं. मग युधिष्ठिर सैन्याची कथा काय? मला वाटतें कीं, सैनापत्याचा अभिषेक तुला करावा, याविषयीं सिद्धता करून राजा दुर्योधन तुझी वाट पहात बसला असेल.

**अश्व०**— असें जर आहे तर पित्याच्या परिभवाग्नीनें जळणारें माझें चित्त त्याच्या प्रतिकारजळांत बुडण्याकरितां त्वरा करतें. यास्तव हा मी गुरुवधानें खिन्न झालेल्या कौरवेश्वरास भेटून सैनापत्यग्रहणाविषयीं आश्वासन देऊन त्याचा संताप कमी करतों.

**कृपा०**— वत्सा, ठीक आहे. असेंच केलें पाहिजे. चला आपण तिकडेसच जाऊं. (असें ह्मणून दोघे चालते होतात.)

(इतक्यांत कर्ण आणि दुर्योधन दोघे येतात.)

**दुर्योधन**— कर्णा शूराची गोष्ट अशी आहे.

### श्लोक २६.

तेजस्वी[1] रिपुहतबंधु[2] होय जोतो ॥
शस्त्रानें उतरुनि दुःखपार जातो ॥
आचार्यें[3] सुतनिधनासि ऐकिजेलें ॥
कां शस्त्रग्रहसमयींच[4] टाकिजेलें ॥२६॥

अथवा, थोरांची ह्मण आहे ती खरी आहे. कीं, "मुळचा स्वभाव सुटत नाहीं." पहा, जेव्हां त्याचें अंतःकरण शोकानें आणि मोहानें व्याकुळ झालें, तेव्हां त्यानें तत्काळ क्षात्रधर्माचा कर्कशपणा सोडून मुळच्या ब्राह्मणस्वभावास अनुरूप अशी कोमळता अंगीकारली.

**कर्ण**— राजा कौरवेश्वरा, तूं ह्मणतोस असें नव्हे. खचीत.

**दुर्यो०**— कसें तर मित्रा!

**कर्ण**— कसें तें मी सांगतों ऐक. त्याच्या मनांतली गोष्ट निराळीच

---

१ शूर. २ शत्रूनीं ज्याचे बांधव मारिले. ३ द्रोणाचार्यें. ४ शस्त्रग्रहणाचेवेळेस.

होती. ती अशी कीं, अश्वत्थाम्याला आपण राज्यपदावर बसवावें. मग जेव्हां ती गोष्ट मुळींच नाहींशी झाली, तेव्हां आपण वृद्ध ब्रा' ह्मण, आतां आपणास शस्त्रग्रहण कशास पाहिजे? करून तरी पुढें काय कर्तव्य आहे? असें मनांत आणून त्यानें शस्त्र टाकलें.

**दुर्यो०**— (डोकें हालवून) मित्रा, खरी गोष्ट सांगितली त्वां.

**कर्ण**— खरी ह्मणजे, संशय काय? आणि ह्यासाठींच त्यानें मुख्य मुख्य वीरांच्या वधाविषयीं उपेक्षा केली. त्याच्या मनांत कीं सर्व राजां' नीं कौरव पांडव ह्यांचा पक्ष धरून मोठा संग्राम करावा, आणि सर्वांचा क्षय व्हावा, ह्मणजे आपला मनोरथ सिद्ध होईल.

**दुर्यो०**— खरेंच. तूं ह्मणतोस हें जुळतें खरें.

**कर्ण**— अणखी दुसरी गोष्ट सांगतों. राजा, ह्या द्रोणाचा कपटी स्वभाव लहानपणापासून द्रुपदराजाला ठाऊक होता, ह्मणूनच त्यानें ह्याला आपल्या राष्ट्रांत राहूं दिलें नाहीं.

**दुर्यो०**— शाबास कर्णा, फार चांगला तर्क केला त्वां.

**कर्ण**— हें मीच ह्मणतों असें नाहीं. तूं दुसऱ्या कोणत्याही चौघां शाहा' ण्यांस विचार. ते तरीं हेंच सांगतील.

**दुर्यो०**— खरेंच आहे तें. यांत काय संशय. असें जर नसतें तर तसें कां होतें?

**आर्या २७.**

देऊनि अभयवीरें द्रोणें अरिभीत सिंधुरायाला[१] ॥
केली कशी उपेक्षा वधितां कां वारिलें न विजयाला ॥२७॥

(इतक्यांत कृपाचार्य आणि अश्वत्थामा उभयतां येतात)

**कृपाचार्य**— (पुढें पाहून अश्वत्थाम्यास ह्मणतो.) वत्सा हा पहा सुयोधन सूतपुत्रा[२]सहवर्तमान त्या वडाच्या झाडाखालीं सावलींत बसला आहे.

**अश्वत्थामा**— खरेंच मामा, चला आपण जवळ जाऊं.

**दोघे**— (जवळ जाऊन) हे राजा, विजय असो.

---

१ जयद्रथाला. २ कर्ण.

दुर्यो०— (त्यांजकडे पाहून) कोण! कृपाचार्य? अश्वत्थामाही? (असनाखालीं उतरतो) (कृपाचार्यास) गुरो मी अभिवंदन करतों. (अश्वत्थाम्यास) आचार्यपुत्रा, येरेवा मला भेटूं दे. (त्यास भेटून जवळ बसवितो. आणि गीत गातो)

## गीत २८.

आह्मांकरितांतुझ्याताते ॥ समरींटाकुनियांशस्त्रातें ॥ केलेंगमनस्वर्लोकातें ॥ बाअश्वत्थाम्या ॥१॥ तुझ्यासुंदरअवयवांनीं ॥ गाढालिंगनमंजलागोनी ॥ द्यावें आतांत्वराकरूनी ॥ बाअश्वत्थाम्या ॥ २ ॥ तुझ्याबाहूंचाहास्पर्श ॥ वाटेतुझियापित्यासदृश ॥ बोलूंआतांसावकाश ॥ बाअश्वत्थाम्या ॥ ३ ॥ शोकावस्थेंतहीअसतां ॥ गात्रींआलीरोमांचितता ॥ भेदनाहींपहिल्याआतां ॥ बाअश्वत्थाम्या ॥

(अश्वत्थाम्यास आलिंगून जवळ बसवितो.)

अश्व०— (डोळ्यांवाटे अश्रु ढाळितो.) राजा, माझा तात कोठें आहे? हे ताता!

कर्ण— द्रोणपुत्रा, कां आतां उगीच शोकाग्नींत आत्मा जाळितोस?

दुर्यो०— आचार्यपुत्रा, ह्यासंकटीं तुझ्या माझ्या दुःखांत कांहीं अंतर नाहीं. पहा,

## आर्या २९.

त्वत्तात मज्जनकसख विद्यागुरुही तुतें तसा मातें ॥
तन्निधनदुःख अन्या कितिसांगूं तूंचि जाणसी यातें ॥ २९ ॥

कृपा०— वत्सा, राजा बोलतो तशीच गोष्ट आहे.

अश्व०— राजा, तूं असा माझा पक्षपाती असतां, म्यां आपला शोकभार हलका करावा हें योग्य आहे. परंतु मला इतकेंच वाईट वाटतें.

## आर्या ३०.

मी असतां का माझ्या तातें केशग्रहास पावावें ॥
मग कैसें बापांनीं पुत्रापासूनि भव्य इच्छावें ॥ ०३ ॥

होती. ती अशी कीं, अश्वत्थाम्याला आपण राज्यपदावर बसवावें. मग जेव्हां ती गोष्ट मुळींच नाहींशी झाली, तेव्हां आपण वृद्ध ब्राह्मण, आतां आपणास शस्त्रग्रहण कशास पाहिजे? करून तरी पुढें काय कर्तव्य आहे? असें मनांत आणून त्यानें शस्त्र टाकलें.

**दुर्यो०**— (डोकें हालवून) मित्रा, खरी गोष्ट सांगितली त्वां.

**कर्ण**— खरी ह्मणजे, संशय काय? आणि ह्यासाठींच त्यानें मुख्य मुख्य वीरांच्या वधाविषयीं उपेक्षा केली· त्याच्या मनांत कीं सर्व राजांनीं कौरव पांडव ह्यांचा पक्ष धरून मोठा संग्राम करावा, आणि सर्वांचा क्षय व्हावा, ह्मणजे आपला मनोरथ सिद्ध होईल.

**दुर्यो०**— खरेंच. तूं ह्मणतोस हें जुळतें खरें.

**कर्ण**— अणखी दुसरी गोष्ट सांगतों. राजा, ह्या द्रोणाचा कपटी स्वभाव लहानपणापासून द्रुपदराजाला ठाऊक होता, ह्मणूनच त्यानें ह्याला आपल्या राष्ट्रांत राहूं दिलें नाहीं.

**दुर्यो०**— शाबास कर्णा, फार चांगला तर्क केला त्वां.

**कर्ण**— हें मीच ह्मणतों असें नाहीं. तूं दुसऱ्या कोणत्याही चौघां शाहाण्यांस विचार. ते तरीं हेंच सांगतील.

**दुर्यो०**— खरेंच आहे तें. यांत काय संशय. असें जर नसतें तर तसें कां होतें?

## आर्या २७.

देऊनि अभयवीरें द्रोणें अरिभीत सिंधुरायाला[1] ॥
केली कशी उपेक्षा वधितां कां वारिलें न विजयाला ॥२७॥

(इतक्यांत कृपाचार्य आणि अश्वत्थामा उभयतां येतात)

**कृपाचार्य**— (पुढें पाहून अश्वत्थाम्यास ह्मणतो.) वत्सा हा पहा सुयोधन सूतपुत्रा[2]सहवर्तमान त्या वडाच्या झाडाखालीं सावलींत बसला आहे.

**अश्वत्थामा**— खरेंच मामा, चला आपण जवळ जाऊं.

**दोघे**— (जवळ जाऊन) हे राजा, विजय असो.

---

१ जयद्रथाला. २ कर्ण.

दुर्यो०— (त्यांजकडे पाहून) कोण! कृपाचार्य? अश्वत्थामाही? (असें नाखालीं उतरतो) (कृपाचार्यास) गुरो मी अभिवंदन करतों. (अश्वत्थाम्यास) आचार्यपुत्रा, येरेबा मला भेटूं दे. (त्यास भेटून जवळ बसवितो. आणि गीत गातो)

## गीत २८.

आह्मांकरितांतुझ्यातातें ॥ समरींटाकुनियांशस्त्रातें ॥ केलेंगमनस्वर्लोकातें ॥ बाअश्वत्थाम्या ॥१॥ तुझ्यासुंदरअवयवांनीं ॥ गाढालिंगनमंजलागोनी ॥ द्यावें आतांत्वराकरूनी ॥ बाअश्वत्थाम्या ॥ २ ॥ तुझ्याबाहूंचाहास्पर्श ॥ वाटेतुझियापित्यासदृश ॥ बोलूंआतांसावकाश ॥ बाअश्वत्थाम्या ॥ ३ ॥ शोकावस्थेंतहीअसतां ॥ गात्रींआलीरोमांचितता ॥ भेदनाहींपहिल्याआतां ॥ बाअश्वत्थाम्या ॥

(अश्वत्थाम्यास आलिंगून जवळ बसवितो.)

अश्व०— (डोळ्यांवाटे अश्रु ढाळितो.) राजा, माझा तात कोठें आहे? हे ताता!

कर्ण— द्रोणपुत्रा, कां आतां उगीच शोकाग्नींत आत्मा जाळितोस?

दुर्यो०— आचार्यपुत्रा, ह्यासंकटीं तुझ्या माझ्या दुःखांत कांहीं अंतर नाहीं. पहा,

## आर्या २९.

त्वत्तात मज्जनकसख विद्यागुरुही तुतें तसा मातें ॥
तन्निधनदुःख अन्या कितिसांगूं तूंचि जागसी यातें ॥ २९ ॥

कृपा०— वत्सा, राजा बोलतो तशीच गोष्ट आहे.

अश्व०— राजा, तूं असा माझा पक्षपाती असतां, म्यां आपला शोकभार हलका करावा हें योग्य आहे. परंतु मला इतकेंच वाईट वाटतें.

## आर्या ३०.

मी असतां का माझ्या तातें केशग्रहास पावावें ॥
मग कैसें बापांनीं पुत्रापासूनि भव्य इच्छावें ॥ ०३ ॥

कर्ण— द्रोणपुत्रा, येथें दुसऱ्यानें काय करावें? ज्यावर सर्वांचा भरंवसा त्यानेंच हातचें शस्त्र टाकलें, आणि आपली अशी अवस्था करून घेतली.

अश्व०— अंगराजा, आपण काय बोललां! दुसऱ्यानें काय करावें? ऐका काय करावें तें.

श्लोक २१.

जोजो या धर्मसैन्यीं स्वभुजबळमदें पाळितो आयुधाशी ॥
जोजो पांचाळवंशीं शिशुजरठयुवा[2][3][4] कीं असे गर्भवासी ॥
जोजो तत्कर्मसाक्षी ममरिपुह्रदयीं वागवी जो अहंता ॥
त्याचा त्याचाचि नोहे मज समज रणीं मृत्युचा ही निहंता ॥२१॥

हे जामदग्न्यशिष्या कर्णा, आणखी तुला सांगतों ऐक.

श्लोक २२.

तो हा देश अरातिशोणितभरें[5][6] डोहो जिथे पाडिले ॥
क्षत्रानें[7] गुरूचे तसेच कचही येथें बळें ओढिले ॥
शस्त्रें तींच अरातिदारणविभू आहेसकीं द्योतनें ॥
रामें आचरिलें तसेंचि करिजे द्रोणात्मजें क्रोधनें ॥ २२ ॥

दुर्यो०— आचार्यपुत्रा, तूं वीरनायक आहेस. तुझ्या शौर्याची बरोबरी कोण करणार आहे?

कृपा०— राजा द्रोणाचार्यांचे मागें ह्या महासंग्रामाचा सर्व भार आपल्या मस्तकीं घ्यावा असें ह्या द्रोणपुत्राच्या मनांत आहे. यावरून मला असें वाटतें, कीं तूं जर यास अधिकार देऊन उत्तेजन देशील तर हा लोकत्रयाचाही उच्छेद करण्यास समर्थ होईल. मग पांडवसैन्याची कथा काय! ह्मणून तुला सांगतों, कीं, याला सेनापत्याचा अभिषेक करावा.

१ हातीं भरतो. २ बाल. ३ वृद्ध. ४ तरूण. ५ शत्रु. ६ रक्ताचा पुरानें. ७ क्षत्रियानें.

दुर्यो०— ही तुमची योजना फार चांगली आहे, परंतु ह्या गोष्टीविषयीं पूर्वींच माझें कर्णाशीं वचन गेलें आहे.

कृपा०— राजा, हा द्रोणपुत्र अपार शोकसागरांत पडला आहे, यास्तव अंगराजाच्या भिडेकरितां यासमयीं याची उपेक्षा करणें योग्य नाहीं. हा तरी त्याच शत्रुमंडळीला शासन करणार. यवेळेस जर याचा सत्कार न केला आणि तूं ह्मणतोस तसें झालें तर याला दुःख होणार नाहीं काय?

अश्व०— राजा, कौरवेश्वरा, अद्यापि युक्तायुक्त विचार कशाचा करतोस? अरे तूं यासमयीं मजवर भार टाकून स्वच्छ झोंप घे. पहा,

### ओंव्या ३३.

राजा आजचि अकेशव ॥ त्रिभुवन करीन अपांडव ॥
सोमक पांचाळांचें नांव ॥ मात्र शेष राहील ॥ १ ॥
दावूनियां शौर्य धाटी ॥ महावीरांचिया थाटीं ॥
संपवीन संग्राम गोष्टी ॥ आजि सर्वांसमक्ष ॥ २ ॥
शस्त्रकुठारें करूनि जाण ॥ छेदुनिटाकितों क्षत्रकानन ॥
तोचि गुरुभार उतरोन ॥ सुखी करीन पृथ्वीतें ॥ ३ ॥
निश्चिंत होऊनि मानसीं ॥ तूं रमशील गाढ निद्रेशीं ॥
प्रयत्नें उठवितां तिजशी ॥ न सोडशील निश्चयें ॥ ४ ॥

कर्ण— बोलणें सोपें आहे, पण करणें फार कठीण आहे. असें कर्म करण्याजोगे पुरुष ह्या कौरवसैन्यांत पुष्कळ निघतील.

अश्व०— अंगराजा, कौरवसैन्यांत असें कर्म करण्याजोगे पुरुष पुष्कळ असतील खरे. मी नाहीं ह्मणत नाहीं. परंतु मी जें बोललों तें दुःख शोकाच्या वेगानें बोललों. केवळ गर्वानें वीर पुरुषांचा धिक्कार करावा या बुद्धीनें बोललों नाहीं.

कर्ण— मूर्खा, तुला कळत नाहीं. अरे जो दुःखित झाला त्यानें घरीं बसून अश्रु टाकावे, आणि जो शस्त्रधारी कुपित झाला त्यानें सम-

रांगणीं जाऊन पराक्रम करावा, हेंच योग्य. उगीच असली वडवड काय कामाची ?

अश्व०– (क्रोधयुक्त होऊन) अरेरे राधागर्भभारभूता, सूतापसदा[1], तूं माझी निंदा करतोस काय ?

कर्ण– हें तूं मला लावून बोलतोस काय ? तुला कळलें ?

श्लोक ३४.

सूत किंवा सूतपुत्र कोणी तरि असेन मी ॥
दैवाधीन कुलीं जन्म मदधीनचि पौरुष ॥ ३४ ॥

अश्व०– तूं मघां काय बोललास ? बोल पुन्हा. अरे मला अश्वत्थाम्याला अश्रूंनीं दुःखाचा प्रतिकार करावयास शिकवितोस काय ? शस्त्रानें नको ? पहा,

श्लोक ३५.

माझें शस्त्र तुझ्या परी न गुरूच्या शापें जळालें असे ॥
कीं सोडोनि रणा पलायन न मीं त्वां आजि केलें तसें ॥
नाहीं सारथिच्या कुलीं जनि मला कीं निंद्य नाहीं जिणें ॥
दुःखाचा प्रतिकार कां करिन मी असेंचि शस्त्राविणें ॥ ३५ ॥

कर्ण– (सक्रोध होऊन) अरे वाचाळा, अरे वृथा शस्त्रधारणकरणाऱ्या ब्राह्मणाच्या पोरा, ऐकतोस ?

श्लोक ३६.

सवीर्य किंवा निर्वीर्य म्यां आयुध न टाकिलें ॥
जसें पांचाळेंभीतानें त्वत्पित्यानें महाबलें[2] ॥ ३६ ॥

अश्व०– (क्रोधयुक्त होऊन) अरेरे रथकारकुलकलंका[3], अरे राधागर्भभारभूता, अरे अस्त्रविद्याऽनभिज्ञा[4], मूर्खा कर्णा, माझ्या ताताची देखील निंदा करतोस काय ? परंतु,

१ सूताधमा, २ धृष्टद्युम्नाला भिऊन. ३ सारथि कुलास डाग लावणाऱ्या. ४ अस्त्रविद्या नजाणणाऱ्या.

श्लोक २७.

तो शूर कीं भीरु असोचि तात ॥
प्रख्यात कीर्ती भुवनत्रयांत ॥
जें कर्म केलें समरीं पित्यानें ॥
तें जाणिजे नित्य वसुंधरेनें ॥ २७ ॥

अणखी श्लोक २८.

कां टाकिलें शस्त्र रणांत तेणें ॥
साक्षी पृथासूनुचि एक जाणें ॥
हें कर्म झालें समरांत जेव्हां ॥
होतासि कोठें रण भीरु तेव्हां ॥ २८ ॥

कर्ण— (किंचित् हांसून) हो हो मी भित्रा खरा. तूं मात्र मोठा पराक्रमी धैर्याचा आहेस नव्हे? तुझ्या पित्याला स्मरतां मला संशय उत्पन्न झाला. मूर्खा आणखी मी तुला असें विचारतों.

श्लोक २९.

जरि टाकिलें हातिचें शस्त्र वीरें ॥
निवारूं नये शत्रुला काय धीरें ॥
गळा कापितां शत्रु सर्वां समक्ष ॥
उदासीन कां बैसला युद्धदक्ष ॥ २९ ॥

अश्व०— (सक्रोध आणि सकंप होऊन) हा दुष्टा सूताधमा, तूं राजाचा आवडता झालास ह्मणून मोठी प्रौढी दाखवून भलभलती बडबड करतोस नव्हे?

श्लोक ४०.

समज तरि कसेंही दुःखितें कीं भयानें ॥
द्रुपदजशय[1] नाहीं वारिला मत्पित्यानें ॥

---

[1] धृष्टद्युम्नाचा हस्त.

परि भुजबळदर्पें निंदिशी काय त्यातें ॥
तव शिरिं पद डावा ठेवितों काढ यातें ॥ ४० ॥

( तसें करावयास उठतो. )

कृपा० आणि दुर्यो०— गुरु पुत्रा, क्षमा कर. ( असें ह्मणून त्याला मागें सारतात.)

अश्व०— ( पुनः चरण प्रहार करावयास जातो. )

कर्ण— ( क्रोध युक्त होऊन तरवार उपसून ह्मणतो )
अरे दुष्टा ब्राह्मणाधमा, तूं कशाला इतकी आत्मश्लाघा करतोस

**आर्या ४१.**

जात्या अवध्य असती परि जो त्वां पाय उंच हा केला ॥
तो मत्खड्गें तुटला हें पाहुंनि मारिशील हा केला ॥ ४१ ॥

अश्व०— अरे मूर्खा, मी जातीमुळें तुला अवध्य झालों काय? तर ही म्या जात टाकली पहा. कांहीं सामर्थ्य असेल तर ये माझा वध कर. नाहीं तर मी तुझा वध करतों. पहा,

**आर्या ४२ .**

मिथ्या प्रतिज्ञ करितों त्वत्घातें विजयभीड सोडोनी ॥
घे शस्त्रातें किंवा टाकुनि ये शरण हात जोडोनी ॥ ४२ ॥

( दोघे ही हातांत शस्त्रें घेऊन एक मेकांवर प्रहार करावयास उठतात . कृप आणि दुर्योधन त्यांचें निवारण करितात. )

दुर्यो०— गड्या, आचार्यपुत्रा, हातचें शस्त्र ठेव आतां.

कृपा०— सूत पुत्रा, तूं पण हातचें शस्त्र ठेव कसें.

अश्व०— मातुला, कां निवारण करतोस? हा दांडगा सूताधम माझ्या ताताची निंदा करतो. त्या अर्थी हा ही धृष्टद्युम्नाचा पक्षपाती आहे असें मी समजतों. तर याला मजपासून दंड भोगूंदे.

कर्ण— राजा, यावेळीं त्वां माझें निवारण करूं नये.

आर्या ४३.

क्रोधांध धीरपुरुषें शासन न करुनि उपेक्षिला नीच ॥
करितो बड बड फारचि तो यास्तव त्यास योग्य हानीच ॥४३॥

अश्व०— राजा, सोड सोड त्याला. माझ्या बाहूच्या रगड्यानें प्राणवियोग फळ त्याला लौकर मिळूंदे. राजा, कदाचित् तूं स्नेहास्तव किंवा आपल्या कार्य सिद्धीस्तव ह्या गुरुनिंदका दुष्टाला मज पासून राखावयास इच्छीत असशील तर हीं दोन्ही व्यर्थ आहेत. पहा,

आर्या ४४.

अतिनीच पापकर्मा हीनकुलोत्पन्न सूतज[१] सहाय ॥
शशिवंशभूषणाला तुज गुणवंतास योग्य हा काय ॥ ४४ ॥

आणखी आर्या ४५.

मारीन अर्जुनातें मी राजा काळजी नको वाहूं ॥
क्रोधें अकर्णविजया पृथ्वी करितोंचि बोल बापा हूं ॥४५ ॥

( असें बोलून कर्णावर प्रहार करावयास उठतो. )

कर्ण— ( खड्ग उचलून ) अरे वाचाळा ब्राह्मणाधमा, होतास कीं नव्हतास असा करून टाकतों पहा. राजा सोड सोड मला. या समयीं तूं माझें वारण करूं नको. ( अश्वत्थाम्यास मारावयास पाहातो. कृप आणि दुर्योधन त्याचें निवारण करतात. )

दुर्यो०— अरे कर्णा, अरे गुरुपुत्रा, काय हा तुमचा वेडेपणा! आज तुह्मांस झालें तरी काय ?

कृपा०— वत्सा अश्वत्थाम्या, गोष्टीचा अरंभ कोणत्या प्रकारचा आणि गेली कोणत्या थरास. काय वेडेपणा हा ? ह्या काळीं आपल्या राजमंडळीस आणि आपल्या सैन्यास हें संकट तुह्मांपासून प्राप्त होत आहे, ही एक विपरीत गोष्ट आहे !

अश्व०— मातुला, ह्या कटुभाषणकरणाऱ्या रथकारकुलकलंकाचे[२]

१ सारथि पुत्र. २ सारथ्याच्या कुलास कलंक लावणाऱ्या कर्णाची.

एकदा खय मोडावयाची मनांत आहे, पण काय करूं सांपडत नाहीं.

कृपा०- वत्सा, आपल्या पक्षांतील प्रधानपुरुषांशीं विरोध करण्याचा हा समय नव्हे बाबा.

अश्व०- मातुळा, असें जर आहे तर हें म्यां शस्त्र ठेवलें पहा.

श्लोक ४६.

जो हा पाप न पाविजेल निधना युद्धीं अरीच्या शरीं ॥
तों माझें प्रियशस्त्र म्यां त्यजियलें नेघेचि यातें करीं ॥
हा सेनापति होउ निर्भयपणे भीमार्जुनाच्या भयें ॥
वेडावेल तयीं कसा प्रियसखा जाणेळ राजा स्वयें ॥ ४६. ॥

( असें ह्मणून हातचें शस्त्र खालीं ठेवतो.)

कर्ण- ( हांसून ) तुह्मां सारख्यांनीं शस्त्र न टाकतां हातीं जरी ठेविलें तरी तें टाकल्या सारखेंच आहे. कांकीं हातीं असून उपयोग नाहीं.

श्लोक ४७.

माझ्या करीं जोंवरि धन्व बाण ॥
अन्यायुधें निष्फळ सर्व जाण ॥
माझ्या शरें होय न कार्यभाग ॥
अन्यें कसा तो करिजेल सांग ॥ ४७ ॥

( इतक्यांत पडद्या पलीकडे शब्द होतो. )

अरे दुष्टा, अरे द्रौपदीकेशांबराकर्षणरूप महापातककरणाऱ्या अरे धार्तराष्ट्रपुत्राधमा, फार दिवसांनीं माझ्या पुढें आला आहेस. हे क्षुद्रपशो, आतां कोठें जातोस? आणखी अरे राधेय दुर्योधन शकुनिप्रभृति पांडवद्वेष्टयांनो, अरे धनुर्धरहो, अरे मानधनहो, ऐका सर्व तुह्मी माझें भाषण.

श्लोक ४८.

जेणें राजसभेंत तें द्रुपदजा केशांसि आकर्षिलें ॥
जेणें त्या गुरूंच्या समक्ष सतिच्या वस्त्रास हीं ओढिलें ॥

ज्याचें फोडुनि वक्ष रक्त पिउं म्यां केली प्रतिज्ञा अहो ॥
तो हा मद्भुजपंजरीं गवसला राखा तुह्मी यास हो ॥४८॥

( सर्व कान देऊन ऐकतात. )

अश्व०— अहो अंगराज, कौरवसेनापते, अहो जामदग्न्यशिष्य, अहो द्रोणाचार्य निंदक, आपल्या भुजबलानें सकल लोकांचें संरक्षण करणारे आणि "माझ्या करीं जोंवरि धन्वबाण अन्यायुधें निष्फळ सर्व जाण" असें ह्मणणारे ते तुह्मीच ना? प्रसंग जवळच आला आहे. आतां पुढें व्हां आणि कांहीं सामर्थ्य असेल तर भीमसेनापासून त्या गरीबा दुःशासनाला सोडवा.

कर्ण— आँः जारे काय शक्ति आहे त्या भीमाची, कीं मी जिवंत असतां आमच्या युवराजाच्या छायेला ही स्पर्श करूं शकेल? युवराजा दुःशासना, भिऊंनको, भिऊंनको, हा मी आलों पहा ( असेंबोलून निघून जातो. )

अश्व०— राजा कौरवेश्वरा, हे कौरवसैन्य भीष्मद्रोणविरहित झालें असें पाहून भीमार्जुनानीं फार अनर्थ मांडला आहे. तर तुमच्या राधेयाच्या हातून त्या दोघां वीरांचें निवारण व्हावयाचें नाहीं; यास्तव आपणच स्वतां भावाला सोडविण्याकरितां जावें हें बरें.

दुर्यो०— आँः काय शक्ति आहे त्या दुष्टा भीमाची किंवा दुसऱ्याची! अरे मी शस्त्रपाणी दुर्योधन जिवंत असतां माझ्या वत्सा दुःशासनाच्या छायेस तरी कोणी हात लावूं शकेल काय? वत्सा, भिऊं नको. कोण आहेरे? माझा रथ लौकर आण. ( असें ह्मणून निघून जातो. )

अश्व०— ( पुढें पाहून ) मातुला, अरे हें पहा काय अरिष्ट आलें तें. अरे हा अर्जुन आपल्या भावाची प्रतिज्ञा सिद्धीस जावी या बुद्धीनें राधेय आणि दुर्योधन यांस अडविण्याकरितां त्या दोघांवर एकसारखी मोठी शरवृष्टि करीत त्यांच्या मागें लागला आहे, पहा. हाय हाय आतां कसें होईल? मला वाटतें खचीत भीमानें दुःशासनाच्या उरस्थळाचें रक्त प्राशिलें. आतां दुर्योधनाच्या भावाची विपत्ति माझ्यानें पाहावत नाहीं. मातुला, असत्य वचनाचा दोष मला पतकरला. आण आण माझें शस्त्र कोठें आहे.

आर्या ४९.

सत्याहुनि अनृत भलें स्वर्ग जळो दुर्गतीस जाईन ॥
भीमापासुनि दुःशासन राखायास खड्ग घेईन ॥ ४९ ॥

( असें ह्मणून खड्ग उचलावयास पाहातो. )
( इतक्यांत बाहेर मोठ्यानें शब्द होतो. )

हे महात्म्या भारद्वाजपुत्रा, अश्वत्थाम्या, त्वां आजपर्यंत कधींही सत्य वचनाचें उल्लंघन केलें नाहीं. यास्तव तूं आज सत्य वचन उल्लंघायास योग्य नव्हेस.

कृपा०— वत्सा, ही आकाशवाणी तुला अनृतापासून राखीत आहे.

अश्व०— काय ही देववाणी! मला संग्रामास जाण्याविषयीं अनुमोदन देत नाहीं काय? काय करावें आतां. ही मोठीच अडचण आली. काय सांगावें, देवही पांडवांचे पक्षपाती झाले! आतां खचीत भीमानें दुःशासनरुधिराचें पान केलें असावें. यांत कांहीं संशय नाहीं. काय हो संकटहें! अहो.

आर्या ५०.

दुःशासन रुधिराचें अरिकरितां पान मी उदासीन ॥
समरीं सुयोधनाचें दुसरें मग कोणतें हित करीन ॥ ५० ॥

मातुला, त्या मूर्खा राधेयावर क्रोध करून म्यां शस्त्र टाकिलें हें फार वाईट केलें. असो, आतां उपाय नाहीं. आतां तूं तरीं राजाच्या पाठीवर साह्य करावयास जा.

कृपा०— हा मी निघालों राजाचें साह्य करावयास. तूं ही शिबिरास जाऊन तेथेंच ऐस.

( असें बोलून दोघे निघून जातात. )

तृतीयअंकांतीलपदें.

आर्या १३. श्लोक ३०. ओंव्या १४. साक्या २. पदें २. एकूणपदें ६१.

---

तृतीयअंकसमाप्त.

# अंक ४.

## स्थळ.

समर विश्राम भूमि.

## पात्रें.

सारथी........................दुर्योधनाचा.
दुर्योधन........................कौरवराज.
भीमसेन........................धर्माचा भाऊ.
सुंदरक........................कर्णाचा दूत.

# वेणीसंहारनाटक.

## अंक ४.

(तदनंतर शरप्रहारें करून मूर्छित झालेल्या दुर्योधनास रथांत घालून नेणारा सारथी येतो.)

सार०– (घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे फिरतो.)

(इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो.)

अरेरे, भुजबळाच्या दर्पानें महासंग्रामास प्रवृत्त होऊन आपला मनोरथ पुरविणारे, आणि दुर्योधनाच्या पक्षपातास्तव आपल्या प्राणधनाचा पण लावणारे सकळ राजेहो, पहा पहा, दुःशासनास मारून त्याचें रक्त पिऊन राहिलेल्या रक्तानें आपलें सर्वांग ज्यानें माखिलें आहे, त्या भीमसेनाचा बीभत्स व भयंकर वेष पाहून त्या भयानें व त्रासानें ज्यांच्या हातची शस्त्रें गळत आहेत अशीं आपलीं सैन्यें पळत सुटलीं आहेत, त्यांचें तुह्मी आवरण करा, आवरण करा.

सार०– (अवलोकन करून) काय! हा कृपाचार्य, ज्याला सोन्याचे कळस आहेत, व शुभ्र चामरें लावलीं आहेत, आणि शिखरावर लावलेल्या उंच पताकांमुळें मात्र जो ओळखतां येतो, आणि गज अश्व पदाती ह्यांच्या हजारों कलेवरांवरून धांवतांना धक्यांनीं ज्याच्या घंटांचा घणघणाट चालला आहे, अशा रथावर बसून शरवर्षाच्या योगानें शत्रु सैन्याचा पराक्रम कुंठित करीत करीत आणि आपल्या पळत्या सैन्यास आश्वासन देत देत अर्जुनानें गांठलेल्या अंगराजाचें साह्य करण्याकरितां चालिला आहे. बरें झालें, आतां आपल्या सैन्यास कांहींसा आश्रय मिळाला असें दिसतें.

(गलबल्यानंतर पडद्यापलीकडे भीमाचा शब्द होतो.)

भीमसेन– अहो कौरवसेनामहावीरहो, अहो पांडवपक्षपाती महायोधहो, माझा भयंकर वेष पाहून भयानें तुमच्या हातांतील शस्त्रें खालीं प

ह्णतात हें काय ? अरे भिऊंनका भिऊंनका. मी कोण आहें तुह्मा-स कळलें ? जो दुःशासनास खालीं पाडून त्याच्या पुष्ट वक्षस्छळा-पासून काढूलेल्या रक्तरूप मद्याच्या पानानें मदोन्मत्त झाला आहे; ज्याच्या आंगांत आवेश चढला आहे; ज्यानें आपली प्रतिज्ञा शेव टास आणिली आहे; जो कौरवराजाच्या द्यूतांत जिंकलेला दास; जो पांचांपांडवांतील मधला; ज्याला भीमसेन असें ह्मणतात तो मी बरें ! आतां मी तुह्मां सर्वांस साक्षी ठेवून सांगतों, श्रवण करा.

श्लोक १.

जो [1]पाळी धनु जोहि मानधन, त्या दुर्योधना देखतां,
जे तत्बांधव कर्ण शल्य शकुनी त्यांच्याहि प्रत्यक्षतां;
ज्यानें राजसभेंत पांडव वधू केशांबरा [2]कर्षिलें,
त्याचें भेदुनि वक्ष म्यां जितपणीं रक्तासव प्राशिलें १

सार०— ( श्रवण करून भयभीत होऊन ) अरे हा दुरात्मा भीमसेन, कौरववंश महावनाचा संहारकर्ता उत्पात वायूच केवळ, हा जवळच हा जवळच आला कीं ! आणि आह्मचे महाराज तर अझून सावध झाले नाहींत. आतांकसें करावें! असो, येथून रथ काढून दूर न्यावा हें बरें. नाहीं तर हादुष्ट दांडगा येऊन दुःशासनाप्रमाणें यांजवर ही एखादें भलतेंचकांहीं कर्म करील. ( असें बोलून त्वरेनें रथ हांकतो; आणि पुढें पाहून ह्मणतो ) हा वटवृक्ष फार चांगला दिसत आहे. येथें सरोवरांतील कमलांच्या सुगंधानें युक्त शीतळ वारा झुळझुळ येत आहे, आणि वृक्ष पाल्वलाआहे त्यामुळें छाया ही दाट पडली आहे. तस्मात् हीजागा संग्राम करितांकरितां श्रांत झालेल्या वीरजनांस विश्रांति घ्यावयालायोग्य आहे. तर आपण महा-राजांस त्याच जागीं न्यावें, ह्मणजे ताडाच्या विंझण्याच्या वाऱ्यानें व गंधोदकाच्या प्रोक्षणानें आणि सरोवरावरून आलेल्या सुगंध शीतळ वायूच्या स्पर्शानें महाराज सावध होतील. आणखी, रथाचा

१ धारणकरी. २ ओढलें.

ध्वज मोडलाच आहे, आतां वटवृक्षाच्या खालीं रथ नेण्यास अडचण हीं पडणार नाहीं. (असें ह्मणून वटवृक्षाच्या खालीं रथ नेतो.) कोण आहेरे येथें? (चौंहोंकडे पाहून) अरे येथें कोणीच सेवकजन नाहीं! हाँ, भीमसेनाचें तें भयंकर रूप पाहून आणि महाराजांची ही अशी अवस्था पाहून त्रासानें सारेजण डेऱ्यास गेले असें वाटतें. कायहो संकट हें! येतें तेव्हां असें चोहोंकडून एकदांच येतें. काय दैवगति सांगावी?

## श्लोक २.

द्रोणें ओढूनि पार्थापुढुनिहि न कसा रक्षिला सिंधुराज[1],
केलें दुःशासनीं, तें करि हरि हरिणीं, कर्म भीमेंहि आज,
दुःसाध्या जी प्रतिज्ञा सहज पुरविली शत्रुची दुर्विधीनें[2],
वाटे आज्ञूनि[3] त्याचा सकळ न पुरला हेतु[4] ऐशाविधीनें[5] ॥२॥

(राजाकडे पाहून) कायहो अझून महाराज सावध होत नाहींत! काय तरी करावें आतां!

(निश्वास टाकून ह्मणतो.)

## श्लोक ३.

मदयुतगज[6] झाडें मोडितां एक[7] राहे,
चुकुनि गहनिं[8] तैसा राहिला हाच आहे;
कुरुपतिसुत[9] केले मृत्युनें सर्व गोळा,
तरिहि हत विधीचा[11] यावरी वक्र डोळा ॥ ३ ॥

हे भरतकुलविमुखा विधात्या,

---

१ जयद्रथ. २ दुर्दैवानें. ३ दैवाच्या. ४ इच्छा. ५ अशाप्रकारानें. ६ मदमत्त. ७ एक झाड ८ वनांत. ९ राजा दुर्योधन. १० कौरव, ११ दुर्दैवाचा.

आर्या ४.

नाहींत घाय देहीं, पडले नाहींत संशयीं[1] ज्ञाती;
ऐशाही भीमाची दुर्दैवा पुरविशी प्रतिज्ञाती. ४

दुर्यो०– (सावध होऊन धैर्यानें ह्मणतो )जरि मी दुर्योधन जिवंत असतां प्रतिज्ञा पुर्ण करण्याविषयीं त्या मुर्दाडा दुरात्म्या वृकोदराची[2] काय शक्ति आहे ? वत्सा दुःशासना, भिऊंनको, भिऊंनको हा मी आलोंपहा, अरे सूता, ज्या ठिकाणीं माझा वत्स दुःशासन प्राणसंकटीं पडला आहे तेथें माझा रथ लौकर ने.

सार०– महाराज, घोडे थकले आहेत, ते रथ ओढावयास सध्यां समर्थ नाहींत. (एकीकडे तोंड करून )आणि मनोरथ ही.

दुर्यो०– (रथाखालीं उतरून गर्वानें आणि आवेशानें ह्मणतो. )आतां रथांत बसून जाण्याच्या भरीस पडून कालातिक्षेप करणें नीट नव्हे. ( पायांनीं जावयास निघतो. )

सार०– ( खेदयुक्त आणि करुणायुक्त होऊन )महाराज, धीर धरा, क्षणभर थांबा.

दुर्यो०– छी सूता, ही थांबण्याची वेळ नव्हे. रथ कशाला पाहिजेरे ? हा दुर्योधन युद्धाची कशीही दाटी असली तरी तींत एकटा शिरणारा आहे बरें. एक गदा मात्र सहाय असली ह्मणजे पुरे. हा मी गदा घेऊन समर भूमीस निघालों पहा !

सार०– महाराज, खरी गोष्ट, अपला पराक्रम असाच आहे, यांत काय संदेह ?

दुर्यो०– इतकें तुला समजतें मग असें काय बोलतोस ? पहा,

श्लोक ५.

मद्बाळकावरिच सोडुनि युद्धधर्मा,
माझ्या समक्ष करितो अरि पापकर्मा;

१ मरण भयांत. २ भीमाची.

जातां तयावरि निवारिशि काय मातें,
नाहींच कोप करुणा आणि लाज तूतें ५

यांविषयीं दुसरा श्लोक ६.

मदीय लघु बाळकावरि उठे महा दांडगा,
नभीच मजदेखतां अविवरी जसा लांडगा;
तयावरिच मी उठें परि निवारिशी तूं मला,
न कोप तुज ये कसा न करुणा न लज्जा तुला. ६

सार०– (गहिंवरतो आणि पायांवर पडून ह्मणतो.) महाराज, मी थोडी विनंती करितों. तो दुष्ट घातकी वृकोदर[1] आपली प्रतिज्ञा शेवटास नेऊन परतला असावा असें मला वाटतें. ह्मणून मी असें बोललों.

दुर्योधन– (हीं अक्षरें ऐकतांच धाडकर भुईवर पडतो, आणि शोक करतो.) हा वत्सा दुःशासना, हा माझ्या आज्ञेस्तव पांडवांशीं विरोध करणाऱ्या, हा पराक्रमचतुरा, हा माझ्या मांडीवर खेळणाऱ्या हा शत्रुकुलगजघटेच्या[2] मृगेंद्रा[3], हा माझ्या युवराजा, कोठें गेलास! अरे मला एकवेळ हाक दे. ~~अतां मी तुला कोठें पाहूं~~ ?

दुःशासन बाळकें माझें, मज टाकुनि कोठें गेलें. धृ०
ये वत्सा लवकर मातें, कमलाक्षा दावीं वदना;
भागलास असशिल भारी, बा करितां अरिच्या कदना;
घेउनियां स्कंधीं तुजला, नेतों मी निजसुखसदना;

चालबदलन

करितां तूं समरविहार; लागली भूक तुज फार;
झालासी तृषित अपार; कोठें त्वां जाणें केलें.
दुःशासन बालक माझें, मज टाकुनि कोठें गेलें. १

---

१ भीमसेन. २ गजसमुदाय. ३ सिंह.

संकोचें कांहीं वस्तु, मागितलें नाहीं मजला;
भोगाया विलास, नाहीं, दिधली म्यां आज्ञा तुजला;
मजसाठीं सर्व प्रकारें, भोगाया दुःखासजला;
चाल० तें माझें प्रियकर मोठें; मज टाकुनि गेलें कोठें;
दैवचिबा माझें खोठें; कैसें हें विधिनें केलें.
दुःशासन बाळक माझें, मज टाकुनि कोठें गेलें. २
तूं माझ्या अध्यविचनीं, वर्तलासि झालें फोल;
ताताहुनि ममता भारी, मजवरि तूं असती लोल;
मांडीवरि बैसुनि मजशीं, एखादा सुशब्द बोल;
चाल० मज करितां पांडव वैर; केलें त्वां पुरतें स्वैर;
नाहीं तरि ऐसें गैर; नसतें त्या दुष्टें केलें.
दुःशासन बाळक माझें, मज टाकुनि कोठें गेलें. ३
मातेला सांगूं काय, बहिणीशीं बोलूं कैसें;
सांगाया वार्ता दावूं, ताताला मुख हें कैसें;
बाळावर संकट पडलें, नाहीं बा मजवर तैसें;
चाल० मी फारच निर्दय झालों; रक्षाया तुज न आलों;
आधीं कां मीच न मेलों; काय म्या वांचुनि केलें;
दुःशासन बाळक माझें, मज टाकुनि कोठें गेलें. ४
दुर्योधन बोलुनि ऐसें शोकानें मूर्छित पडला;
आठवूनि गुण अनुजाचे, त्यासमयीं फारचि रडला;
दुःखाचा अजगर मोठा, जाउनियां हृदयीं जडला;
चाल० भासलें शून्य जगसारें; दाटले नेत्र अंधारें;
जाणो त्या सुटलें वारें; सारें तें धैर्यचि खचलें.
दुःशासन बाळक माझें, मज टाकुनि कोठें गेलें. ५

( असें ह्मणून मूर्छित पडतो. )

सार०— महाराज, सावधव्हा, सावधव्हा.

दुर्यो०— (सावध होऊन श्वास टाकून पुन्हा ह्मणतो. )

## श्लोक ८.

नाहीं यथेष्ट उपभोग सुखा अनुजा,
केलें तुझें अजुनि लालन म्यां न सुज्ञा;
माझ्या मुळें असुखभाजन जाहलासी,
सांगूनि साहसहि म्यां नच रक्षिलासी. ८

( असें बोलून पुन्हा खालीं पडतो. )

**सार०—** राजाजी, असें काय करतां ? धैर्य धरा.

**दुर्यो०—** छी छी सूता, काय गोष्ट ही केली त्वां!

## आर्या ९.

ज्याला म्यां रक्षावें, जो आज्ञाकरहि बाळ मत्प्राण;
तो दुःशासन देउनि, वळिकेलें आमुचें तुवा त्राण. ९

**सार०—** महाराज, क्षमा करावी, विनंती करतो, ऐका. जेव्हां शत्रुसैन्यांतील महारथांनीं मर्म भेद करणाऱ्या बाण तोमर शक्ति प्रास इत्यादि शस्त्रांचा वर्षाव केला तेव्हां महाराजांची चेतना नष्ट झाली. असें पाहून म्यां रथ रणभूमीपासून काढला.

**दुर्यो०—** अरेरे विपरीत गोष्ट केली त्वां. असें करावयाचें नव्हतें.

## श्लोक १०.

जो दुष्ट पांडवपशू अनुजारि त्याच्या,
झालों प्रबोधित नका प्रहरें गदेच्या;
रे आज कां न निजला समरांगणीं हा,
रक्तार्द्र भूमि शयनावरि भीमकीं हा. १०

( उसास टाकून आकाशाकडे पाहून ह्मणतो. )

अहारे निर्दया, भरतकुलपराङ्मुखा दैवा, आतां असेंतरी होऊंदे.

१ दुःखास पात्र, २ शुद्धि, ३ भीम. ४ दुःशासनशत्रु. ५ हाइतिखेदे. ६ दुर्योधन.

आर्या ११.

आला नसे वृकोदर, तों मृत्यु वर्धील तरि सुख प्राज्य[1];
या मजमृत बंधूला, विजय कशाला कशास हें राज्य. ११

सार०— इडापीडा टळो. महाराज, असें काय ह्मणतां ? कांहीं धैर्य धरा.

( इतक्यांत घायाळ झालेला एक पुरुष येतो. )

पुरुष— अहो भले गृहस्थांनो, याठिकाणींकोठेंआमचा महाराज दुर्योधन तुह्मीं कोणीं पाहिला आहे काय ? काय कोणी कांहींच बोलत नाहीं! असो, तो तेथें कमरा बांधून सिद्ध झालेल्या पुरूषांचा समुदाय दिसत आहे, तिकडे जाऊन त्यांस विचारावें. ( त्यांजकडे पाहून ) अहो! हे तर गाढ प्रहारानें घायाळ होऊन पडलेल्या आपापल्या धन्याच्या आंगांतील शल्यें चिमट्यांनीं काढीतबसले आहेत. ह्यांस कांहीं ठाऊक नसेल. असो, दुसरे कडे शोध करावा. हे आणखी पुष्कळ वीर एकत्र जमले आहेत, त्यांस जाऊन पुसतों. ( त्यांच्या जवळ जाऊन ) अहो वीरहो, तुह्माला ठाऊक आहे काय आमचा कुरुनाथ कोण्या ठिकाणीं आहे तो ? काय हो, हे मला पाहून अधिकच रडावयास लागले! तर हे ही जाणत नाहींत असें दिसतें. ( दुसरे कडे पाहून ) हाय हाय हें तर मोठें कठीण काम आहे. अहो ही वीरमाता समरांगणीं पुत्र पडला ऐकून सुनेला तांबडें पातळ नेसवून तिच्या आंगावर समग्र भूषणें घालून तिजसहवर्तमान पुत्राबरोबर प्राण द्यावयास पाहात आहे. ( अभिवंदन करून, ) शाबास वीरमाते शाबास, ह्याकर्मेंकरून तूं पुढल्या जन्मीं तरी अचळपुत्रका होशील. असो, दुसरे कडे जाऊन शोध करीन. ( दुसरे कडे पाहतो. )अहो हे योध शस्त्र प्रहारांनीं घायाळ झाले आहेत. ह्यांच्या शरीरांवरील घाय जबर दिसतात. हे रिकाम्या घोड्याकडे पाहून

[1] बहुत.

### श्लोक ८.

नाहीं यथेष्ट उपभोग सुखा अनुजा,
केलें तुझें अझुनि लालन म्यां न सुज्ञा;
माझ्या मुळें असुखभाजन[1] जाह्लासी,
सांगूनि साहसहि म्यां नच रक्षिलासी. ८

( असें बोलून पुन्हा खालीं पडतो. )

**सार०—** राजाजी, असें काय करतां ? धैर्य धरा.

**दुर्यो०—** छी छी सूता, काय गोष्ट ही केली त्वां!

### आर्या ९.

ज्याला म्यां रक्षावें, जो आज्ञाकरहि बाळ मत्प्राण;
तो दुःशासन देउनि, वळिकेलें आमुचें तुवा त्राण. ९

**सार०—** महाराज, क्षमा करावी, विनंती करतो, ऐका. जेव्हां शत्रुसै-न्यांतील महारथांनीं मर्म भेद करणाऱ्या बाण तोमर शक्ति प्रास इ-त्यादि शस्त्रांचा वर्षाव केला तेव्हां महाराजांची चेतना[2] नष्ट झाली. असें पाहून म्यां रथ रणभूमीपासून काढला.

**दुर्यो०—** अरेरे विपरीत गोष्ट केली त्वां. असें करावयाचें नव्हतें.

### श्लोक १०.

जो दुष्ट पांडवपशू[3] अनुजारि[4] त्याच्या,
झालों प्रबोधित नका प्रहरें गदेच्या;
रे आज कां न निजला समरांगणीं हा[5],
रक्तार्द्र भूमि शयनावरि भीमकीं हा[6]. १०

( उसास टाकून आकाशाकडे पाहून ह्मणतो. )

अहारे निर्दया, भरतकुलपराङ्मुखा दैवा, आतां असेंतरी होऊंदे.

१ दुः खास पात्र २ शक्ति ...

## आर्या ११.

आला नसे वृकोदर, तों मृत्यु वधील तरि सुख प्राज्य[1];
या मजमृत बंधूला, विजय कशाला कशास हें राज्य. ११

**सार०–** इडापीडा टळो. महाराज, असें काय ह्मणतां ? कांहीं धैर्य धरा.

( इतक्यांत घायाळ झालेला एक पुरुष येतो. )

**पुरुष–** अहो भले गृहस्थांनो, याठिकाणींकोठेंआमचा महाराज दुर्योधन तुह्मीं कोणीं पाहिला आहे काय ? काय कोणी कांहींच बोलत नाहीं! असो, तो तेथें कमरा बांधून सिद्ध झालेल्या पुरुषांचा समुदाय दिसत आहे, तिकडे जाऊन त्यांस विचारावें. ( त्यांजकडे पाहून ) अहो! हे तर गाढ प्रहारानें घायाळ होऊन पडलेल्या आपापल्या धन्याच्या आंगांतील शल्यें चिमट्यांनीं काढीतबसले आहेत. ह्यांस कांहीं ठाऊक नसेल. असो, दुसरे कडे शोध करावा. हे आणखी पुष्कळ वीर एकत्र जमले आहेत, त्यांस जाऊन पुसतों. ( त्यांच्या जवळ जाऊन ) अहो वीरहो, तुह्माला ठाऊक आहे काय आमचा कुरुनाथ कोण्या ठिकाणीं आहे तो ? काय हो, हे मला पाहून अधिकच रडावयास लागले! तर हे.ही जाणत नाहींत असें दिसतें. ( दुसरे कडे पाहून ) हाय हाय हें तर मोठें कठीण काम आहे. अहो ही वीरमाता समरांगणीं पुत्र पडला ऐकून सुनेला तांबडें पातळ नेसवून तिच्या आंगावर समग्र भूषणें घालून तिजसहवर्तमान पुत्राबरोबर प्राण द्यावयास पाहात आहे. ( अभिवंदन करून,) शाबास वीरमातेशाबास, ह्याकर्मेंकरून तूं पुढल्या जन्मीं तरी अचळपुत्रकाहोशील. असो, दुसरे कडे जाऊन शोध करीन. ( दुसरे कडे पाहतो. )अहो हे योध शस्त्र प्रहारांनीं घायाळ झाले आहेत. ह्यांच्या शरीरांवरील घाय जबर दिसतात. हे रिकाम्या घोड्याकडे पाहून

[1] बहुत.

रडत आहेत यावरून यांचा धनी खचित येथें पडला आहे असें वाटतें. तर यांसही आमच्या राजाची वार्ता ठाऊक नसेल. असो, आणखी दुसरे कडे जाऊन पुसावें. ( चोहोंकडें पाहातो. ) अरे जो पाहावा तो आपापल्या अवस्थेचें दुःख अनुभवीत केवळ हतभाग्यपणें दीन होऊन संकटांत पडला आहे. यांतून कोणाला विचारावें आणि कोणाशीं बोलावें ? असो, आतां आपणच स्वतां या ठिकाणीं हिंडून फिरून शोध काढावा. ( इकडे तिकडे फिरून ह्मणतो. ) यासमयीं दैवास बोल लावावा. अरे दैवा, जो अकरा अक्षौहिणी सैन्याचा स्वामी, जो शंभर भावांचा ज्येष्ठभ्राता, जो भीष्म द्रोण कर्ण शल्य कृप कृतवर्मा अश्वत्थामा इत्यादि महावीरांचा आश्रय, आणि जो सर्व भूमंडळाचा अधिपती, असा महाराज दुर्योधन त्याला सोधणें पडावें काय ? आणि तो कोठें आहे कोण जाणे असें ज्यानें त्यानें ह्मणावें काय ? हरहर सूर्यास अंधारांत शोधावें असा प्रसंग आला. ( विचार करून आणि निश्वास टाकून ) अथवा दैवाला तरी कायबोल लावावयाचा आहे ? आपलेंच कर्म खोटें. आपल्या हातानें जो विषवृक्ष लावला त्याचें हें फळ पक्कदशेस आलें. पहा, विदुरवचनाची निर्भर्त्सना केली हें त्या वृक्षाचें बीज होय; भीष्माच्या उपदेशाचा तिरस्कार केला तो त्या वृक्षास अंकुर झाला; त्या दुष्ट शकुनीनें अकार्य[1] करण्याविषयीं जें उत्तेजन दिलें तेंच त्याचें मूळ झालें; लाक्षागृहदाह, विषभोजन, कपटद्यूत, वनवासादिदुःखदान ह्या त्याच्या शाखा होत; चिरकाल प्रवर्द्धित जें वैर तें त्यांस आळें झालें; आणि त्या पांचालपुत्रीच्या[2] केशांबरांचें जें सभेंत आकर्षण करविलें तीं त्या वृक्षाचीं फुलें होत; अशा पोसलेल्या वृक्षास दुसरें कोणतें फळ यावयाचें आहे ? हेंच फळ. ( दुसरे कडे पाहून ) हां येथें रथ कोणाचा बरें ? ह्याच्या अनेक प्रकारच्या रत्नकांतींत सूर्याचे किरण मिश्रित झाल्यामुळें हजारों इंद्रध-

१ अन्यायकर्म. २ द्रौपदी.

नुष्यें आकाशांगणांत पसरल्या प्रमाणें दिसत आहेत, आणि ह्याचा ध्वजस्तंभ ही मोडलेला दिसतो. यावरून असा तर्क होतो कीं, येथें च आमचे दुर्योधन महाराज विश्रांति घ्यावयास बसले असावे. (जवळ जातो,आणि राजास पाहून नमतो.) महाराजांचा जयजयकार असो.

सार०— (त्या पुरुषाकडे पाहून राजास ह्मणतो.) महाराज समरांगणापासून कर्णाचा दूत हा सुंदरक आला आहे, त्याजकडे दृष्टि द्यावी.

दुर्यो०— (त्यास पाहून) अरे सुंदरका, माझा सखा कर्ण खुशाल आहे कीं?

सुंदर०— महाराज, शरीरानें मात्र खुशाल आहे.

दुर्यो०— (घाबरून कायरे सुंदरका, त्या दुरात्म्या अर्जुनानें त्याचे घोडे मारिले किंवा सारथी नष्ट केला, अथवा रथ भग्न केला, झालें तरी काय?

सुंदर०— महाराज, केवळ रथ भग्न केला इतकेंच नाहीं, मनोरथ ही.

दुर्यो०— कायरे असें संदिग्ध भाषण करून माझ्या दुःखितमनास आणखी अधिक दुःख देतोस? काय असेल तें सर्व स्पष्ट सांग.

सुंद०— आज्ञा महाराज, महाराजांच्या चरणांच्या दर्शनानें आणि मुकुटरत्नाच्या प्रभावानें माझ्या आंगींची शस्त्रवेदना दूर झाली, आतां कांहीं चिंता नाहीं. (आवेशानें इकडे तिकडे फिरतो) ऐकावें महाराज. आज तर कुमार दुःशासनाच्या वधा — (इतकें अर्धें बोलून दांतांनीं जीभ धरून हातानें तोंड झांकतो.)

सार०— सुंदरका, सांग सांग भिऊं नको. हें तर दैवानें अगोदरच सांगितलें आहे.

दुर्यो०— हूं सांग बाबा आतां. अगोदरच हें माझ्या कानीं पडलें आहे. दुःशासनाच्या मरणाची कथा म्यां ऐकावी असें आज माझ्या वांटयास आलें आहे.

सुंद०— बरें तर ऐकावें महाराज. आज तर कुमार दुःशासनाच्या वधामुळें जो आपला सखा स्वामी अंगराज कर्ण तो क्रोधानें संतप्त होऊन व भोंवया वर चढवून बाण जोडतो केव्हां आणि सोडतो केव्हां हें कोणास नसमजे अशा प्रकारें बाणांचा वर्षाव करीत दुष्ट जो मध्यम पांडव भीमसेन त्यावर धांवून गेला.

दोघे०— बरें मग पुढें काय ?

सुंद०—मग महाराज, दोन्ही कडच्या सैन्यांतील हत्ती घोडे आणि पायदळ हीं जेव्हां मिसळलीं तेव्हां त्या गर्दीत जो मनस्वी धुरळा उठला तेणेंकरून आणि दोन्ही दळांतील हत्तींच्या प्रेतांचे ढीग जिकडे तिकडे पडले होते तेणेंकरून असा अंधकार माजला, कीं त्यानें दोन्ही सैन्यें आंधळीं करून टाकिलीं. भूमी किंवा आकाश कांहींच कोणास दिसेना अशी अवस्था झाली.

दोघे०— मग पुढें ?

सुंद०— मग महाराज, त्या अंधकारांत बळानें ओढलेल्या धनुष्यांच्या दोरीच्या टणत्काराचे जे गंभीर आणि भयंकर शब्द होत त्यांहींकरून प्रळयकाळच्या मेघांची गर्जना होतआहे काय असें सर्वांस भासलें.

दुर्यो०— बरें मग पुढें ?

सुंद०— मग महाराज, ते दोघे जेव्हां वारंवार मोठ्यानें सिंहनाद करीत, तेव्हां त्या मेघगर्जना वाटत; आणि एकमेकावर अनेकप्रकारचीं शस्त्रें टाकीत तीं कवचांवर आपटून त्यांपासून अग्नि निघे तो विद्युल्लतेसारखा चमके;आणि त्यांच्या आंगापासून जे रक्ताचे असंख्य बींदू उडत ते जणूं काजवे उडतात असें वाटे; आणि गंभीर शब्द करणारे त्यांचे चाप ते मेघ;आणि त्यांजपासून जे हजारों शर निघत त्याजणू जलधारा असें वाटे; अशा शरवृष्टीनें जेव्हां दशदिशा भरून गेल्या, कोठें कांहीं दिसेनासें झालें, तेव्हां हें समर नव्हे, दुर्दिनच झालें काय असें वाटलें.

१ ज्या दिवशीं गर्द आभाळ असतें तें दिन.

दुर्योधन— मग पुढें काय झालें ?

सुंद०— मग महाराज, अशा समयांत अर्जुनानें आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचा कदाचित् पराभव होईल ह्या शंकेनें त्यास साह्य करण्याकरितां त्वरेनें आपला रथ त्या ठिकाणीं आणिला. त्या रथाच्या घोड्यांचा शब्द विजेच्या कडकडाटाप्रमाणें भयंकर; त्याच्या ध्वजस्तंभीं वानर होता तोही भयंकर; रथाचे घोडे हांकावयास जो धुरेवर वासुदेव बसला होता तोही भयंकर; त्याला भव्य चार हात, त्या चाऱ्ही हातांत शंख चक्र गदा खड्ग हीं आयुधें तींही भयंकर; अशा रथांत बसणारा जो रथी वीर अर्जुन तोही भयंकर; त्याजकडे कोणाच्यानें पाहवेना. येतांच अर्जुनानें देवदत्त शंखाचा आणि वासुदेवानें पांचजन्य शंखाचा जो गंभीर आणि भयंकर ध्वनि केला त्याच्या प्रतिध्वनीनें दशदिशा भरून गेल्या.

दुर्यो०— मग पुढें काय झालें ?

सुंद०— तदनंतर महाराज, भीमसेन आणि धनंजय ह्या दोघांशीं आपला बाप एकटा झगडत आहे असें कुमार वृषसेनानें पाहून त्या ठिकाणीं यावयास त्वरेनें आपला रथ काढला. त्या घाईंत त्याचा रत्नखचित मुकुटपडलाच होता पण संभाळला. येतां येतां त्यानें धनुष्यास बाण जोडून धनुष्याची दोरी आकर्ण ओढून उजव्या हातांत बाणाचा पुच्छभाग धरून वेगानें रथ धांवडण्याविषयीं सारथ्यास आज्ञा केली, तोंच रथ येऊन पोहोंचला.

दुर्यो०— (डौलानें) हां, आतां सांग पुढें कसें काय झालें तें.

सुंद०— मग महाराज, कुमार वृषसेनानें येतांच अगोदर तेजस्वी कठिण आणि तीक्ष्ण अशा बाणांनीं अर्जुनाचा एवढा रथ पण क्षणांत आच्छादून टाकिला. जसा एकादा पुष्पित वृक्ष भ्रमरांनीं आच्छादित होतो.

दोघे०– ( हर्ष पावून ) एकून वृषसेनानें असा पराक्रम केला ना? बरें मग पुढें काय झालें ?

सुंद०– मग महाराज, तें कुमाराचें चापल्य पाहून अर्जुनानें तीक्ष्ण बाणांची वृष्टि करीत किंचित् हास्य करून वृषसेनास ह्मटलें. अरे बाळा वृषसेना, माझ्या पुढें उभें राहणें तुझ्या बापाला ही अशक्य, मग तुला लेंकराला कसें योग्य होईल, तर जा, आणि आपल्या बरोबरीचे कुमार पाहून त्यांच्याशीं युद्ध खेळ.

पद १२.

मुला जा तूं दुसऱ्या ठायां; नाशिशी हे शर कां वायां. ध्रु०
जो कर्णाचा सुत वृषसेन; गेला पार्था वरि धांवोन;
त्याला अर्जुन तो हांसून; बोले शब्द बाण खोंचून;
व्यर्थ कां घालविशी काया; नाशिशी हे शर कां वांया. १
माझ्या समोर यायाला; नसे बळ तुझिया बापाला;
होईल शक्ति कशी तुजला; योग्य तूं असशी क्रीडेला;
साहशिल कसें शस्त्रघाया; नाशिशी हे शर कां वायां. २
आझुनिजार तुझ्या ओंठीं; दाविशी वीरांची धाटी;
नसेतुज ठावी परिपाठी; न घालीं थोरांशीं गांठी;
कथिलें तुला कुणीं जाया; नाशिशी हे शर कां वायां. ३
आपल्या समान जे असती; झगडें त्यांच्याशीं निगुती;
हे शर सोपेसे दिसती; लागतां ओंठच्च कीं सुकती;
तुजवरि कोण करिल माया; नाशिशी हें शर कां वायां. ४
हौस तुज फार संगराशी; शेवटीं तोंडघशीं पडशी;
ऐसें साहस जरि करिशी; देशिल शोकचि पितरांशी;
रडतिल तुला तुझ्या दाया; नाशिशी हे शर कां वायां. ५

अशी धिक्कारयुक्त अर्जुनाची वाणी ऐकतांच वृषसेनास मोठा कोप आला, मुख आरक्त झालें, भोंवया वर चढल्या, तेणेंकरून त्याचा चेहरा असा भयंकर झाला कीं, आंतां काय करिल कोण जाणे!

पण त्यानें अर्जुनास दुष्टवचनांनीं उत्तर न देतां, त्या प्रसंगीं प्रयत्नानें संपादिलेल्या तीक्ष्ण बाणांनींच अर्जुनाची निर्भर्त्सना केली.

दुर्यो०— शाबास वृषसेना शाबास, अनुरूप कर्म त्वांकेलें. बरें सुंदरका, पुढें काय झालें ?

सुंद०— मग महाराज, वृषसेनाच्या तीक्ष्ण बाणांनीं जेव्हां अर्जुन विद्ध झाला तेव्हां फार क्रोधास चढून त्यानें ज्याच्या दोरीच्या टणत्कारानें विद्युल्लतेचा शब्द लज्जित होणार अशा गांडीव धनुष्याच्या योगानें आसपास कोणास फिरकूं न देतां सर्व दिशा व्यापणारी अशी भयंकर बाणवृष्टि करून आपल्या विद्येस व बलास अनुरूप असें कांहीं आश्चर्य जनक कर्म केलें.

दुर्यो०— ( कांहीं कल्पना मनांत आणून ) मग पुढें काय झालें ?

सुंद०— मग माहाराज, शत्रूचें अद्भुत युद्धचातुर्य पाहून कुमार वृषसेनानें ही त्याहून विशेष युद्ध कौशल्य दाखविलें. असें कीं, भात्यांतून बाण काढतो केव्हां, धनुष्यावर ठेवतो केव्हां, गुणाशीं जोडतो केव्हां, ओढतो केव्हां आणि सोडतो केव्हां, हें कोणाच्याही समजुतींत येऊं दिलें नाहीं.

दुर्यो०— मग पुढें ?

सुंद०— मग महाराज, कौरवसेनेंतील व पांडवसेनेंतील सर्व वीरांचा समुदाय आपापला युद्धव्यापार सोडून व परस्पर वैरभावाचा क्षणभर त्याग करून शाबास वृषसेना शाबास असें मोठ्यानें ह्मणत त्याजकडे टकमक पाहात उभाराहिला.

दुर्यो०— ( आश्चर्य करून ) मग पुढें काय झालें ?

सुंद०— मग महाराज, सर्व धनुर्धरांस लज्जा व आश्चर्य देणारा असा पुत्राचा पराक्रम पाहून स्वामी अंगराज ( कर्ण ) हर्ष, रोष, करुणा, आणि शंका, अशा चोहोंच्या कचाटींत सांपडला, तेव्हां त्यानें भीमसेनावर शरवृष्टि आणि कुमार वृषसेनावर बाष्पाकुलदृष्टि केली.

दुर्यो०— ( आनंद पावून ) मग पुढें काय झालें ?

सुंद०— मग महाराज, दोहों सैन्यांतील वीरांच्या मुखांतून वृषसेनाविषयीं जो शाबास शाबास असा शब्द निघाला तो अर्जुनास न सोसल्यामुळें त्यानें क्रोधेंकरून वृषसेनाचे घोडे, सारथि, रथ, धनुर्ष्य-मौर्वी[1] आणि श्वेतछत्र ह्यांजवर एकदांच बाण मारिले.

दुर्यो०— (मनांत भय पावून) बरें मग पुढें कसें झालें ?

सुंद०— मग महाराज, जेव्हां कुमार वृषसेन विरथ झाला. धनुष्य मोडलें, मौर्वी तुटली, तेव्हां रथाखालीं उडी टाकून शत्रूच्या शरसंपाताचा स्पर्श आपल्या आंगास न होई अशा प्रकारें मंडळाकार गरगर फिरूं लागला.

दुर्यो०— (शंकित होऊन) मग पुढें ?

सुंद०— मग महाराज आपल्या पुत्राचा रथ मोडला असें पाहून स्वामी अंगराजास फार क्रोध आला. तेव्हां त्यानें भीमसेनाची गणना न करितां त्यास सोडून अर्जुनाच्या रथावर बाणांची वृष्टि केली. [illegible] कुमार वृषसेनही सेवकांनीं आणलेल्या दुसऱ्या रथावर बसून पुन्हा अर्जुनाशीं युद्ध करावयास गेला. आणि अर्जुनास हाक मारून बोलला, अरे माझ्या ताताची निंदा करणाऱ्या, वाचाळा, अर्जुना, हे माझे बाण तुझ्या शरीराचा त्याग करून दुसऱ्यावर जात नाहींत. तर संभाळ आतां. असें बोलून त्यानें हजारों बाण सोडून अर्जुनाचें शरीर आच्छादून टाकिलें, आणि सिंहनाद करण्यास आरंभ केला.

दुर्यो०— ( विस्मय करून ) लेंकुरस्वभाव असून काय हो बाळाचा पराक्रम हा ! बरें सुंदरका, मग पुढें काय झालें ?

सुंद०— मग महाराज, अर्जुनानें आपल्या बाणांनीं वृषसेनाच्या तितक्याही बाणांचें निवारण करून रथांतून एक उत्कृष्ट शक्ति वृषसेनावर टाकण्यासाठीं उचलून घेतली. ती शक्ति साधारण नव्हती, ति

---

१ धनुष्याची दोरी.

ला सोन्याच्या घागरमाळा लाविल्या होत्या, तेणेंकरून झंम झंम शब्द होतअसे. तिची कांति निरभ्र आकाशाप्रमाणें स्वच्छ होती, तिचें मुख घांसून पुसून लखलखीत आणि गुळगुळीत केल्यामुळें चकचकीत काळें भिन्न दिसत होतें. अशी ती शक्ति अर्जुनानें उपहासपूर्वक वृषसेनावर फेंकली.

दुर्यो०— ( खिन्न होऊन ) हाय हाय आतां ! मग पुढें ?

सुंद०— मग महाराज, असें झालें कीं, ती अर्जुनाची देदीप्यमान शक्ति पुत्रावर आली असें पाहून आमच्या स्वामी अंगराजाच्या हातून बाणांसुद्धां धनुष्य खालीं पडलें, त्द्दयांतून युद्धोत्साह गेला, नेत्रांतून आंसूं गळूंलीं, आणि तोंडचें पाणी पळालें, हें पाहून अर्जुनानें हास्य केलें, भीमसेनानें सिंहनाद केला, आणि सर्व कौरवसैन्यांतल वीर आतां कठीणरे कठीण असें ह्मणून एकदांच ओरडले.

दुर्योधन— ( भयभीत होऊन ). मग पुढें काय झालं !

सुंद०— मग महाराज. इतक्यांत त्या कुमार, वृषसेनानें त्वरा करून आकर्ण धनुष्य ओढून असेंच संधान पाहून जो बाण मारिला, त्या बाणानें अर्ध मार्गांतच त्या शक्तीचे तीन तुकडे केले. जशी भागीरथी शिवानें त्रिधाकेली.

दुर्यो०— ( हर्ष पावून ) शाबास वृषसेना शाबास, बरें मग पुढें काय झालें !

सुंद०— मग महाराज, त्या शक्तीचे तीन तुकडे होतांच सर्व सैन्यांत शाबास वृषसेना शाबास, असा सर्व वीर लोकांच्या मुखापासून जो एकदांच घोष उठला त्याच्या ध्वनीनें रणवाद्यांचाही ध्वनि लोपून गेला. आणि सिद्धचारणगंधर्व ह्यांनीं आकाशांतून पुष्पांची वृष्टि केली, तीणेंकरून सर्व समरांगण भरून गेलें.

दुर्यो०— ( आनंदानें ) काय हो मुलाचा पराक्रम हा! कसा झाला तरी कर्णाचा पुत्रना ? बरें मग पुढें ?

सुंद०— मग महाराज, आमचा स्वामी अंगराज, भीमसेनास ह्मणाला, अरे वृकोदरा, तुझें माझें युद्ध समाप्त झालें असें नाहीं अझून पुढें

ऱ्हावयाचें आहे. पण मी हा युद्धचमत्कार मुहूर्त मात्र पाहातों तोंपर्यंत उगाच ऐस. आणि माझ्या वत्साचें[1] आणि तुझ्या अनुजाचें[2] धनुर्विद्येमध्यें निपुणत्व किती आहे, हें तुलाही क्षणभर पाहाण्यास योग्य आहे. मग भीमसेन आणि अंगराज[3] हे दोघे आपापला युद्धव्यापार थांबवून आणि मुहूर्त मात्र वैरभाव सोडून त्या उभयतांच्या युद्धाचा चमत्कार पाहूं लागले.

दुर्यो०— ( कांहीं कल्पना मनांत आणून, ) मग पुढें ?

सुंद०— मग महाराज, आपली शक्ति खंडित झाली असें पाहून अर्जुनास मोठा कोप आला, आणि तो मोठ्यानें हाक मारून ह्मणाला, अरे दुर्योधनप्रमुख. ( असेंअर्धेंच बोलून लाजल्याखारखें करतो. )

दुर्यो०— सुंदरका, भिऊंनको. सांगसांग, शत्रु काय बोलला तें ?

सुंद०— सांगतों ऐकावें महाराज. अर्जुन बोलला, अरे दुर्योधनप्रमुख कौरवसेनानायकहो, अरे अविनय[4] नदींत पोंहणाऱ्या कर्णा, मी जवळ नसतां तुह्मीं सर्वांनीं मिळून एकाकी अभिमन्यु बाळ मारिला, आतां मी तरतुह्मां सर्वांच्या समक्ष तुमचा चपळ कुमार वृषसेन तुमच्या स्मृतीस[5] मात्र विषय होईल असा करतों, पहा. असें बोलून गर्वानें हातीं गांडीव धनुष्य घेऊन त्याचा वज्रनिर्घोषाप्रमाणें[6] टणत्कार केला. तों इकडे आमच्या स्वामी अंगराजानेंही आपलें कालपृष्ठ नामक धनुष्य सज्ज केलें.

दुर्यो०— ( पोटांतील भय आच्छादून ) मग पुढें कसें झालें ?

सुंद०— मग इतक्यामध्यें अर्जुनानें भीमसेनास युद्ध कर्मापासून निवृत्त करून आपण स्वतां पिता अंगराज आणि पुत्रवृषसेन ह्यांच्या रथरूप तटाकांस वाहवून नेणाऱ्या अशा दोन बाणनद्या निर्माण केल्या. इकडून त्या दोघां पितापुत्रांनींही चढीं ओढीनें आपलें विद्याकौशल्य परस्पर दाखवीत अर्जुनाशीं गांठ घातली.

दुर्यो०— मग कसें झालें ?

सुंद०— मग महाराज, त्या अर्जुनानें प्रळय काळच्या मेघाप्रमाणें अशी

---

१ पुत्राचें. २ भावाचें. ३ कर्ण. ४ अन्याय. ५ मरण पावेल. ६ विजेचे शब्द.

घोर बाणवृष्टि केली कीं, दशदिशा बाणांनीं भरून गेल्या. त्या गर्दीत आकाश पाताळ एकच होऊन गेलें. दिशा कोणी कडे हें समजेना. मग कोठचा स्वामी आणि कोठचा कुमार? त्यांचा रथ, सारथी, घोडे, ध्वजस्तंभ, यांतून कांहींच दिसेना. वरकड तर काय, पण आपलें सैन्य कोठें आहे, आपले वीर कोणीकडे आहेत हें देखील समजेना अशी अवस्था झाली. तिकडे त्याच्या धनुष्याचा टणत्कार वज्रघोषाप्रमाणें[1] वारंवार मोठ्यानें होई त्यावरून मात्र अर्जुन बाणवृष्टि होत आहे असें समजे.

दुर्यो०— (आश्चर्य करून) मग पुढें?

सुंद०— मग महाराज, क्षणमात्रेंकरून ती बाणांची गर्दी शांत झाल्यावर पांडव सैन्यांत हर्षाचा सिंहनाद होऊं लागला; आणि कौरवसैन्यांत शोकाचा आक्रोश होऊं लागला, कीं कुमार वृषसेन पडला हो पडला!

दुर्यो०— (डोळ्यांतअश्रु आणि मनांत रोष आणून) बरें पुढें सांग काय झालें तें.

सुंद०— मग, पाहातात तों, वृषसेनाचा सारथी, आणि घोडे मरून पडले आहेत; छत्र चामर ध्वजहीं तुटून गेलीं आहेत; आणि स्वर्गभ्रष्ट देवकुमाराप्रमाणें कुमार वृषसेन हृदयभेद करणाऱ्या एकाच बाणानें भिन्नहृदय होऊन रथांत पडला आहे.

दुर्यो०— (डोळ्यांत आसवें आणून) हायरे, कुमार वृषसेना!—पुरे आतां पुढील वार्ता. हा वत्सा वृषसेना! अरे तूं माझ्या मांडीवर खेळत होतास! अरे त्वां माझी आज्ञा कधीं मोडली नाहीं! अरे त्यां दुःशासनापेक्षां तुला कधीं कमीं मानिलें नाहीं! अरे तूं आम्हांस वडील मानून आम्हांवर किती ममता करीस! अरे तूं कर्णाच्या वंशवल्लीचा अंकुर होतास! हा शौर्यसमुद्रा, हा गदायुद्धनिपुणा, हा प्रियशिष्या, हा प्रियदर्शना, कोठें गेलास! अरे माझ्याशीं एकदां तरी बोल.

[1] विजेच्या शब्दाप्रमाणें.

**श्लोक १३.**

जें पद्मनेत्र सकलोदित चंद्रकांत,
जें गौरवर्ण नवयौवन रम्यशांत;
होतां तुझें वदन तें विपरीतसृष्टी[1],
कर्णें कसें निरखिलें समरीं स्वदृष्टी. ॥ १३ ॥

सार०— महाराज, असा अत्यंत शोक करूं नका.

दुर्यो०— सूता, जे पुण्यवंत तेच दुःखास पात्र होतात. आमच्या पदरीं इतकें पुण्य कोठें आहे. आमचें विचारशील तर,

**श्लोक १४.**

प्रत्यक्ष हतबंधूंचें ऐशापरि भवानळें;
जळेत्हृदय अत्यंत कशाचें दुःख शोकही. १४

(असें ह्मणून मूर्च्छित पडतो.)

सार०— महाराज, सावध व्हा. (पदरानें वारा घालतो.) महाराज, इतका शोक करूं नका.

दुर्यो०— (सावध होतो.) अरे सुंदरका, मग माझ्या सख्या अंगराजानें पुढें काय केलें ?

सुंद०— मग महाराज, तसा तो पुत्र पडला असें पाहून नेत्रावाटे अश्रुधारा सोडून शत्रूच्या शस्त्रांची गणना न करितां स्वामी अंगराज पुन्हा अर्जुनावर धांवून गेला. त्या वेळीं शत्रूंनीं जाणलें कीं, अंगराज पुत्रवधानें क्रुद्ध होऊन जिवाची आशा सोडून पराक्रम करीत आहे. ह्मणून लागलेंच भीम नकुल सहदेव पांचाळ आदिकरून वीरांनीं मध्यें येऊन अर्जुनाचा रथ आड केला.

दुर्यो०— त्यांनीं असें केलें काय ? मग पुढें कसें झालें ?

सुंद०— मग महाराज, अर्जुनाच्या गांडीव चापरूपप्रलयमेघापासून निघालेल्या अनंत शरधारांनीं जेव्हां सर्व दिशा भरून गेल्या

१ विशोभित.

तेव्हां शल्यानें स्वामि अंगराजास सांगितलें, कीं अहो अंगराजा, आपल्या रथाचे घोडे पडले, चाकांच्या धांवा निखळल्या, तुंब फुटले, कणे मोडले. तर आतां भीमार्जुनांबरोबर युद्ध करणें योग्य नाहीं. असें बोलून रथ फिरविला आणि बहुत प्रकारें आश्वासन देऊन व समजून सांगून अंगराजास रथांतून खालीं उतरविलें.

दुर्यो०— त्यानें ठीक केलें. मग पुढें काय झालें?

सुंद०— मग स्वामि अंगराजानें अंमळ विश्रांत होऊन दुसरा रथ आणण्याविषयीं सेवकांस आज्ञा केली. मग सेवकांनीं तत्काळ दुसरा रथ आणला पाहून स्वामि अंगराजानें मजकडे दृष्टि करून, सुंदरका इकडे ये, ह्मणून मला हाक मारली. तों मी लागलाच जवळ गेलों. इतक्यांत अंगराजानें आपल्या मुकुटापासून एक सुवर्णपट्टिका[1] काढून घेऊन तिजवर शरीरावरील रक्तबिंदूंत बाणाचें अग्र बुचकळून त्यानें कांहीं मजकूर लिहून हा महाराजांस पाठविला आहे. हा वाचून पाहावा. (असें ह्मणून ती पट्टिका देतो.)

दुर्यो०— (पट्टिका घेऊन वाचतो.) "स्वस्तिश्रीमित्रवर्य महाराजदुर्योधनभूपति यांसि. समारांगणापासून मित्र कर्ण या क्षणापर्यंत कंठास गाढालिंगन देऊन विज्ञापना करितो ऐशीजे".

## श्लोक १९.

अस्त्रग्रामविधींत[2] मत्समनसे कोणी कृती[3] आहवा,[4]
होता पूर्णचि कीं तुला भरंवसा मारीन मी पांडवा;
तूझा भागह्मणूनि म्यां न वधिला दुःशासनारी[5] बळें,
तूं दुःखप्रतिकार पाव अपुल्या वीर्येंकिं बाष्पें जळें. १९

(पत्र वाचून ह्मणतो) मित्रा कर्णा काय हें! अरे शतबंधूंच्या शोकें करून दुःखित झालेल्या माझ्या हृदयास हीं वाक्शल्यें[6] टोंचतो-

१ पत्र. २ अस्त्रविद्येंत. ३ कुशल. ४ युद्धाविषयीं. ५ भीम. ६ बाणाचें.

स! सुंदरका, बरें माझ्या मित्रा अंगराजानें यासमयीं काय आरंभिलें आहे ?

सुंद०— महाराज, यासमयीं अंगराज शरीरावरील कवच अलंकार वस्त्रें काढून आणि आत्मवधाचा निश्चय करून स्वतां आपण एकटाच समारांगणाचा मार्ग धरण्याच्या बेतांत होता.

दुर्यो०— (ऐकून सत्वर उठतो) सुंदरका, माझ्या वचनेंकरून तूं लौकर जाऊन माझ्या सख्या अंगराजाला समजाऊन सांग, कीं यासमयीं जयाची आशा धरणें योग्य नाहीं. तुझा माझा संकल्प भिन्न नसावा. परंतु,

श्लोक १६.

आधीं पार्थां वधुनि सलिलें बंधुवर्गासि द्यावीं,
मंत्री शत्रू सुहृदसहयां नेत्र बाष्पें त्यजावीं;
त्वां म्यां द्यावा रडुनि अपुनर्भावि[1] अन्योन्य खेंवा[2],
हीं टाकावी हततनु रणीं दुःखितें निर्वृतेंवा[3]. १६

अथवा शोकदायक गोष्ट कांहींच सांगून पाठवूं नये. आतां इतकेंच सांगकीं,

ओंवी १७.

वृषसेन नव्हे तुझा तनुज, दुःशासन नव्हे माझा अनुज,
म्यातुज किंवा त्वां मज, काय ह्मणोनी सांत्वावें. ? १७

सुंद०— आज्ञा महाराज, (असें ह्मणून निघून जातो.)

दुर्यो०— अरे सूता हा जो शब्द ऐकूं येतो हा रथचक्रांचा ध्वनीसा वाटतो !

सार०— महाराज, खरेंच. रथचक्रांचाच ध्वनि हा. पहा अधिक अधिक मोठ्यानें ऐकूं येतो.

---

१ पुढें नघडायाचा. २ आलिंगन. ३ सुखी होऊन.

दुर्यो०— हाँ हाँ खरेंच. सेवकांनीं दुसरा रथ आणलावाटतें ? सूता, जाऊन तयार कर तो रथ.

सार०— आज्ञा महाराज, ( बाहेर जाऊन पुन्हा आंत येतो. )

दुर्यो०— ( त्याजकडे पाहून ) कांरे अजून रथावर चढला नाहींस ?

सार०— विनंती करतों महाराज, तो आपला रथ नव्हे. तात धृतराष्ट्र आणि अंबा गांधारी हीं उभयतां संजयासहवर्तमान रथावर बसून आपल्या भेटीकरितां हीं जवळ आलीं आहेत.

दुर्यो०— हाय हाय, काय संकटहें! दैवानें पहा कशी विपरीत गोष्ट केली! सूता तूं जा लौकर रथ आणावयास. मीतर ताताची भेट नघेतां एकिकडे जाऊन उभा राहातों.

सार०— महाराज असें करूंनका. आतां त्या उभयतांस तुह्मीच एकटे उरलां. यासमयीं तुह्मांवाचून त्यांचें समाधान कोण करील?

दुर्यो०— सूता, माझें दैव फुटलें. आतां मी त्यांचें समाधान कोणत्या तोंडानें करूं ? पाहा.

श्लोक १८.

आह्मी दोघे नमुनि पितरां आजि आलों रणाला,<br>
तेव्हां त्यांनीं धरुनि ह्रदयीं हुंगिलें कीं शिराला;<br>
त्या बाळाला तशि गति बळें प्राप्त केली अरीनें,<br>
आतां ताता जननि जवळी काय बोलूं मुखानें. १८

तथापि वडील आपणांस अवश्यवंदनीय आहेत खरे.

( असें बोलून निघून जातात. )

चवथेअंकांतीलपद्यें. श्लोक ११. आर्या ४. पदें २. ओंवी १. एकूण पद्यें १८.

---

**चवथाअंकसमाप्त.**

# अंक ५.

## स्थळ.

रणभूमि.

## पात्रें.

| | |
|---|---|
| धृतराष्ट्र. | दुर्योधनाचा पिता. |
| गांधारि. | दुर्योधनाची माता. |
| संजय. | धृतराष्ट्राचा शिष्य. |
| दुर्योधन | कौरवराज. |
| सारथी | दुर्योधनाचा. |
| भीमसेन | धर्माचा धाकटा भाऊ. |
| अर्जुन | भीमाचा धाकटा भाऊ. |
| अश्वत्थामा | द्रोणाचार्याचा पुत्र. |

# वेणीसंहारनाटक.

## अंक ५.

(तदनंतर धृतराष्ट्र, गांधारी, आणि संजय रथांतबसून येतात.)

**धृतरा०—** वत्सा संजया, या कुरुकुलरूप निबिड[1] वनांतील अवशिष्ट राहिलेला जो एक दुर्योधन बालेतरु[2] तो तरी जिवंत आहेना?

**गांधारी—** तो खचीत जिवंत आहे. पण तो कोठें आहे तें ठिकाण संजया दाखीव.

**संजय—** अहो, तो पहा दुर्योधनराजा वडाच्या झाडाखालीं सांवलींत एकटाच बसला आहे.

**गांधारी—** काय एकटाच बसला आहे ह्मणतोस? तर सांप्रत त्याच्या शंभर भावांतून कोणीच त्याच्या जवळ नाहीं काय?

**संजय—** कोणी नाहीं. पण अहो तात, अहो अंब, आपण रथावरून हळूच खालीं उतरावें.

**उभयतां—** (रथाखालीं उतरतात. इतक्यांत लज्जित होत्साता दुर्योधन येऊन बसतो.)

**संजय—** (जवळ जाऊन) महाराजांचा विजय असो. अहो महाराज. तात आणि अंबा उभयतां आपल्या भेटीकरितां हीं आलीं आहेत, यांजकडे आपण कां पाहात नाहीं. यांजकडे पाहावें महाराज.

**दुर्योधन—** (खिन्न होतो. बोलत नाहीं.)

**धृतरा०—** (दुर्योधनाच्या जवळ जाऊन त्याच्या आंगाला स्पर्श करून) वत्सा दुर्योधना, खुशाल आहेस कीं? अरेरे केवढा मी निर्दय!

### श्लोक १.

आंगीं सोडुनि वर्म[3] कंकवदनें[4] शल्यें हळू काढुनी,

---

१ दाट झाडी. २ रोपटा. ३ कवच. ४ निमल्याच्या भाप्रांनीं.

देतां तूं व्रण पट्टिकांसि निजसी कर्णी भरा ठेवुनी;
वीरांच्या दुरुनीच पाहुनि तयां केलें तुवां सांत्वना,
पापें म्यां न विचारिलेंचि तुज कीं सेह्या असे वेदना १

(धृतराष्ट्र आणि गांधारी दोघें दुर्योधनाच्या जवळ जाऊन हातांनीं अंग चांचपून त्यास आलिंगितात)

गांधारी— वत्सा, अतिगाढ प्रहारांच्या वेदनांनीं व्याकुळ झालास ह्मणून आह्मांशीं बोलत नाहींस काय?

धृतरा०— वत्सा दुर्योधना, असें मौन मजबरोबर ह्या पूर्वी कधींच धरिलें नव्हतें, आणि आजच कारेबा असें?

गांधारी— वत्सा, तूं जर आह्मांशीं बोलत नाहींस तर यासमयीं दुःशासन दुर्मर्षण किंवा दुसरा कोणी येऊन बोलणार आहे काय? (असें ह्मणून रडूं लागते.)

दुर्यो०— (उसासा टाकून) आई, मी काय बोलूं? आणि मला वत्सा वत्सा सुता सुता असें वारंवार कशाला ह्मणतां? सांप्रत मी तुमचा वैरी झालों आहें. पहा.

श्लोक २.

मी पापबंधुजन नाशक जाण साचा,
तातास आणि तुज हेतु रडावयाचा,
हा होय डाग विमला भरतान्वयाला,
देतां कुलक्षयकरा सुतता कशाला. २

गांधारी— लेंकरा, असा खेद करूं नको. आह्मां दोघां आंधळ्यांस वाट दाखविणारा तूं एकटा उरला आहेस. बाळा, तूंतरी चिरंजीवी ऐस. आतां आह्मांला कशाला तें राज्य, आणि कशास तें वैर पाहिजे! तूं खुशाल असलास ह्मणजे आह्मांला सर्व पावलें.

दुर्यो०— आई, असें काय बोलतेस?

१ मलपट्टी. २ सोसेशी.

श्लोक ३.

माते अयोग्य मज बोल तुझा असा हा,
सुक्षत्रियेसि तुज दीनपणा कसा हा;
चिंता तुला शतसुतां विषयीं न कांहीं,
मातेचि रक्षिसि दया तुज काय नाहीं ३

माते, तुझ्या मुखांतून असे शब्द निघणें हें खचीत सुतशोकाचें कृत्य होय.

**संजय**– अथवा, महाराज, लोकांत ह्मण आहे, कीं "विहिरींत घागर-पडली ह्मणून दोर टाकूं नये." ती काय खोटी ?

**दुर्यो०**– हें बोलणें पोकळ. यांत कांहीं जीव नाहीं. रे संजया, कांहीं कर्त्तव्य नाहीं तर साधन कशास पाहिजे ! ( असें बोलून रडूं लागतो. )

**धृतरा०**– ( दुर्योधनास आलिंगून ) वत्सा, अंमळ स्वस्थ हो, आणि आह्मां दोघां दीनांस ही स्वस्थ कर.

**दुर्यो०**– ताता, या उपर तुह्मांला स्वस्छता दुर्लभ आहे. परंतु,

आर्या ४.

मन्निहतपुत्रका जी कुंती तिजशीं तुह्मींहि शोकांत;
राहोनि आजपासुनि मिरवितजा पुत्रशोक लोकांत. ४

**गांधारी**– वत्सा, सांप्रतकाळीं हेंच आह्मास अधिक आहे, कीं तूं तरी एकटा जिवंत राहिलास. आतां मी दुसऱ्या कोणाविषयीं कशाला शोक करूं ! यासाठीं मी ह्मणतें, मुला, हा तुझा युद्धास जाण्याचा समय नव्हे. मी तुला हात जोडतें. मजवर कृपा कर आणि युद्ध सोडून स्वस्छ ऐस. माझ्या एवढ्या वचनाचा अव्हेर करूं नको.

**धृत०**– वत्सा, तूं आपल्या मातेचे एवढें वचन ऐक; आणि ज्याचे सर्व बां

धन नष्ट झाले असा जो तुझा पिता मी, माझें हीं वचन ऐक. आग्रह धरूनको, आणि समर सोडूनदे.

श्लोक ५.

दायाद[1] यद्भुजबळें गणिले न कांहीं,
ते द्रोण भीष्म समरीं उरलेचि नाहीं;
कर्णासमक्ष वधितां रणिं तत्सुताला,[2]
भ्याले समस्त जन पाहुनि फाल्गुनाला.५

वत्सा, आणखी तुला सांगतों ऐक.

श्लोक ६.

ऐकूनि वत्स निधनासचि कंठ दाटे,
शत्रू तुझ्यावरि पणा पुरवील वाटे;
त्याच्यासवें न अभिमान धरीं धरापा,[3]
तूं आजि अंध पितरां परिपाळबापा. ६

दुर्यो०— अगे आई, समरापासून निवृत्त होऊन म्यां काय करावें ?

गांधारी — तुझा पिता किंवा विदुर भावोजी सांगतील तें करावें.

संजय — राजा; गांधारी आई ठीक बोलते. असेंच करावें.

दुर्यो०— संजया, अद्यापि मला उपदेश करावयाचा राहिला आहे काय ?

संज०— राजा, जोंवर देहांत प्राण आहेत तोंवर जय मिळविणाऱ्यांस बुद्धिमंतांनीं उपदेश करावा, आणि त्यांनींही तो ऐकावा, हें योग्यआहे.

दुर्यो०— बरें तर, तूं ही बुद्धिमान् आहेस आणि मीही जयेच्छू आहें, तर या समयास योग्यअसा कोणता तुझा उपदेश आहे सांग, मी ऐकतों.

धृत०— वत्सा, हा संजय चांगली सोईची गोष्ट सांगत असतां त्याजवर उगाच कांबरें रागें भरतोस ? तूं जर स्वस्छचित्त होउन ऐकशील तर, तो कशाला, मीच सांगतों ऐक.

दुर्यो०— बरें आहे. आपण सांगावें काय तें.

---

१ शत्रुपीडक. २ दुःशासनमरण. ३ राजा.

धृत०— तुला फार कांहीं सांगावयाचें नाहीं. त्या युधिष्ठिराचें जें काय मागणें असेल तें त्याला देऊन त्याच्याशीं संधि करावा. इतकेंच आमचें तुला सांगणें आहे.

दुर्यो०— हे ताता, पुत्रमोहामुळें अंबा,आणि असमंजसपणामुळें संजय, असें बोलतात, पण तुह्मांला ही हा [1]व्यामोह असावा काय ? अथवा पुत्रशोकानें जो हृदयास संताप झाला तो असें वदवील. परंतु हे ताता, पहा बरें, ज्यावेळेस शंभर बंधु कायम होते त्यावेळेस देखील साम करण्याविषयीं [2]वासुदेव आर्जव करीत असतां मी त्याचा आग्रह केला. आतां तर दुःशासनादि सर्व भ्राते, भीष्म द्रोण व इतर मोठमोठे साह्य कर्त्ते राजे, हे सर्व मरण पावले. यासमयीं ह्या तुच्छ शरीराच्यामात्र लोभाकरितां, थोरांच्या मंडळींत लाज आणणारा आणि परिणामीं दुःख देणारा असा संधि पांडवांशीं मीं कसा करावा बरें ? कां, नीतिनिपुणा संजया, मी ह्मणतों हें खरेंना ? आणखी सांगतों. जरी आह्मी संधि करूं ह्मटलें तरी घडणार नाहीं.

## आर्या ७.

जे हीन शक्तिझाले रिपु त्यांशीं नृप न संधि [3]करतील;
संप्रति सानुज पांडव हीनानुज मी मला न वरतील. ७

धृतरा०— वत्सा, असें जरि झालें, तरी म्यां सांगितलें असतां आणि मागून घेतलें असतां युधिष्ठिर कोणतीही गोष्ट न ऐकेल असें होणार नाहीं. तुला आणखी एक सांगतों. युधिष्ठिर सर्वदा आपणास [4]अपकृष्ट असें मानतो.

दुर्यो०— असें कां बरें ?

धृतरा०— ऐक सांगतों, युधिष्ठिराची अशी प्रतिज्ञा आहे कीं, चौघांतून एक जरी भ्राता नष्ट झाला तरी मी प्राणधारण करणार नाहीं. यास्तव संग्रामांत मरणाची पाळी कोणावर येईल आणि कोणावर म

---

१ भ्रांति. २ कृष्ण. ३ अंगीकारतील. ४ कालग्रस्त.

येईल याचा नियम नाहीं. ह्मणून अनुजांच्या नाशाची शंका त्याच्या मनांत नेहमीं वागत आहे. ह्या कारणामुळें तुला आवडेल तसा संधि करावयास देखील तो आज सिद्ध होईल असें मला वाटतें.

**संजय०**– खरी गोष्ट, असेंच आहे.

**गांधारी**– मुला, हें तुझ्या पित्याचें भाषण सुयुक्तिक दिसतें. हें खरेंमान.

**दुर्यो०**– अहो तात, अहो अंब, अरे संजया, ऐका, तुमच्याच बोलण्यावरून न्याय झाला. पहा,

### श्लोक ८.

एका बंधुविनाहि जीवित नसो पार्थप्रतिज्ञा[१] अशी,
मेले शंभर[२] त्यां स्वजीवितधनीं आशा धरावी कशी;
मी दुःशासनशोणिताशनरिपु[३] प्राणा नको संहरूं,
लज्जा मानहि सोडुनी कृपणसा संधी न यांशीं[४] करूं. ८

**गांधारी**– ( हें ऐकून शोक करिते. ) हा बाळा दुःशासना, हा दुर्मर्षणा, हा विकर्णा अरे मला टाकून तुह्मी कोठें गेला ? ( आपणास ह्मणते. ) अगे वीरशतप्रसविनी[५] गांधारी, तूं दुःखशताला प्रसवलीस. सुतशताला नाहीं!

( सर्व ढळढळां रडतात. )

**संजय**– ( डोळ्यांत अश्रु आणून ) अहो तात, अहो अंब, तुह्मी राजा दुर्योधनाचें सांत्वन करून त्यास बोध करावा ह्मणून ह्या समरभूमीस आलां, आणि तुह्मींच असें करतां हें काय ? कांहीं विवेक करा.

**धृतरा०**– वत्सा, आमचीं दैवें तर परिच्छिन्न प्रतिकूळ झालीं आहेत, आणि तूंही शत्रूंविषयीं आपला मानबंध[६] सोडीत नाहींस, तर अशा समयीं एकल्या तुजवर जीव धरणारी आणि निरंतर दुःख भोगणारी ही तुझी आई गांधारी हिनें कोणाचा आश्रय करावा ; आणि म्यां तरी कोणाला शरण जावें ? सांग बरें!

**दुर्यो०**– ऐकावें ? तात, सांगतों काय करावें तें.

---

१ धर्मप्रतिज्ञा. २ शंभरभाऊ. ३ भीम. ४ पांडवांशीं. ५ शतपुत्रप्रसवणारी. ६ आभि

### श्लोक ९.

पृथ्वी आकळिली जिहीं सकळतें ऐश्वर्यही भोगिलें,
राजांनीं स्वशिरस्थरत्ननिचयें[1] ज्यांच्या पदां पूजिलें;
गेले ते शतपुत्र शत्रुंसि रणीं मारोनियां स्वःपुरा,[2]
पूर्वी ज्या धरिलें धुरेस सगरें ती तात वाहो धुरा.[3] ९

याहून विपरीत केलें असतां क्षात्रधर्माचें उल्लंघन केलें असें होईल

( इक्यांत पडद्यापलीकडे मोठा गलबला होतो. )

**गांधारी**– ( ऐकून भय पावते. ) संजया, हाहाकारानें युक्त असा रणवाद्यांचा शब्द ऐकू येतो.

**संजय**– खरेंच, तुह्मासारख्या भीरुजनांला येण्यास हें स्थळ योग्य नव्हे.

**धृतरा०**– संजया, पहा पहा, हा अतिभयंकर आणि अतिदीर्घ असा हा हाकार शब्द कशाचा होत आहे. याचें कांहीं तरी मोठें कारण असावें.

**दुर्यो०**– ताता, आतां मजवर कृपा करावी. आमचें दैव खचीत फिरलेंसें दिसतें. यास्तव जोंपर्यंत आणखी दुसरी कांहीं विपरीत गोष्ट कानीं आली नाहीं तोंपर्यंत मला संग्रामास जाण्याविषयीं आज्ञा द्यावी.

**गांधारी**– मुला, घटकाभर थांबून मजमंदभाग्येचें समाधान तरी कर.

**धृतरा०**– वत्सा, समरास जाण्याविषयीं जर तुझा निश्चयच आहे, तर प्रायःशत्रूचा गुप्तरूपें घात होईल असा तरी कांहीं विचार कर.

**दुर्यो०**– असें कसें होईल?

### आर्या १०.

माझ्या प्रत्यक्ष जिहीं माझे शतबंधु मारिले असती;
ते पर[4] गुप्त पणें नच माराया योग्यसे मला दिसती. १०

### आणखी आर्या ११.

अरिनीं केले असती गुप्तव्यवहार ते जसे खोटे;
तैसे काय करूनि फळ ज्यांतें समरीं न वानिती[5] मोटे. ११

---

१ मुकुटरत्नप्रभेनें. २ स्वर्गाप्रत. ३ वमवासरूप. ४ शत्रु. ५ वर्णिती.

गांधारी— मुला, तूं समरास जाईन ह्मणतोस, पण तूं सध्यां एकाकी आहेस. ह्यासमयीं तुला कोण साह्य करील बरें ?

दुर्यो०— मला साह्य !

आर्या १२

माते जरि एकाकी परवा मज शत्रुची नसे लव हीं;
दैवचि साह्य मजकरो आतां निष्पांडवी करीन मही.१२

(पडद्यापलीकडे कलकल्या नंतर शब्द होतो.)

अहो योधहो, तुह्मी जाऊन कौरवेश्वरास सांगा कीं, हें येथें मोठें रणकदन प्रवर्तलें आहे, आतां अप्रिय वार्ता ऐकून पराङ्मुख न होतां यासमयीं कालानुरूप जो सूड घ्यावयाचा असेल तो लौकर घ्यावा. पहा,

श्लोक १३.

सोडी चाबुक रश्मि[1]विद्ध[2]तनुजो पार्थांकितीं मार्गणीं,[3]
नेतो ओढुनि अश्वज्यास सहसा घेऊनियां धांवणीं;
वार्ता जाणवितोचि अंगपतिची[4] जो लोचनींच्या जळें,
शून्यस्पंदन[5] नेतसे स्वशिबिरा तो शल्य भीतीनळें.१३

दुर्यो०— (ऐकून शंकितपणें) सूता, हा वज्रपातासारखा दारुण असा अस्पष्ट शब्द कोणी केला बरें ? पहा पहा.

सारथी— आज्ञा महाराज. (बाहेर गेलासें करतो.) कोण आहेरे तेथें ? (घाबऱ्या घाबऱ्या आंत येतो. ) हाय हाय घात झाला. बुडालें सारें. (असें बोलून धाडकन घालून घेतो.)

दुर्यो०— सांग सांग सूता, असें काय करतोस ? सांग काय तें !

सारथी— महाराज, दुसरें, काय सांगूं ? घर बुडालें. हृदयांत शल्याप्रमाणें शल्यानें शिबिरांत प्रवेश करितां सर्व लोक मूर्छित केला. कारण कीं, तो मनोरथाप्रमाणें कर्णाचा शून्य[6] रथ घेऊन परत आला.

१ दोरे. २ घायाळ. ३ अर्जुनाच्या बाणांनीं. ४ कर्णाची. ५ रिकामा रथ. ६ रिकामा

**दुर्यो०**— हायरे मित्रा कर्णा, हायहाय (असें ह्मणून मूर्छित पडतो)

**गांधारी**— पुत्रा, सावध हो, सावध हो.

**संजय**— राजा, सावध हो, सावध हो.

**धृतरा०**— हाय हाय, काय हो संकट हें!

**आर्या १४.**

भीष्मद्रोणांमागें ज्याचा अवलंब[1] मानसीं धरिला;
तोही मत्पुत्राचा प्राणसखा कर्ण ईश्वरें हरिला. १४
वत्सा, सावध हो, सावध हो. अरे निर्दया दैवा!

**श्लोक १५.**

सोसूनि अंध शतपुत्रविपत्तिदाहा,
शोच्यादशेप्रति सभार्यहि पावला हा;
जो एक पुत्र उरला निजजीविकेला,
कैसा तयाविषयिं दीन निराश केला. १५

वत्सा दुर्योधना, ही तुझी माता दुःखभागिनी गांधारी हिचें कांहीं समाधान कर. ही दीनवाणी तुजकडे पाहात आहे. ऊठ ऊठ असें करूं नको.

**दुर्यो०**— (सावध होऊन) हा कर्णा प्राणसख्या, मला सोडून कोणीकडे गेलास?

**साकया १६.**

कर्णा टाकुनियां मित्रा, केली पर लोका यात्रा. ध्रुव०
बारे कर्णा सखया मजला, एकवार भेटावें;
बोलुनि वचन मधुर मजसींत्वां, परलोकातें जावें. १
एका एकीं कैसें जावें, टाकुनियां मित्रातें;
तुजवांचुनियां सखया मजला, नाहीं कोणीत्रातें. २

---

१ आश्रय.

**गांधारी**— मुला, तूं समरास जाईन ह्मणतोस, पण तूं सध्यां एकाकी आहेस. ह्यासमयीं तुला कोण साह्य करील बरें!

**दुर्यो०**— मला साह्य!

आर्या १२

मातें जरि एकाकी परवा मज शत्रुची नसे लव हीं;
दैवचि साह्य मजकरो आतां निष्पांडवी करीन मही.१२

(पडद्यापलीकडे कलकल्या नंतर शब्द होतो.)

अहो योधहो, तुह्मी जाऊन कौरवेश्वरास सांगा कीं, हें येथें मोठें रणकंदन प्रवर्तलें आहे, आतां अप्रिय वार्ता ऐकून पराङ्मुख न होतां यासमयीं कालानुरूप जो सूड घ्यावयाचा असेल तो लौकर घ्यावा. पहा,

श्लोक १३.

सोडी चाबुक रश्मि[1]विद्ध[2]तनुजो पार्थांकितीं[3] मार्गणीं,
नेतो ओढुनि अश्वज्यास सहसा घेऊनियां धांवणीं;
वार्ता जाणवितोचि अंग[4]पतिची जो लोचनींच्या जळें,
शून्यस्यं[5]दन नेतसे स्वशिबिरा तो शल्य भीतीबळें.१३

**दुर्यो०**— (ऐकून शंकितपणें) सूता, हा वज्रपातासारखा दारुण असा अस्पष्ट शब्द कोणी केला बरें! पहा पहा.

**सारथी**— आज्ञा महाराज. (बाहेर गेलासें करतो.) कोण आहेरे तेथें! (धावऱ्या धावऱ्या आंत येतो. ) हाय हाय घात झाला. बुडालें सारें. (असें बोलून धाडकन घालून घेतो.)

**दुर्यो०**— सांग सांग सूता, असें काय करतोस? सांग काय तें!

**सारथी**— महाराज, दुसरें, काय सांगूं? घर बुडालें. त्हृदयांत शल्याप्रमाणें शल्यानें शिबिरांत प्रवेश करितां सर्व लोक मूर्छित केला. कारण कीं, तो मनोरथाप्रमाणें कर्णाचा शून्य[6] रथ घेऊन परत आला.

१ दोरे. २ घायाळ. ३ अर्जुनाच्या बाणांनीं. ४ कर्णाची. ५ रिकामा रथ. ६ रिकामा

**दुर्यो०**— हायरे मित्रा कर्णा, हायहाय (असें ह्मणून मूर्छित पडतो)

**गांधारी**— पुत्रा, सावध हो, सावध हो.

**संजय**— राजा, सावध हो, सावध हो.

**धृतरा०**— हाय हाय, काय हो संकट हें!

### आर्या १४.

भीष्मद्रोणांमागें ज्याचा अवलंब[1] मानसीं धरिला;
तोही मत्पुत्राचा प्राणसखा कर्ण ईश्वरें हरिला. १४
वत्सा, सावध हो, सावध हो. अरे निर्दया दैवा!

### श्लोक १५.

सोसूनि अंध शतपुत्रविपत्तिदाहा,
शोच्यादशेप्रति सभार्यहि पावला हा;
जो एक पुत्र उरला निजजीविकेला,
कैसा तयाविषयिं दीननिराश केला. १५

वत्सा दुर्योधना, ही तुझी माता दुःखभागिनी गांधारी हिचें कांहीं समाधान कर. ही दीनवाणी तुजकडे पाहात आहे. ऊठ ऊठ असें करूं नको.

**दुर्यो०**— ( सावध होऊन ) हा कर्णा प्राणसख्या, मला सोडून कोणीकडे गेलास !

### साक्या १६.

कर्णा टाकुनियां मित्रा, केली पर लोका यात्रा. ध्रुव०
बारे कर्णा सखया मजला, एकवार भेटावें;
बोलुनि वचन मधुर मजसीत्वां, परलोकातें जावें. १
एका एकीं कैसें जावें, टाकुनियां मित्रातें;
तुजवांचुनियां सखया मजला, नाहीं कोणीत्रातें. २

---

१ आश्रय.

जासी खरा परंतू हा जन कोणा निरवुनि जासी;
अपुलें दुःख कथाया याणें, जावें कोणा पाशी. ३
तुजविण मजला नगमे पळभर, युगसम घटिका वाटे;
तूं माझी विश्रांती सखया, दुःख शोक बहुदाटे. ४
नाहीं वियोग तुजसीं माझा, नाहीं अप्रिय केलें;
ऐशा प्रियमित्राला सोडुनि, जाणें मनासि आलें. ५
तुज करितां म्यां राज्य रक्षणा, केले प्रयास फार;
तुजवर माझा सर्व भरंवसा, होता तुजवर भार. ६
तुझ्या बळें म्यां युधिष्ठिराशीं, फारचि विरोध केला;
जो हेतू म्यां मनीं आणिला, तो त्वां सिद्धिस नेला. ७
आतां कवणा स्वदुःख सांगूं, व्यसनीं कोणा बाहूं;
तुझ्या वियोगें दुःखचि सारें, सुख मी कोठें पाहूं. ८
क्षणभर थांब नकोकरूं घाई, एकाकी नचजावें;
हा मी आलों तुज सांगातीं, राहुनि काय करावें. ९
तूं गेल्यावरि मागें जगणें, लाजिरवाणें मजला;
मज वांचुनिही कैसें होइल, परलोकीं सुख तुजला. १०
कर्णा टाकुनियांमित्रा, केली परलोका यात्रा; ध्रु०

( पुन्हा मोह पावतो. त्यास सर्व सावध करितात. )

दुर्यो०— तुह्मी मला सावध करतां काय ?

### आर्या १७.

प्राणापरीस मजला, अधिकचि जो अंगराज[1] तो गेला;
तरि धरितों प्राणांतें, ताता निर्लज्जसा नहा मेला. १७

आणखी तुह्मांला सांगतों. मी सावध झालों तरएवढ्यासाठीं होईन.

---

१ कर्ण.

श्लोक १८.

शोच्यां न शोच्यपरि[1] शत्रुहता न वत्सा,
दुःशासनासहि न बंधु जना न कुत्सा;
ज्यानें दिलें मरणशोकद त्या वृषातें,[2]
नेईन तत्कुल लयास नहीं मृषातें. १८

गांधारी— मुला, नकोरे रडूं. क्षणभर अश्रु आटोपून धर.

धृत०— वत्सा, अंमळ अश्रूंचें परिमार्जन कर.

दुर्यो०— हे तात, हे अंब, माझ्या रडण्यासही तुह्मी प्रतिबंध करतां काय

आर्या १९.

ज्यानें माझ्या साठीं, प्राणत्यजिले न वारिलें त्यातें;
त्या करितांमी अश्रू, सोडित असतां निवारितां मातें. १९

सूता, कोणी बरें हें असंभावित आणि कुलांतकर[3] कर्म केलें ?

सारथी— महाराज, सैन्यांत अशी वार्ता उठली आहे.

आर्या २०.

क्षितिनें गिळितां चक्रें, अंगाधिप चक्रपाणिसारथिच्या;[4]
बाणांनीं हत झाला, अस्मत्सेनाकृतांतवासविच्या.[4] २०

दुर्यो०— असें ह्मणतात काय ? काय करूंरे ?

श्लोक २१.

कर्णाननेंदु स्मरतां, क्षोभला शोक सागरें;
वाडवाग्नी परी त्याला, क्रोधाग्नी खाय सत्वरें. २१

हे अंब, हे तात, आतां लेकरावर कृपा करावी.

आर्या २२.

हा ज्वलनशोकजन्मा, जाळितसे कीं मदीय कायाली;
तुल्यचि विपत्ति मजला, आज्ञा द्यावी रणीं निजायाला. २२.

---

१ शोक करण्यास योग्य. २ कर्णातें. ३ सकुलाचा नाशकरणारें. ४ अर्जुनाच्या.

धृतरा०– ( दुर्योधनास आलिंगून ह्मणतो. )

पद २३.

नको जाउं ऐशा रणा; बाळका नको जाउं ऐशा रणा. ध्रु०
साहसकर्मीं जीवित संशय; तेंच फलित आपणा. बा० १
तूं अभिमानें साहस करितां; कोण करिल वारणा. बाळ० २
अरिच्या सेना सकपट असती; न चुकति परमारणा. बाळ० ३
त्या भीमातें स्मरतां वाटे; पुरविल अपुल्या पणा. बाळका० ४
जातों ह्मणसीं तरिकां अमुची; तूजनये करूणा. बाळ० ५

गांधारी– पुत्रा, आतां तूं जाऊन त्या सुतशतकृतांता वृकोदराबरोबर संग्राम करणार काय?

दुर्यो०– माते, सध्यां वृकोदर एकीकडे असूं दे. अगोदर त्याचा समाचार घेतला पाहिजे.

श्लोक २४.

जो माझ्या मनिंचा मनोरथ गमे आंगासि जो चंदन,
नेत्रां इंदु तुह्मांसि शिष्यसुत या भावें करी वंदन;
ऐसा कर्ण रणांगणांत वधिला जेणें करूनी छळा,
हे माझे सहसा पडोत शर त्या दुष्टानराच्या गळा.२४

हे सूता, आतां उगाच कालातिक्षेप करणें नीट नाहीं. माझा रथ लौकर सिद्ध करून आण. तुला पांडवांचें भय वाटत असेल तर तुं येथेंच राहा. मी एकटाच गदा घेऊन समरभूमीस जातों.

सार०– महाराज, असें भलतेंच मनांत आणूं नका हा रथ घेऊन आलों पहा.

(असें बोलून निघून जातो.)

धृतरा–० वत्सा दुर्योधना, आह्मांला शोकाग्नींत जाळावें असाच जर तुझा दृढ निश्चय आहे तर, तुझ्या पदरीं मोठ मोठे वीर आहेत त्यांतून कोणाला तरी सैनापत्याचा अभिषेक कर. एवढें तरी आमचें ऐक.

दुर्यो०– हा केलाच आहे अभिषेक. नवा काय करावयाचा आहे?

गांधारी– कोणाला अभिषेक केला आहे, बाळा, जो या हताशेला मला आश्रय होईल?

धृतरा०– कोण शल्य? कीं अश्वत्थामा?

दुर्यो० अहो कशाला शल्य आणि कशाला अश्वत्थामा पाहिजे माझा मीच

श्लोक २५.

कर्णा आलिंगना देता, पार्थाचे प्राण हारिता;
प्रभूत[1] नेत्रवारींनीं[2], हा आत्मा अभिषेकिला. २५

(इतक्यांत पडद्यापलीकडे मोठा गलबला होतो)

अहो कौरवसैन्यांतील प्रधान योधहो, आह्मांला पाहून तुह्मी इकडे तिकडे कां पळत सुटलां?

पुरे करा आतां पळणें. तुमचा राजा दुर्योधन कोण्या ठिकांणीं आहे हें आह्मांला सांगा.

(सर्व घाबरून कान देऊन ऐकतात)

(सारथी घाबऱ्या घाबऱ्या आंत येऊन ह्मणतो)

सार०– महाराज, ऐका.

श्लोक २६.

आले एकरथारूढ, शोध काढीत तूमचा;

सर्व– सूता, ते कोण कोण बरें?

सार०– श्लोक उत्तरार्ध.

तो कर्णारि[3] क्रूर तोही, वृककर्मा[4] वृकोदर. २६

गांधारी– (भिऊन) पुत्रा, आतां एथें कोणता उपाय करावा?

दुर्यो०– आई, भिऊं नको. ही माझी गदा जवळच आहे.

गांधारी– जळो माझें जिणें. काय मी मंदभाग्या ही!

दुर्यो०–आई, यासमयीं खेद करून काय फळ? संजया, अरे संजया, ह्या

---

१ पुष्कळ. २ नेत्रोदकांनीं. ३ अर्जुन. ४ भीमसेन.

उभयतां पितरांस रथांत घालून लौकर शिबिरास पोहोंचीव. आमचा शोक घालविणारा गृहस्थ प्राप्त झाला. बरें झालें.

**धृतरा०**— वत्सा, क्षणभर थांब. बरें हे येतात यांचा मनोभाव कसा काय आहे तो पाहूं.

**दुर्यो०**— ताता, त्यांचा मनोभाव काय जाणावयाचा आहे? तुह्मी जा आपले. (धृतराष्ट्र व गांधारी अंमळ पुढे जाऊन उभीं राहातात.) (इतक्यांत एका रथावर बसलेले भीमार्जुन येतात.)

**भीमसेन**— अहो दुर्योधनाच्या सेवकांनो? अरे घाबऱ्या घाबऱ्या इकडे तिकडे कां भटकतां? आमची शंका धरूं नका आह्मांपासून तुह्मांला भय नसो. आह्मी विचारतों एवढें सांगा.

**श्लोक २७.**

कर्त्ता धूर्तछलाचा[1] जतुमयसदनीं[2] जाळिता पांडवांचा,
कृष्णा केशांबरांचा पवन[3] उडविता मित्र अंगाधिपाचा[4];
दादा[5] दुःशासनाचा हरूनि धनाहि दे दासता पांडवांला,
सांगा आहे कुठे तो नरपति तुमचा पाहुं आलों तयाला. २७

**धृतरा०**— संजया, ह्या दुष्टाचा मनोभाव क्रूर दिसतो. कायहो हें उद्दामपणाचें भाषण!

**संजय**— तात, हातांनीं करावयाचीं अप्रियें तेवढीं यांनीं केलीं, आतां तोंडांनीं करावयाचीं राहिलीं तीं करीत आहेत.

**दुर्यो०**— असो, सूता जा, त्या दोघांस जाऊन सांग, कीं हा मी दुर्योधन येथें आहें.

**सार०**— आज्ञा महाराज, (असें ह्मणून त्या उभयतांच्या जवळ जाऊन त्यांस ह्मणतो.) अहो वृकोदरजी, अहो अर्जुनजी, आमचे म्हाराज दुर्योधन मातापित्यांसहवर्तमान ह्या वटवृक्षाच्या छायेंत बसले आहेत.

**अर्जुन**— दादा, कृपाकरा. तीं उभयतां ह्मातारीं अगोदरच पुत्रशोकानें पीडित झालीं आहेत. त्यांत आणखी आपण जाऊन त्यांस दुःख द्या.

---

१ कपटयुत. २ लाक्षागृहीं. ३ वायु. ४ कर्णाचा. ५ वडीलभाऊ.

वें हें योग्य नाहीं. तर चला आपण येथून परत जाऊं.

भीमसे०— वेड्या, सदाचाराचें कोणी उल्लंघन करतो काय? वडील माणसें जवळ आलीं असतां त्यांस अभिवंदन केल्यावांचून जाणें योग्य नव्हे.

दोघे— (जवळ जाऊन, संजया, मातापितरांस आह्मी प्रणाम करितों हें कळीव. अथवा, थांब तूं कशाला, आह्मीच स्वतां कळवितों.

(असें ह्मणून रथाखालीं उतरतात.)

भीम०— आपलें नाम आपलें कर्म काय तें सांगून मग गुरूंस वंदन करावें असा सांप्रदाय आहे नव्हे ?

अर्जुन— थांबा दादा, अगोदर मी पुढें होतों. (जवळ जाऊन) हे तात, हे अंब,

श्लोक २८.

पुत्रांनीं धरिली जयावरि तुझ्या आशा जयाची रणीं,
ज्यानें लोक तृणासमान गणिले गर्वेंचि जो अग्रणी[1];
तैशा जो वधिता महारणमखीं राधासुता जाहला,
तो हा मध्यमपांडवेय[2] तुमच्या वंदीतसे पावला. २८

भीमसे०— आतां मी आपलें नामकर्म सांगून वंदन करतों. अहो तात, ऐका,

श्लोक २९.

नेले लयातें तवपुत्र ज्यानें,
जो मत्त दुःशासनरक्तपानें;
दुर्योधनाच्या चुरिता उरूतें,
तो भीम मी वंदितसें गुरूतें. २९

धृतरा०— अरे दुष्टा वृकोदरा, कशाला येवढी प्रौढी दाखवितोस? शत्रूंस अपकार[3] त्वांच दिला असें नाहीं. सर्वांची गोष्ट अशीच आहे. जेवढे क्षत्रिय ह्मणून अहेत तेवढे समरांगणीं पराक्रम करितात, जिंकितात, किंवा हरतात, अथवा मरून जातात. तूं कशाला इतकी व्यर्थ बडबड करून अह्मांस दुःख देतोस !

---

१ सेनापति. २ अर्जुन. ३ नाश.

उभयतां पितरांस रथांत घालून लौकर शिबिरास पोहोंचीव. आमचा शोक घालविणारा गृहस्थ प्राप्त झाला. बरें झालें.

**धृतरा०**— वत्सा, क्षणभर थांब. बरें हे येतात यांचा मनोभाव कसा काय आहे तो पाहूं.

**दुर्यो०**— ताता, त्यांचा मनोभाव काय जाणावयाचा आहे? तुह्मी जा आपले. (धृतराष्ट्र व गांधारी अंमळ पुढें जाऊन उभीं राहातात.) (इतक्यांत एका रथावर बसलेले भीमार्जुन येतात.)

**भीमसेन**— अहो दुर्योधनाच्या सेवकांनो? अरे धावऱ्या धावऱ्या इकडे तिकडे कां भटकतां? आमची शंका धरूं नका. आह्मांपासून तुह्मांला भय नसो. आह्मी विचारतों एवढें सांगा.

### श्लोक २७.

कर्त्ता द्यूत[1]छलाचा जतु[2]मयसदनीं जाळिता पांडवांचा,
कृष्णा केशांबरांचा प[3]वन उडविता मित्र अंगा[4]धिपाचा;
दादा[5] दुःशासनाचा हरूनि धनहि दे दासता पांडवांला,
सांगा आहे कुठे तो नरपति तुमचा पाहुं आलों तयाला. २७

**धृतरा०**— संजया, ह्या दुष्टाचा मनोभाव क्रूर दिसतो. कायहो हें उद्दामपणाचें भाषण!

**संजय**— तात, हातांनीं करावयाचीं अप्रियें तेवढीं यांनीं केलीं, आतां तोंडांनीं करावयाचीं राहिलीं तीं करीत आहेत.

**दुर्यो०**— असो, सूता जा, त्या दोघांस जाऊन सांग, कीं हा मी दुर्योधन येथें आहें.

**सार०**— आज्ञा महाराज, ( असें ह्मणून त्या उभयतांच्या जवळ जाऊन त्यांस ह्मणतो. ) अहो वृकोदरजी, अहो अर्जुनजी, आमचे म्हाराज दुर्योधन मातापित्यांसहवर्तमान ह्या वटवृक्षाच्या छायेंत बसले आहेत.

**अर्जुन**— दादा, कृपाकरा. तीं उभयतां ह्मातारीं अगोदरच पुत्रशोकांनें पीडित झालीं आहेत. त्यांत आणखी आपण जाऊन त्यांस दुःख द्या.

---

१ कपटद्यूत. २ लाक्षागृहीं. ३ पाय. ४ कर्णाचा. ५ वडीलभाऊ

वें हें योग्य नाहीं. तर चला आपण येथून परत जाऊं.

**भीमसे०**— वेड्या, सदाचाराचें कोणी उल्लंघन करतो काय? वडील माणसें जवळ आलीं असतां त्यांस अभिवंदन केल्यावांचून जाणें योग्य नव्हे.

**दोघे**— (जवळ जाऊन, संजया, मातापितरांस आह्मी प्रणाम करितों हें कळीव. अथवा, थांब तूं कशाला, आह्मीच स्वतां कळवितों.

(असें ह्मणून रथाखालीं उतरतात.)

**भीम०**— आपलें नाम आपलें कर्म काय तें सांगून मग गुरूंस वंदन करावें असा सांप्रदाय आहे नव्हे ?

**अर्जुन**— थांबा दादा, अगोदर मी पुढें होतों. (जवळ जाऊन) हे तात, हे अंब,

### श्लोक २८.

पुत्रांनीं धरिली जयावरि तुझ्या आशा जयाची रणीं,
ज्यानें लोक तृणासमान गणिले गर्वांचि जो अग्रणी[1];
तैशा जो वधिता महारणमखीं राधासुता जाहला,
तो हा मध्यमपांडवेय[2] तुमच्या वंदीतसे पावला. २८

**भीमसे०**— आतां मी आपलें नामकर्म सांगून वंदन करतों. अहो तात, ऐका,

### श्लोक २९.

नेले लयातें तवपुत्र ज्यानें,
जो मत्त दुःशासनरक्तपानें;
दुर्योधनाच्या चुरिता उरूतें,
तो भीम मी वंदितसें गुरूतें. २९

**धृतरा०**— अरे दुष्टा वृकोदरा, कशाला येवढी प्रौढी दाखवितोस? शत्रूंस अपकार[3] त्वांच दिला असें नाहीं. सर्वांची गोष्ट अशीच आहे. जेवढे क्षत्रिय ह्मणून अहेत तेवढे समरांगणीं पराक्रम करितात, जिंकितात, किंवा हरतात, अथवा मरून जातात. तूं कशाला इतकी व्यर्थ बडबड करून अह्मांस दुःख देतोस ?

---

१ सेनापति. २ अर्जुन. ३ नाश.

**भीमसे०**— अहो तात, पुरेआतां रागें भरूं नका.

श्लोक ३०.

कृष्णा[1] ओढूनिनेली कचधरुनि सभेमाजि ज्या ज्या नृपांनीं,
क्रोधाग्नीमाजि सारे शलभ कुळ तसे जाळिले पांडवांनीं;
यासाठीं ऐकवीतों न भुजबळमदें कीं न दर्पें तुह्मांला,
ज्या केल्या पुत्रपौत्रीं शुभ अशुभ कृती तूंचसाक्षी तयांला. ३०

**दुर्यो०**— अरे मूर्खा वायुपुत्रा, अरे, जो वृद्ध, राजा, त्यांत गुरु, वडील, त्याच्या अग्रभागीं तूं आपल्या निंद्य कर्मांची प्रशंसा करतोस काय ! आणखी पांडववधू राजसभेंत ज्यांनीं ओढून नेली त्यांचा मी परिभव केला. अशी मृषा प्रौढी दाखवितोस काय ? तर ऐक.

श्लोक ३१.

नेली ओढूनि भार्या तुझि[2] तुझि[2] अथवा त्या नृपाची[3] तयांची[4],
राजांच्या देखतांकीं मम नृप वचनें द्यूतदासीच साची;
ऐशांवरें विचारे परनृप वधिले कां अरे दुष्टसर्पा,
मातें वीर्याधिकातें न परिभवुनि तूं दाविशी व्यर्थ दर्पा. ३१

हादुष्टा, आतांच पहा, होतास कीं नव्हतास असें तुलाकरून टाकतों. ( असें बोलून क्रोधानें भीमास मारावयास उठतो.)

**धृतरा०**— ( दुर्योधनाचा हात धरून त्यास खालीं बसवितो. )

**भीमसे०**— ( क्रोधाचा आविर्भाव आणून अस्तन्या वर सारून, मिशांस पीळभरतो. )

**अर्जुन**— दादा, येथें याजवर क्रोध करून काय उपयोग ?

आर्या ३२.

हा आमुचीं अनिष्टें बोलाया शक्त नच करायाला;
शत बंधूंच्या दुःखें बडबडतो कोण गोंजितो याला. ३२

**भीमसेन**— अरेरे भरतकुलकलंका,

---

१ पांडववधु. २ भीमाची कीं अर्जुनाची. ३ धर्माची. ४ नकुलसहदेवांची.

आर्या ३३.

आतांचि धाडितों तुज दुःशासनभेटिलागिं जायाला,
जरि विघ्न न करितिल गुरु चुरितां तव सक्थि मद्गदाग्राला. ३३

(अरे मूर्खा आणखी सांगतों ऐक.)

श्लोक ३४.

शोकें स्त्रीवत् तुजकडुनि म्यां अश्रुतें टाकवीलें,
त्वद्भ्रात्याच्या उरुविघटनीं[1] तूज साक्षीहि केलें;
हें भोगाया तुज न वधितां रक्षिलें म्यां उदासें,
क्रुद्धा भीमा पुढुनि न कधीं वांचतासि प्रयासें. ३४

दुर्योधन— अरे दुष्टा भरतकुलाधमा, द्यूतदासा, पांडवपशो, मी तुझ्या सारखा व्यर्थ बडबड करणारा नव्हें, परंतु बोलण्याप्रमाणें करणारा आहें.

आर्या ३५.

आतांचि पाहतिल तुज पांडव समरांगणांत निजलेला,
जो मद्गदासुघटितें[2] भूषित वक्षोस्थिभूषणें[3] केला. ३५

भीमसेन— (हास्य करून) असें आहे तर तुझें बोलणें खरें मानलें पाहिजे. परंतु जवळच आलेली गोष्ट तुला सांगतों.

श्लोक ३६.

माझ्या पुष्टा भुजांनीं भ्रमितगुरुगदाघातसंचूर्णितोरा,
क्रूरा ठेवीन डावा स्वपद तव शिरीं देखतां सर्व वीरा;
ही भूषायोग्य[4] तूतें त्वदनुजरुधिरें चंदनें आनखाग्र,
केलें जैं लिप्त देहा तयिं अनुभविलीं भूषणें म्यां समग्र. ३६

(पडद्यापलीकडे शब्द होतो.)

अहो भीमसेनअर्जुनहो, ज्यानें आपले सकलशत्रु नाशाप्रति पावविले

१ ऊरफोडतांना. २ गदेनेंघडलेल्या. ३ अस्थिरूपभूषणानें. ४ भूषण.

ज्यानें आपल्या यशानें परशुरामाचें प्रख्यात यश लोपविलें, ज्यानें स्वप्रतापतापित दिङ्‌मंडळीं स्वजन स्थापित केले, असा हा अजातशत्रु राजा युधिष्ठिर तुह्मांस आज्ञा करीत आहे.

**दोघे—** आमचा राजा कोणती आज्ञा करितो बरें?

(पुन्हा शब्द होतो.)

### श्लोक ३७.

आप्तांनीं तेंकरावें लवकरि दहनीं भस्मसात् प्रेत राशी,
द्यावीं तीं अश्रुमिश्रें कशितरिहि जळें बंधुनीं बांधवांशीं;
सोधूतज्ञाति देहेंपडुनि रणिं जिहीं भोगिलीं दुःख दैन्यें,
गेला अस्तासि भास्वान्[1] रिपुसहित पहा आंवरावीं स्वसैन्यें. ३७

**दोघे—** आतां धर्मराज्याच्या आज्ञे प्रमाणें केलें पाहिजे.

(असें बोलून निघून जातात.)

(इतक्यांत पडद्यापलीकडे मोठ्यानें शब्द होतो.)

अरें गांडीवाकर्षणानें आपल्या बाहूंला शोभविणाऱ्या अर्जुनवीरा, आतां कोठें जाशील?

### श्लोक ३८.

कर्णक्रोधामुळें म्यां अजवरि अपुलें टाकिलें शस्त्र हातें,
शून्यारण्यांत तैसें समरिं बहु तुवां दाविलें विक्रमातें;
आतां स्पर्शस्मरोनी रणिं ममगुरूच्या उत्तमांगासि केला,
कल्पाग्नी पांडुपुत्र द्रुपद सुततृणें ज्वाळिता[2] द्रौणि[3] आला. ३८

**धृतरा०—** (ऐकून हर्षानें ह्मणतो.) वत्सा, दुर्योधना, द्रोणवधामुळें ज्याचा क्रोधाग्नि प्रदीप्त झाला आहे, ज्याला स्वपित्यापेक्षां बलशिक्षा अधिक आहे, जो देवासारखा पराक्रमी, असा अश्वत्थामा आला असें वाटतें. तर त्वां सामोरें जाऊन त्या वीराचा सत्कार यासमयीं करावा.

**गांधारी—** वत्सा, जाजा त्या महाभागा वीराला सामोरा जा.

---

१ सूर्य. २ जाळणारा. ३ अश्वत्थामा.

दुर्यो०— हेतात, हे अंब, काय कामाचा हा अश्वत्थामा, हा कशाचा महाभाग आणि कशाचा वीर, ज्यानें अंगराजाच्या रक्षणाविषयीं उपेक्षा केली, आणि जो त्याच्या नाशाची इच्छा करणारा, त्यानें यौवन, शस्त्र, आणि बल ह्यांचा भार व्यर्थ घेतला आहे, असें वाटतें. धिक्कार असो त्याला.

धृतरा०— वत्सा, ह्यासमयीं अशा पराक्रमी पुरुषास धिकारयुक्त वचनांनीं दुखविणें तुला योग्य नाहीं.

अश्वत्थामा— ( प्रवेश करून ) कौरवराजा, विजय असो.

दुर्यो०— ( उठून ) यावें गुरुपुत्रा, येथें बसावें. ( हातीं धरून त्यास खालीं बसवितो.

अश्वत्थामा— राजा दुर्योधना, तूं असा खिन्न कां ?

श्लोक ३९.

जें कर्ण कर्णसुखदायक बोलिला तें,
केलारणीं किति पराक्रम जाणिलें तें;
हा द्रौणि[1] सज्जधनु घेउनि सिद्ध झाला,
मारील शत्रु नृपते त्यज दुःखजाला[2]. ३९

आर्या ४०

कर्णानें कर्णप्रिय बोलुनि पुरुषार्थ कोणता केला;
मेला परंतु एकहि बोल तयाचा न शेवटा गेला. ४०

दुर्यो०— ( रागानें खोंचून बोलतो. ) आचार्यपुत्रा, तूं पूर्वी स्वस्छ राहून, आतां सिद्ध झालास काय ?

आर्या ४१.

अवसानीं कर्णाच्या युद्धकरावें असा तुझा हेत;
माझें[3] ही होऊंदे कर्णसुयोधन अभिन्न आहेत. ४१

अश्व०— राजा, काय तुला ह्मणावें ! अरे अद्यापि कर्णाविषयीं पक्षपात

---

१ अश्वत्थामा. २ दुःखसमूहा. ३ माझें ही अवसान

आणि मजविषयीं तिरस्कार तुझ्या मनांत आहेना? कां होईना. बरें तर कौरवेश्वरा, जातों मी आतां. (असें बोलून रागानें निघून जातो.)

धृतरा०— वत्सा, काय तुझा वेडेपणा हा! अशा संकटसमयीं त्या महाभाग अश्वत्थाम्यास कटु भाषणानें अगदीं विरस केलें हें काय बरें?

दुर्यो०— त्याला वाईट वाटावयाजोगें मी खोटें कोणतें बोललों सांग. आणि तो बोलला ती गोष्ट राग येण्याजोगी नव्हे काय? पहा,

श्लोक ४२.

ज्याचा अंतकळेचिना रिपुजना विद्याबळाचा कदा
दुर्भाग्यें तुमच्या रणांत सहसा पावे विपत्ती तदा;
त्यां मित्रा[1] अमुच्या समक्ष वदतो अंगाधिपातें[2]र्जुनीं,
सांगा काय विशेष[3] या गुरुसुतीं किंवा तया अर्जुनीं. ४२

धृतरा०— अथवा वत्सा, येथें तुजकडे तरी काय दोष आहे? भरत कुलाच्या समाप्तीचाच समय आला आहे. संजया, कसारे मी मंद भाग्य हा! आतां काय करूं? (थोडा विचार करून) असो आतां, जा जा माझा निरोप अश्वत्थाम्याला सांग.

श्लोक ४३.

नाहीं काय तुला स्मृती ममसुतासंगें पय प्राशिलें,
त्वां माझें सुदुकूल बालकपणीं लोळोनियां नाशिलें;
हा[4] शोकें निजबंधुच्याचि अथवा स्नेहें असें बोलिला,
तें आणूनि मनांत कोप करणें हें योग्य नाहीं तुला.४३

संजय— आज्ञा महाराज. (असें ह्मणून उठतो.)

धृतरा०— संजया, आणखी त्याला हें सांग.

श्लोक ४४.

बोलोनि[5] जें वितथशस्त्रहि टाकवीलें;

---

१ कर्णाला. २ निर्भर्त्सना करून. ३ अंतर. ४ दुर्योधन. ५ खोटें.

[1]बापाकडूनिहि पराभव पावविलें;
चिंतूनि तें स्वबळपौरुषही धरावें,
दुर्योधनोक्त न मनीं विहिता करावें.४४

संजय– आज्ञा ताता. (असें ह्मणून निघून जातो.)

दुर्यो०– सूता, माझा लढाईचा रथ सिद्ध कर लौकर.

सारथी– आज्ञा महाराज. (ह्मणून निघून जातो.)

धृतरा०– अगे पतिव्रते गांधारी, आतां आपण येथून शल्याच्या डेऱ्यास जाऊं. वत्सा, तूंही तेथें ये.

(असें बोलून सर्व निघूण जातात.)

पांचवे अंकांतील पद्यें.

श्लोक २७. आर्या १६. साक्या १०. पद. १. एकून पद्यें ५३.

---

१ द्रोणाकडून शमूंनीं.

---

## अंकपांचवासमाप्त.

# अंक ६.

## स्थळ.

समरोपांतभाग.

## पात्रें.

युधिष्ठिर,........................ज्येष्ठपार्थ.
द्रौपदी,........................पांडवांची स्त्री.
बुधक,........................सेवक.
पांचालक,........................जासूद.
जयंधर,........................चोबदार.
चार्वाक,........................राक्षस.
बुद्धिमतिका,........................दासी.
भीमसेन,........................धर्माचा भाऊ.
श्रीकृष्ण,........................पांडवपक्षपाती देव.
अर्जुन,........................धर्माचा भाऊ.

# वेणीसंहारनाटक.

## अंक ६.

( तदनंतर आसनावर बसलेला युधिष्ठिर, द्रौपदी, दासी, आणि सेवक हीं येतात. )

युधिष्ठिर— ( मनांत चिंतन करून आणि उश्वास टाकून ह्मणतो. )

### श्लोक १.

कष्टें भीष्म[1]महार्णवासि तरलों द्रोणा[2]नेला वारिलें,
नेला कर्ण[3]महाहि शांतिस तसा शल्यासि संहारिलें;
दैवें जों निजकार्यदुर्घटपरी थोड्यावरी पातलें
भीमें जीवित संशयांत सकळां आह्मांसि तों घातलें. १

द्रौपदी— ( डोळ्यांत पाणी आणून, ) "पांचालीनें" असें कां ह्मणांना ?

युधि०— कृष्णे त्वां तरी कशाचें भ्यांच असें ह्मटलें तरी चिंता नाहीं. ( सेवकाकडे पाहून, ) अरे वुधका,

सेवक— जी महाराज, काय आज्ञा आहे ?

युधिष्ठिर— अरे सहदेवास जाऊन सांग, कीं क्रुद्ध झालेल्या भीमसेनाची नवी भयंकर प्रतिज्ञा जाणून मानी कौरवराज कोणीकडे दडून बसला आहे हें समजत नाहीं. याकरितां त्याचा शोध लावण्यासाठीं चांगले शहाणे, आमचें हित इच्छिणारे, भक्तिमंत असे प्रधान, आणि सुयोधनाचा माग काढण्याविषयीं कुशल असे अनेक पुरुष, स्यमंत पंचकाच्या आसमंताद्भागीं फिरावयास पाठवावे; आणि या कार्यासाठीं त्यांस बहुत धन देऊं करावें; आणि कोणी शोध लावील त्यास मोठें इनाम मिळेल अशी दवंडी ही पिटावी; आणि कार्यसिद्धि झाल्यावर देऊंकेलेलें धन त्यांस देऊन वस्त्रादिकांनीं त्यांचा वहुमान करावा. आणखी असें सांग.

---

१ भीष्मसमुद्र. २ द्रोणाग्नि, ३ कर्णसर्प.

श्लोक २.

दाशांनीं[१] मार्ग शोधास्तव जळिं चिखलीं वाळवंटीं फिरावें,
रानीं खोऱ्यांत वल्लीतृणतरुपिहितीं बल्लवांनीं[२] शिरावें;
व्याधव्याघ्राटवींत[३] स्वपरपदखुणा जाणते संचरावे,
सोधाया त्या नृपातें सुचतुरमुनिच्या आश्रमीही फिरावें. २

बुधक०— आज्ञा महाराज. (असें ह्मणून जावयास उठतो.)

युधि०— अरे आणखी सहदेवाला असें सांग.

श्लोक ३.

शोधा रहीं[४] शंकित बोलणारे, जे सुप्तरोगी[५] विपिनांत सारे;
पक्षी पशू त्रासति फार जेथें, पदें नृपाचीं दिसतील तेथें ३

बुधक०— आज्ञा महाराज. (असें ह्मणून बाहेर जातो आणि पुनःआंत येऊन हर्षानें बोलतो.) महाराज, पांचालक आला आहे.

युधिष्ठिर— त्याला लौकर आंत आण.

बुधक— आज्ञा महाराज, (बाहेर जाऊन पांचालकास घेऊन आंत येतो.) पांचालका, हे महाराज बसले आहेत. जवळ जा.

पांचालक — (जवळ जाऊन) महाराजांचा जयजयकार असो, महाराजांस आणि राणीसाहेबांस कांहीं आनंदाची गोष्ट सांगावयास मी आलों आहें.

युधिष्ठिर— पांचालका, त्या दुरात्म्या कौरवाधमाचा[६] थांग लागला कायरे!

पांचालक— महाराज, केवळ थांग लागला इतकेंच नाहीं, साक्षात् तोच दुरात्मा सांपडला. जो देवीच्या[७] केशांबरांचें आकर्षण करवून महापातकी झाला.

युधि०— (हर्ष पावून पांचालकास आलिंगितो.) शाबास पांचालका, खरी आनंदाची गोष्ट सांगितलीस. पण तो दृष्टिगोचर झाला काय?

पांचाल०— महाराज, दृष्टिगोचर ह्मणून काय विचारतां? समरगोचर झाला काय असें विचारा.

---

१ कोळ्यांनीं. २ गवळ्यांनीं. ३ पारधी. ४ एकांतीं. ५ निद्रिस्त. ६ दुर्योधनाचा. ७ द्रौपदीच्या.

द्रौपदी– ( सभय होऊन ) काय तो समरगोचर झाला ? तर माझ्या नाथाशीं त्याशीं युद्ध लागलें काय ?

युधि०– ( शंकितहोऊन ) खरेंच कायरे माझा वत्स भीमसेन त्याशीं युद्ध करूं लागला ?

पांचाल०– खरेंच सांगतों. युद्ध लागलें. महाराजांच्या पायांपाशीं मी खोटें सांगेन काय ?

युधिष्ठि०– ( मनांत ह्मणतो. ) कसें होईल तें होऊ !

**श्लोक ४.**

जें त्रस्त चित्त असतें उरुविक्रमाचें[1],
तें होतसे निजविवेकविहीन[2] साचें;
मी जाणतों जरि बळास वृकोदराच्या,
होतें जयींहि मन शंकित फारत्याच्या. ४

(द्रौपदीच्या मुखाकडे पाहून तिचे डोळे पुसून ह्मणतो. अगे) सुक्षत्रिये द्रौपदी, तुला एक सांगतों.

**श्लोक ५.**

गुरू बंधू राजे सुहृद सकळां देखत अशा,
अह्मांते जी झाली कुरुपतिसभेमाजि कुदशा;
तितें व्हायापार द्विविधपथ[3] आहेचि बरवा,
क्षय स्वप्राणांचा कुरुपतिसुताचें[4] निधमवा. ५

अथवा आतां संदेह नकोच.

**आर्या ६.**

जो भी निजप्रतिज्ञाभंगा तो वीर निश्चयें आजी;
तव केशपाश बांधिल तो याच्या धर्षणीं[5] असे गाजी. ६

---

१ परक्रमीपुरुषाचें. २ विचारशून्य. ३ दोन प्रकारचा मार्ग. ४ दुर्योधनाचें. ५ धरण्यास समर्थ.

पांचालका सांग सांग बरें तो दुरात्मा कोण्या ठिकाणीं कसा सांपडला? आणि आतां काय चाललें आहे तें?

द्रौपदी– सांग सांग बापा काय तें ऐकूं दे.

पांचालक– ऐकावें उभयतांनीं. पहिल्यापासून सांगतों. शत्रुसैन्यांतील मद्राधिपति शल्य तर महाराजांनींच खपविला. शकुनीआदिकरून गांधार देशचे राजे जे टोळ त्यांस सहदेवानलानें दग्ध केलें. तेव्हां सैन्यास आवरणारा कोणी सेनापति नाहीं. यामुळें जिकडे तिकडे हाहाकार उठला आणि जे थोडे बहुत योद्धे उरले होते तेही समरभूमि सोडून गेले. कृपाचार्य, कृतवर्मा, आणि अश्वत्थामा हे तिघे तर कोणीकडे गप्प झाले, त्यांचा ठिकाण नाहीं. अशी कौरवसैन्याची दशा झाली असतां, आणि इकडील सैन्याचें रक्षण करणारा धृष्टद्युम्न सेनापति असून, आपणाकडील योद्धे विचित्र पराक्रम करून शत्रूंचा पराजय केल्यामुळें उन्मत्त होऊन, पळून जाणाऱ्या शत्रूंकडील वीरांच्या पाठीस लागले असतां, भीमसेनाची दारुणप्रतिज्ञा ऐकून तो दुरात्मा कौरवाधम[1] कोणीकडे जाऊन लपून राहिला हें समजेना.

युधि०– मग पुढें?

द्रौपदी– पुढें सांग काय झालें तें.

पांचालक– सांगतों, पण इकडे अवधान असावें. मग महाराज, भगवान् वासुदेव, भीमसेन, आणि अर्जुन हे तिघे एका रथावर बसून त्यांनीं स्यमंतपंचकाच्या आसमंताद्भागीं बहुत शोध केला, परंतु त्याचा थांग कोठें लागला नाहीं. असें झालें तेव्हां आह्मांसारखे भृत्य होते ते कपाळास हात लावून रडत बसले; कुमार अर्जुन हा दीर्घ आणि उष्ण निश्वास टाकूं लागला; कुमार वृकोदर[2] तर क्रोधानें रात्रीस घनमेघांत स्फुरणपावणाऱ्या विद्युल्लतेसारख्या पिंगल कटाक्षांनीं आपली गदा प्रदीपित करूं लागला; आणि भगवान् वासुदेव तर दैवाच्या करणीस दोष देऊं लागला; असें होत असतां भीम-

---

१ दुर्योधन. २ भीमसेन.

सेनानें दुरून एक पुरुष पाहिला. ज्यानें मांसाचें ओझें खालीं टाकिलें आहे, आणि नुकतेंच मारिलेल्या मृगांच्या रक्तानें ज्याचे हात पाय वस्त्रें भरलीं आहेत. असा तो पुरुष धांवत धांवत भीमसेना जवळ आला आणि श्वास लागल्यामुळें अर्धीं अक्षरें उमटतात अर्धीं उमटत नाहींत अशा वाणीनें सांगूं लागला. हे देवा राजकुमारा, एथून जवळच एक मोठें सरोवर आहे, त्याच्या तीरावर बरोबर दोन मनुष्यांच्या पावलांचे माग पाण्यांत गेलेले स्पष्ट दिसत आहेत, त्यांतून एक परत बाहेर निघालासा दिसतो, दुसरा निघालेला दिसत नाहीं. यावरून काय असेल तें आपण पाहावें. असें त्या पुरुषाचें भाषण ऐकतांच आह्मी सारेजण मोठ्या गडबडीनें त्यालाच पुढें करून निघालों, ते त्या सरोवराच्या कांठीं गेलों. पाहातों तों दुर्योधनाच्या पावलांचा माग पाण्यांत गेलेला दृष्टीस पडला. तेंव्हां भगवान् वासुदेव बोलला, हे वृकोदरा, सुयोधनाला जलस्तंभिनी विद्या माहीत आहे. तर तो खचीत तुझ्या भयानें ह्या सरोवरांत बुडी मारून बसला असावा. असें श्रीकृष्णाचें वचन ऐकून वृकोदरानें काय केलें कीं, नक्रादि सर्व जलचरांस त्रास होई असें त्या सरोवराचें पाणी हातांनीं ढवळलें, आणि दशदिशा भरून उरणारा असा मोठा भयंकर शब्द करून त्यास ह्मटलें, अरेरे व्यर्थमिरविलेल्या खोट्या पौरुषाचा अभिमान धरणाऱ्या आणि पांचालराजतनयेचें[1] केशांबरकर्षणरूप महापातक करणाऱ्या धार्तराष्ट्रापसदा,[2] पहा,

## श्लोक ७.

इंदूच्या विमलीं कुलीं जनि[3] तुझी हातीं गदा तोलशी[4]  
हा दुःशासनरक्तपानकरिता शत्रू मला बोलशी;  
दर्पानें मधुकैठभारि हरिशीं तूं उद्धतें चेष्टशी,  
मत्त्रासें नृपशो त्यजूनि समरा पंकांत कां कष्टशी. ७

हे मानांधा कौरवाधमा,

---

१ द्रौपदीचें. २ दुष्टधृतराष्ट्रपुत्रा. ३ जन्म. ४ धरिशी.

आणखी पहा श्लोक ८.

कृष्णेचा दीप्त कोपानल उपशमितप्राय केला[1], कचांचे,
सोडोनी पाश त्यांच्या वधुनि पति बळें कौरवांतःपुरांचे;
भीमें दुशासनाचें उर चिरुनि तुला दाविलें रक्तपान,
केलें त्वां काय भीमीं करुनि असमर्या सोडिला स्वाभिमान. ८

द्रौपदी– अहो नाथ, माझा क्रोध तर तुह्मीं शांत केला, पण तुमचें पुनरपि दर्शन मला सुलभ होईल तर, सारें खरें.

युधिष्ठिर– अगे कृष्णे, अशीं अभद्र भाषणें यासमयीं बोलूं नको. पांचालका, पुढें कसें झालें?

पांचालक– मग महाराज, भीमसेन इतकें टाकून बोलला तरी, जेव्हां तो बाहेर निघेना तेव्हां, भीमानें क्रोधाच्या आणि पराक्रमाच्या आवेशानें सरोवराच्या तीरावर पाय ठेवून आपली भयंकर महागदा दोहों हातांत धरून त्या सरोवरामध्यें, जसा समुद्रांत मंदराचल फिरावा तशी तळापर्यंत घालून झरझर फिरविली, तेणेंकरून सरोवरांतील पाणी बाहेर उचंबळलें, सर्व कमलांचा विध्वंस झाला, मोठमोठे ग्राह गदेच्या तडाख्यानें मूर्छित झाले, मग इतर जलचरांची काय कथा. पक्षी भयानें उडून गेले, आणि त्या गदेच्या भयंकर वेगानें सर्व पाणी गरगर भोंवडूं लागलें. एवढें मोठें सरोवर परंतु तळापासून वरपर्यंत अगदीं कालवून गेलें.

युधिष्ठिर– इतकें केलें तरी तो निघाला नाहीं!

पांचालक– निघाला नाहीं कसा? न निघून करतो काय?

श्लोक ९.

सोडी सरस्तळ[2] तदा वरि येइ वेगें,
कोपाग्निचे कणवमेखळ फाररागें-
भीमाचिया घुसळितां भुजमंदरानें,[3]
सिंधूत्थकाळकुटसा[4] त्यजिला सरानें.[5] ९

---

१ सुमर. २ सरोवराचें तळ. ३ भुजरूपमंदराचलत्यानें. ४ विषासारखा. ५ सरोवरानें.

**युधि०**— शाबास सुक्षत्रिया शाबास. माझा सुयोधन धैर्याचा खरा.

**द्रौपदी**— पांचालका, पुढें त्याशीं युद्ध झालें कीं नाहीं.

**पांचाल०**— युद्ध काय विचारतां महाराज, तो पाण्यांतून बाहेर निघतांच दोहों हातांनीं आपली भयंकर गदा उंच उचलून भीमावर उगारून त्यास ह्मणाला, अरे वायुपुत्रा भीमा, मी तुला भिऊन लपून बसलों असें तूं समजतोस काय? मूर्खा असें समजूं नको. मी पांडवांस नमारतां प्रसिद्धपणें वागण्यास लज्जित होऊन विश्रांति घेण्यासाठीं पाताळीं जाऊन बसलों होतों. आतां तुला दाखवितों तमाशा. असें तो बोलला असतां कृष्णार्जुनांनीं त्यांस हाक मारून सांगितलें कीं, अरे पाण्यांत युद्ध करणें नीट नव्हे, तुह्मी दोघे कडेवर या. असें सांगून भीम आणि सुयोधन यांस पाण्याच्या बाहेर मैदानांत आणिलें. मग कौरवराजा[1] आपली गदा भूमीवर ठेवून खालीं बसला, आणि इकडे तिकडे रणभूमीकडे पाहूं लागला तों, आपल्या कडील शतशः वीर मरून पडले आहेत; सहस्रावधि गज अश्व पदाति यांच्या कलेवरांचा खच झाला आहे; त्यांवर कंकगृध्रादिपक्षी बसले आहेत; कोल्हे लांडगे इत्यादि श्वापदें त्यांस ओढताहेत; कौरवसैन्याचा अगदीं उच्छेद होऊन गेला आहे; पांडवसैन्यांत सिंहनादाचा आणि रणवाद्यांचा कडाखा चालला आहे. मग आपला बंधु किंवा बांधव अथवा आप्तमित्र कोणीच आपणास सहाय राहिलें नाहीं; असें पाहून दुर्योधनानें दीर्घ आणि उष्ण असा दुःखाचा सुसकारा टाकिला. तेव्हां वृकोदर[2] त्यास बोलला, अरे कौरवराजा, आतां बंधुजन मेले ह्मणून खेद कशाला करतोस, पुरे. पांडवांस सहाय पुष्कळ आहेत, आणि मला सहाय कोणी नाहीं असें मनांत आणून उगाच संकटांत पडूं नको. तुला सांगतों.

**आर्या १०.**

आह्मां पांचांमध्यें जो तुजमानेल त्यासवें आजी[3];<br>
घेउनि शस्त्र कवच तूं सुयोधना उन्सवें करीं आजी[4]. १०

---

१ दुर्योधन. २ भीमसेन. ३ आज. ४ युद्ध.

असें भीमसेनाचें भाषण ऐकून डोळ्यांत किंचित् अश्रू आणून भीमार्जुनांकडे पाहून दुर्योधन बोलला.

**आर्या ११.**

दुःशासनकर्णवधें दोघेही गज समान आपराधी;

( भीमाकडे पाहून )

अप्रिय परियुद्धाला तूंचिप्रिय मज'वरी'न'[1] अपराधी[2]. ११

असें बोलतांच दोघे उठले आणि प्रथम परस्पर क्रोधेंकरून परुष[3] वाणीनें एकमेकांचीं वर्में कर्में काढून वाकलह करूं लागले. होतां होतां भीम आणि दुर्योधन दोघेही हातघाईवर येऊन घोर संग्रामास[4] प्रवर्तले. त्यांनीं आपल्या भयंकर गदा हातांत घेऊन एकमेकांभोंवतीं मंडळें घेण्यास आरंभ केला. इतक्यांत चक्रपाणी वासुदेव यानें मला महाराजांकडे जाण्यास आज्ञा केली, तोंच मी हा इकडे निघून आलों. देवकीनंदनानें महाराजांस निरोप सांगून पाठविला आहे कीं, प्रथम जेव्हां भीमाची प्रतिज्ञा पूर्ण नहोतां कौरवराज[5] नाहींसा झाला, तेव्हां आह्मांस फार वाईट वाटलें होतें, परंतु सांप्रतकाळीं पुन्हा भीमानें दुर्योधनास गांठलें आहे. आतां तुह्मांस भुवनतल निष्कंटक झालें असें खचीत समजावें, आणि आपल्या अभ्युदयास उचित असे मंगलसमारंभ संतत चालूं द्यावे. आतां कांहीं एक संदेह मनांत ठेवूं नये.

**श्लोक १२.**

सोन्याचे परिपूर्ण कुंभ सलिलें[6] राज्याभिषेका भरा,

कृष्णेच्या[7] चिरकालमुक्तकबरीबंधोत्सवातें[8] करा;

त्या[9] रामीं सुकुठार भासुरकरीं क्षत्रद्रुमच्छेदकीं,

क्रोधांधींहि वृकोदरीं[10] समरणीं शंका असे नाचकीं. १२

---

१ अर्जुनास. २ मति. ३ कठोर. ४ गदायुद्धास. ५ दुर्योधन. ६ उदकानें. ७ द्रौपदीच्या ८ वेणीबंधाच्यासमारंभानें. ९ परशुरामीं. १० भीमसेनां.

द्रौपदी– ( डोळ्यांत आसवें आणून ) त्रिभुवननाथ भगवान् श्रीकृष्ण जें आज्ञापितो तें अन्यथा कसें होईल ?

पांचालक– देवदेवाचा हा नुसता आशीर्वादच आहे असें नव्हे, तर, याप्रमाणें करावें अशी आज्ञाही आहे.

युधिष्ठिर– भगवंताची आज्ञा अन्यथा कोणकरील ? कोण आहेरे तेथें ?

कंचु०– ( आंत येऊन ) काय आज्ञा महाराज ?

युधि०– अरे भगवंताच्या आज्ञेवरून त्याच्या बहुमानास्तव आणि वत्सा भीमसेनास विजय आणि मंगल प्राप्त होण्यास्तव त्यास उचित असे मंगल समारंभ चालू करावयास सांग.

कंचु०– आज्ञा महाराज, ( मोठया उत्साहानें इकडे तिकडे फिरतो. ) अहो कारभाऱ्यांनो, अहो अंतः पुरांतील द्वारपालांनो, आपल्या युधिष्ठिर महाराज्यांची आज्ञा आहे कीं, जो आपल्या भुजबळानें कौरव सागर उतरला, ज्यानें दुर्धर प्रतिज्ञाभार हलका केला, जो धृतराष्ट्रशतसुतबालतरूंचें उन्मूलन करण्याविषयीं महावात झाला, जो दुःशासन दैत्याचें उरस्छळ विदारण्याविषयीं नरसिंह अवतरला, जो दुर्योधनाच्या ऊरूस्तंभांचा भंग करून निश्चित जय पावणार, त्या वृकोदराला मंगल होण्याकरितां प्रीतिपूर्वक अंतः करणानें मंगलसमारंभ करावे. ( आकाशाकडे कान देऊन ) काय ह्मणतां ? सर्वप्रकारें चोहोंकडे अधिकाधिक मंगलसमारंभ चालले आहेत हे पाहात नाहींस काय असें ? शाबास बापहो शाबास, नसांगतां काम करणें हें मनांतील स्वामिभक्ति प्रकाशित करतें. चालूंद्या, असेंच करा.

युधि०– अरे जयंधरा,

कंचु०– ( जवळ येऊन ) काय आज्ञा महाराज ?

युधि०– आज पांचालकानें आनंदाचें वर्तमान सांगितलें, याकरितां याला यथायोग्य बक्षीस देवीव.

कंचु०– आज्ञा महाराज. ( असें ह्मणून पांचालकास घेऊन निघून जातो.

द्रौपदी— महाराज, नाथ भीमसेन त्या दुष्टाला असें कां ह्मणाला बरें? कीं आह्मां पांचांमधून जो तुला आवडेल त्याच्याशीं युद्ध कर ह्मणून! बरें तर बरें, नाहींतर दोघां माद्रीसुतांतून एक मागता आणि त्याच्याशीं युद्धप्रसंग घालता तर केवढी गोष्ट कठीण झाली असती?

युधि०— कृष्णे, अगे जरासंधहंत्या भीमाच्या मनांत असें होतें, कीं तो दुर्योधन मनांत उमजेल कीं, आपले सर्व भ्राते आप्त मित्र वीर राजे मेले. अकरा अक्षौहिणी सैन्यांत कृपाचार्य कृतवर्मा आणि अश्वत्थामा हे तिघे मात्र उरले आहेत. आपणास सहाय कोणी नाहीं. एक शरीर मात्र अवशिष्ट आहे. तर आतां आपण अभिमान सोडावा. असें मनांत आणून कदाचित् शस्त्र त्याग करील, किंवा तपोवनास जाईल, अथवा आपल्या पित्याच्या द्वारानें संधि करवील. असें झालें असतां सकलरिपु जिंकण्याविषयीं जो प्रतिज्ञाभार घेतला आहे तो उतरावयाचा तसाच राहील.असें मनांत आणून तसें बोलला. आतां पाहिलें असतां पांचां पांडवांमध्यें एकाशीं ही समर करण्या विषयीं तो सयर्थ नाहीं. पण झालें तर बहुतकरून त्याचें भीमाशीं गदायुद्ध होईल असें मला वाटतें. हे सुक्षत्रिये, पहा.

श्लोक १३.

कोणी सत्य वृकोदरासम[1] बळी नाहीं गदायोधनीं,[2]
सीरीच्यापरि[3] हस्तलाघव बहू याहूनि[4] दुर्योधनीं;
भीमाशींच घडेल दुद्ध बहुधा शंका मला ही खरी,
त्या वत्सा धृतराष्ट्रपुत्रनलिनीनागासि रक्षो हरी. १३

(इतक्यांत पडद्यापलीकडे कोणी बोलतो.)

अहो मी तृषाक्रांत झालों, अहो मी उष्णानें व्याकुळ झालों. मला शीतळ उदक आणि शीतळ छाया देऊन कोणी माझा समाचार घ्या.

युधि०— (ऐकून कोण आहे तेथें?

कंचुकी— मी आहें. काय आज्ञा महाराज?

१ भीमासमान. २ गदायुद्धांत. ३ बलरामाचेपरी. ४ भीमाहून

युधि०— बाहेर कोण काय ह्मणतें पहा पहा.

कंचुकी— आज्ञा महाराज. (असें ह्मणून बाहेर जाऊन आंत येतो.) महाराज, कोणी क्षुधातृषाक्रांत अतिथि बाहेर आला आहे.

युधि०— त्याला लौकर घेऊन ये.

कंचुकी— आज्ञा महाराज, (असें ह्मणून जातो.)

(तदनंतर कंचुकीच्या बरोबर मुनिवेषधारी चार्वाकनामा राक्षस येतो.)

राक्षस— (मनांत ह्मणतो.) हा मी दुर्योधनाचा मित्र पांडवांस फसविण्याकरितां फिरत आहें. (उघडपणें,) अहो मी तृषाक्रांत झालों आहें. मला कोणी पाणी आणि सांवली द्यारे. (असें बोलून राजाच्या जवळ जातो. सारे उठतात.)

युधिष्ठिर— हे मुने मी अभिवंदन करतों.

राक्षस— हें आतिथ्य असूंद्या. अगोदर मला पाणी द्या कोणी. अरे जीव सोकलारे!

युधि०— मुने, आसनावर बसावें. आलें पाणी.

राक्षस— (आसनावर बसून,) त्वां हीं आसन घेऊन बसावें.

युधि०— कोण आहेरे तेथें? पाणी आणा लौकर.

कंचुकी— (पाण्यानें भरलेली झारी घेऊन जवळ जातो) महाराज, शीतळ सुवासित जळानें भरलेली ही झारी आणि हा पेला.

युधिष्ठिर— मुने, हें उदक स्वीकारून तृषेची शांति करावी.

राक्षस— (पाय धुऊन जलस्पर्श करतो.) कायहो तुह्मी क्षत्रिय आहां असें वाटतें.

युधि०— आपण चांगलें जाणतां. होय मी क्षत्रियच आहें.

राक्षस— तुह्मी ह्या कौरवपांडवांच्या युद्धांतले क्षत्रिय असाल. तर प्रतिदिवशीं तुमच्या स्वजनांचा नाश होतच असेल. यासाठीं तुह्मांपासून यासमयीं उदकादिक पदार्थ कांहींच घेऊं नये. असो तुलतच्या छायेनें आणि नदीवरच्या थंड वाऱ्यानेंच मी निवांत होईन.

द्रौपदी– बुद्धिमतिके ताडाच्या विंझण्यानें भटजीबावांस वारा तरी घाल.

( दासी वारा घालते. )

राक्षस– अगे, दूर हो, आह्मांसारख्यांस असला उपचार योग्य नाहीं.

युधि०– हे मुने, आपण इतके कशानें श्रांत झाला बरें ?

राक्षस– आह्मा मुनिजनांला युद्धचमत्कार पाहाण्याची आवड फार ह्मणून त्या महाक्षत्रियांचीं द्वंद्वयुद्धें पाहाण्याकरितां स्यमंतपंचकक्षेत्रांत फिरत असतों. आज तर शरदृतूंतल्या तीव्र उन्हांत उभें राहवेना तेव्हां अर्जुनसुयोधन यांचें अर्धेंच गदायुद्ध पाहून तें तसेंच सोडून इकडे आलों. ह्मणून फार श्रांत झालों.

( सर्व खिन्न होतात. )

कंचुकी– भटजीबावा, असें नव्हे. भीमसुयोधनांचें गदायुद्ध असें बोला.

राक्षस– आःकाय बोलतोसरे ? तुला पुरता वृत्तांत ठाऊक नसतां उगीच मधें तोंड घालून माझा धिक्कार करतोस काय ?

युधि०– महर्षे, आपणच सांगावें यथार्थ काय असेल तें.

राक्षस– थांबा, क्षणभर विसांवा घेऊन सर्व तुह्मांला सांगतों कायतें. पण या झगेवाल्यास सांगणार नाहीं.

युधि०– मुने, अर्जुनसुयोधनांचें ह्मटलें तें काय तें सांगा.

राक्षस– तें म्यां पुर्वींच सांगितलें, कीं त्यांचें गदायुद्ध प्रवृत्त झालें ह्मणून

युधिष्ठिर– भीमसुयोधनांचें नाहीं काय ?

राक्षस– तें तर पुर्वींच होऊन गेलें. त्याचें काय आतां.

( ऐकून युधिष्ठिर आणि द्रौपदी मोह पावतात. )

कंचुकी– ( आंगावर उदक शिंपून, ) महाराज, सावध व्हा, सावध व्हा.

दासी– बाईसाहेब सावध व्हा, सावध व्हा.

( दोघें सावध होतात. )

युधिष्ठिर– काय सांगतां ऋषे, भीमसुयोधनांचें गदायुद्ध पुर्वींच होऊन गेलें ह्मणून ?

द्रौपदी– भगवंता, सांगा सांगा काय झालें तें.

राक्षस– कंचुक्या, हीं उभयतां कोण आहेतरे? हीं मला इतकें खोदून-खोदून कां विचारतात?

कंचुकी– ब्रह्मदेव, हा राजा युधिष्ठिर आणि हीं पांचालराजाची कन्या द्रौपदी.

राक्षस– अरेरे, म्यां घातक्यानें फार वाईट गोष्ट केली हीं.

द्रौपदी– हा नाथा भीमसेना, (असें ह्मणून मोह पावते)

कंचुकी– कशाला सांगितलें हें!

दासी– बाईसाहेब सावध व्हा, सावध व्हा.

युधि०– (डोळ्यांस पाणी आणून) हे ऋषे,

आर्या १४.

ह्या तुमच्या संदिग्धें वचनें मी फार होतसें दुःखी,
कळतां निश्चित तत्व प्राणत्यागेंचि होइन अदुःखी. १४

राक्षस– (आनंदानें आपल्या मनांत ह्मणतो.] हाँ कसा माझा प्रयत्न लागू झाला! (उघड) जर हें वर्तमान तुह्मांस अवश्य सांगितलेंच पाहिजे, तर बाबा संक्षेपानें सांगेन. कांकीं, बंधूचें व्यसन कोणी कोणास विस्तारानें सांगू नये.

युधि०– (ढळ ढळ रडूं लागतो.) मुनिवर्या कसेंही असो सांगाच.

श्लोक १५.

सांगा कसें तरि मुने संक्षेपें कीं सुविस्तरें;
वत्साचें काय तें ऐकों तुह्मां म्यां दिधला क्षण[1].१५

राक्षस– ऐका तर सांगतों.

श्लोक १६.

पूर्वी कौरव[2] भीम घेउनि गदा युद्धासि जों लागले,

द्रौपदी– (अकस्मात् उभी राहून ह्मणते.) मग पुढें?

राक्षस– (मनांत) ह्या दोघांस पुन्हा मोहांत घातलें पाहिजे. याला कोणती युक्ति योजावी. तर असें बोलावें.

१ अवसर. २ दुर्योधन.

(उघडपणें पुढें श्लोक ह्मणतो.)

तेथें राम[1] तयासमक्ष करितां युद्धा वहू भागले;
आणोनी प्रियशिष्यता मनिंबळें ते खूण जी दाविली,
ती जाणूनि सुयोधनें प्रतिकृती[2] दुःशासनघ्नां[3]दिली. १६

युधि०— हा वत्सा वृकोदरा, (असें ह्मणून मूर्च्छित पडतो)

द्रौपदी— हा नाथ भीमसेन, माझ्या परिभवाच्या प्रतीकारासाठीं तुह्मीं स्वजीविताचा परित्याग केला. अहो मला सौगंधिक कमळें आणून देण्याविषयीं केवढा तुह्मीं प्रयत्न केला, जटासुर, बकासुर, हिडिंबासुर, किर्मीर, कीचक, जरासंध, यांचा तुह्मीं सहज लीलेनें वध केला. आणि यासमयीं असें कसें झालें. हा प्राणनाथ, एकदां तरी माझ्याशीं बोला. (असें ह्मणून मूर्च्छित होते.)

कंचुकी— (डोळ्यांत आसवें आणून,) हा भीमसेन, हा धृतराष्ट्रकुलकमलिनीकुंजर, कोणीकडे गेलास! महाराज सावध व्हा सावध व्हा. अगे बुद्धिमतिके, द्रौपदीबाईस सावध कर. मुनिवर्या, तुह्मीं ही महाराजांचें सांत्वन करावें.

राक्षस— (मनांत) आतां प्राण टाकविण्याचें सांत्वन करतों (उघडपणें,) अरे बाबा भीमाग्रजा[4], क्षणभर स्वस्थ हो. आणखी थोडें सांगावयाचें राहिलें आहे.

युधि०— (सावध होऊन) महर्षे, आणखी काय सांगावयाचें राहिलें आहे?

राक्षस— तदनंतर तो सुक्षत्रिय भीमसेन रणांत देहटाकून वीरलोकास गेला असतां अर्जुनानें भावाच्या शोकें करून पुष्कळ बाष्पें नेत्रांतून टाकल्यावर भ्रातृवधाच्या दुखास्तव आपल्या हातचें गांडीव धनुष्य खालीं टाकून रक्तानें भरलेली जी गदा भीमसेनाच्या मुठींत होती तीच बळानें ओढून घेतली. तेव्हां वासुदेवाच्या मनांत संधि करावयाचा होता ह्मणून त्यानें निवारण केलें. तरी, "येथे कांहीं शक्ति असली तर" अशा उपहासयुक्त गंभीर वाणीनें सुयोधनानें हाक

---

१ बलराम. २ प्रतिकारउलटा. ३ भीमाला. ४ धर्मराजा.

मारली असतां तुझा तिसरा भाऊ अर्जुन त्या कौरवराजावरोबर गदायुद्ध करूं लागला. तेव्हां बळरामानें असें मनांत आणिलें कीं, गदायुद्धांत अर्जुनापेक्षां सुयोधन निपुण आहे, तस्मात् कदाचित् त्याच्या गदाघातानें अर्जुनास भलतेंच कांहीं झालें असतां अर्जुनाचा पक्षपाती वासुदेव यास वाईट वाटेल. ह्मणून त्यानें मोठ्या प्रयत्नानें कृष्ण आपल्या रथांत घालून द्वारकेस नेला.

युधि०— शाबासरे अर्जुना, चांगली गोष्ट केलीत्वां, तूं तर भीमाचा उतराई झालास. अरे जेव्हां त्वां हातचें गांडीवधनुष्य टाकिलें, तेव्हांच भीमसेनाची वाट त्वां धरिली ठीकच झालें. पण आतां मी कोणत्या उपायानें प्राणत्यागाचा महोत्सव अनुभवूं ?

पद १७.

ती भीमाची वार्तापरिसुनि धर्मराज तळमळी,
जशीका जिवना विणमासळी. ध्रु०
हावत्सा हाताता भीमा काय गती जाहली,
शत्रुनें कशी वेळ साधिली;
आह्मीं सर्वांनीं ही आशा तुजवरती ठेविली,
असासि कीं तूं अमची सांवली;
आह्मां करितां वनांत दुःखें फार तुंवां भोगिलीं,
आमुचीं दुवर्चनें सोशिलीं;
चालबदलून— कां आह्मां सोडुनि जावेंसें वाटलें;
कीं पहिल्याहुनि बा दुःख अधिक दाटलें;
कीं अमुच्यावरचें प्रेममनीं काढलें;
चालपहिली,— यास्तव कोणा पुसल्यावांचुनि गेलासी स्वस्छळीं,
टाकुनी आह्मांतें भूतळीं. ती. १
मी भ्रात्यांला संहाराया मूर्तकाळ जाहलों,
करंटा कशास मी जन्मलों;

मातेच्या मी गर्भापासुनि कां न पतन पावलों,
कशाला दीर्घ काळ वांचलों;
तसाच कामीं घनांत नाहीं तपावरुनि राहिलों,
कशाला मोहीं या गुंतलों;
चालबदलून,– राज्यसुखाची धरिली आशा मनीं;
म्यां दायादांशीं वैर बांधिलें जनीं;
त्यांनीं मजकां नाहीं वधिलें वनीं;
चालपहिली,– कां म्यां मूढें नाहिं उपडिली वैरतरूची मुळी,
कशाला जाता भ्रातावळी, ती० २
पदोपदींत्वां संकटसमयीं आह्मांसांभाळिलें,
असुनिकां यासमयीं सोडिलें;
लाक्षासदनांतूनि अह्मांतें त्वां नसतें काढिलें,
शत्रुनीं होतें कीं जाळिलें;
म्यां कितवानें तुजला द्यूतीं पणासि जरिलाविलें,
तरीत्वां नाहीं मनिं आणिलें;
चालबदलून,– त्वां दुर्जयहि जरासंधदेहफाडिला;
किर्मीरहिडिंबासुर काळा वाढिला;
जीमूत कीचक प्राणांतें नाडिला;
चाल प०– वधुनि बकातें त्या विप्राला सुखवुनि त्याची कुळी,
राखिली मातेची हीरळी. ती०३
हारे दैवा कूपीं घालुनि दोर कसा कापला,
साधिला दावा त्वां आपला;
राज्यसुखातें मोहुनि अपुला घात करुनि घेतला,
आत्मजनशोकामाधें घातला;
अमचा रक्षक तोच अह्मांवरिहारेकैसा कोपला,
शत्रुचा अर्थ भला साधला;
चालबद०– त्या पार्थाची ही गती कळेना कशी;

किती दुःख हें सांगूं कोणापशीं;
धांव श्रीहरे अंत किती पाहशी;
चाल प०— नाराण सुत ह्मणतो कांहोंबुडतां मायाजळीं,
हरिरूपें जाइल दुःखावळी.
ती भीमाची वार्ता परिसुनि धर्मराजतळमळी,
जशीका जिवनाविण मासळी. ४

**द्रौपदी—** अहो प्राणनाथ, भीमसेन, तुह्मी भावाचे कनवाळू असून जो गदायुद्धाविषयीं अनभ्यस्त भाऊ तो शत्रूच्या तोंडीं सांपडला असतां त्याची उपेक्षा करणें तुह्मांस योग्य नाहीं. अहो धांवा धांवा. त्याचा प्राणसखा श्रीकृष्ण तोही यासमयीं सोडून गेला. आतां त्याचें रक्षण कोण करील? (असें ह्मणून मूर्छित होऊन पडते)

**राक्षस—** मग मी.—

**युधिष्ठिर—** मुने, असूंद्या आतां, या पुढें आणखी ऐकणें कशास पाहिजे? हा ताता! हा भीमसेना! हा लाक्षाग्रहसमुद्रांतून तरण्याविषयींच्या तरंडका[1]! हा किर्मिर, हिडिंब, बक, जरासंध, जयमल, इत्यादिकांच्या हंत्या[2]! हा कीचकदुःशासनरूप कमलांस तुडविणाऱ्या मत्तकुंजरा[3]!

श्लोक १८

ह्या निर्लज्ज दुरोदर[4] व्यसनिची भोगोनि दुःखाशता,
भक्तीनेंचि तुवांगजायुतबळें स्वीकारिली दासता[5];
आतां त्याहुनि कोणती अपकृती[6] केली असे मीं तुला,
कीं गेलासि सुदूर सोडुनि अशा दीना अनाथा मला. १८

**द्रौपदी—** (सावध होऊन ह्मणते,) महाराज, हें काय ह्मणतां आपण?

**युधिष्ठिर—** दुसरें काय ह्मणावयाचें आहे?

१ नौकारूपा. २ मारणाऱ्या ३ मत्तगजा. ४ द्यूत. ५ दास्य. ६ अपकार.

## गीत १९

कीचकातें मारणारा, बक हिडिंब किर्मीरा;
मुष्टिमोदक चारणारा, तो अस्ता गेला. १
जरासंध पर्वताचा, चूर्ण कर्ता अशनी साचा;
व्यसनीं सांभाळिता अमचा, तो अस्ता गेला. २
ज्याचें विशाळ वक्षस्छळ, परिघा ऐसे बाहू सरळ;
अतुळ ज्याचें शौर्यबळ, तो अस्ता गेला. ३
कृष्णे तुझा जो प्रियभर्ता, माझा अनुज जो सुखदाता;
अर्जुनाचा ज्येष्ट भ्राता, तो अस्ता गेला. ४
ऐसें बोलुनियां कृष्णेला, धर्मराजा मूर्छित पडिला;
नारायणसुत विनवी त्याला, कीं होइल उदय. ५

द्रौपदी— हायरे दुर्दैवा, काय दुःख हें!

## पद २०

आहारेदैवाकायहेंत्वांकेलें, दुःखाच्याडोहींकांमातेंलोटीलें. आ० धु० भ्रतारपांचपं चप्राणमाझे, त्यांचीयायोगेंदेहमाझासाजे; त्यांतूनीएकगेलीयासहजे, उरलेजेतेही राहतिलकोण्याकाजे. १ पतिंचीआज्ञानाहींम्यांमोडीली, समानप्रीतीनाहींम्यां तोंडीली, दूसरीजोडनाहींम्यांजोडीली, कोणतीचुकमजपासूनघडली. २ शत्रू च्यारक्तेंमाखील्याहातांनीं, घालीनवेणीतुझीमीयेऊनी; बोलीलाप्राणनाथकींवच नीं, वीसरत्याचापाडीलातन्मनीं. आ० ३ दोघेंहीमातेंटाकूनीयांगेला, भावाची राहीं करूणातूझाला; मनींचामनींमनोरथजीराला, मजकडेबोललावूंमीकोणा ला. आ० ४ झालीहीऐशीगतीह्यापांचांची, कैंवारीमाझाआशामजज्याची; ध रिलीवाटत्यानेंद्वारकेची, आतांमीआशाधरावीकोणाची. आ० ५ श्रीकृष्णामा झ्यासखयावातूंधावें, असतांतुंआह्मांहेंदुःखबाधावें; ह्मणवीशीबहिणहीतेंकांसां डावें, शत्रूनींतूझ्यादासांसीनाडावें. आ० ६ दीनोद्धरणासत्वरधांवघेईं, आला सीमागेंतैसाआजयेईं; भगिनीसमजमाहेरासनेईं, रक्षूनीपतीचूडेदानदेईं. आहा रे० ७ यापरीशोकपांचाळीनेंकेला, दयाळूदेवधांवूनीयांआला; दवडूनीदुःख

आनंदवर्षला, तेंयेथेंनारायणसूतबोलीला. ८ आहारेदैवाकायहेंत्वांकेलें, दुःखा च्याडोहींकांमातेंलोटीलें.

अहो प्राणनाथ, वीरक्षत्रियांस आपली प्रतिज्ञा सोडणें योग्य नाहीं ह्मणून तुह्मी बोलल्याप्रमाणें स्वतां येऊन माझी वेणी बांधा. अथवा मीच तुह्मांजवळ येतें, क्षणभर माझी मार्गप्रतीक्षा करा!

( असें बोलून पुन्हा मोह पावते. )

**युधिष्ठिर**— ( आकाशा कडे पाहून ) आई पृथे, ही तुझ्या पुत्राची रीति कशी ती पाहिलीना ? मी एकटा अनाथ विलाप करतों, आणि तो मला टाकून कोणी कडे गेला, हें चांगले काय ? हे वत्सा जरासंधशत्रो, इतके दिवस तुझा अखंड पराक्रम ऐकून शेवटीं तुझें आयुष्य सहसा नष्ट झालें हें वैपरीत्य लोकांच्या दृष्टीस पडलेंना ? अथवा मला कशी भूल पडली. पहा,

श्लोक २१.

त्वां मातें पृथिवी दिली तरि तुझ्या संकोच चित्तीं वसे,
द्यूतीं म्यां तुजलाविलें जरि पणीं तो खेद तूतें नसे;
मत्प्रीत्यर्थ तुवां विराटभवनीं दुःखें बहू साहिलीं,
तूं जाणार पुढें ह्मणोनिच अशीं चिन्हें तुझीं पाहिलीं. २१

( राक्षसास ह्मणतो. ) हे मुने काय सांगितलें तुह्मीं ?

पुर्वी कौरव भीम घेउनिगदा युद्धासि जों लागले,
तों ये राम तया समक्ष करितां युद्धा बहू भागले;
आणोनि प्रियशिष्यता मनिंबळें तैं खूण जी दाविली,
ती जाणोनि सुयोधनें प्रतिकृती दुःशासनघ्ना दिली.

( हा पूर्वोक्त श्लोक ह्मणतो. )

**राक्षस**— होहो असेंच.

**युधि०**— हाय हाय, आमचीं दैवें विपरीत झालीं. हे भगवता, कामशाला, कृष्णाग्रजा, बलरामा, त्वां तरी असें करावें काय ?

श्लोक २२.

ज्ञातिप्रीती न धरिलि मनीं धर्मही क्षत्रियाचा,
नाहीं प्रेमा वहु मदनुजीं[1] जाणिला स्वानुजाचा[2];
दोघां शिष्यांवरिहि तुमची भेददृष्टी नसावी,
या दुर्भाग्यावरि विमुखता[3] काय ऐशी करावी. २२

( द्रौपदीच्या जवळ जाऊन, ) अगे पांचाळी, उठ उठ सावध हो, अगे यासमयीं तूं आणि मी समदुःखी आहों, मग मोह पावून मला कां अति दुःख देतेस ?

द्रौपदी– ( सावध होते, ) हे प्रणनाथा, भीमसेना, दुःशासनानें सोडलेला हा माझा केशपाशदुर्योधनाच्या रक्तानें माखलेल्या हातांनीं त्वां येऊन बांधावा. कांगे बुद्धिमतिके, तुझ्याच समक्ष माझ्या प्रणनाथानें प्रतिज्ञा केली होतीना ? ( कंचुकीकडे पाहून ) कायरे जयंधरा, केशरचना करावी अशी श्रीकृष्णाची आज्ञा आहेना ? अगे आण तर फुलांच्या माळा, आणि घाल माझी वेणी. श्रीकृष्णानें सांगून पाठविलें तसें कर. तो कधीं असत्य वोलावयाचा नाहीं. अगे पण मी शोकसंतापानें हें भलतेंच काय वोललें ? दुसऱ्याच्या हातानें ही वेणी घालावयाची नव्हे. माझा प्राणनाथ अझून दूर गेला नाहीं, मी त्याच्या मागून गमन करितें. ( युधिष्ठिराकडे फिरून, ) महाराज, माझ्यासाठीं चिता प्रदीप्त करावी, आणि आपणही क्षात्रधर्मास अनुसरून माझ्या प्राणनाथाचें जीवित ज्यानें हरिलें त्याचा जाऊन सूड घ्यावा.

युधि०– पांचाळी ठीकच वोलली. असेंच केलें पाहिजे. अरे जयंधरा ह्या दुःखभागिनी द्रौपदीस चिता सिद्ध करून दे, ह्मणजे ही चितेंत प्रविष्ट होऊन आपलें दुःख दूर करील. आणि माझेंही धनुष्य सज्ज करून आण. मी तिकडे जातों. अथवा धनुष्य कशाला पाहिजे, नको.

१ अर्जुनीं. २ कृष्णाचा. ३ प्रतिकूलता.

श्लोक २३

त्याच्याचि[1] देहरुधिरें भरल्या गदेतें,
घेऊनि टाकुन धनू जय लाभ देतें;
जें श्रेय आज रणिं मेळविलें जयानें,[2]
मातेंहि तेंच असु काय मला जयानें.[3] २३

**राक्षस**— राजा, शत्रूंस जिंकून जय मिळवावा असें जर तुझ्या मनांत नाहीं, तर भलते कोठें तरी जाऊन प्राण त्याग कर. पण तिकडे जाऊन कांहीं फळ नाहीं.

**कंचुकी**— छी छी मुनें, काय बोललास हें ? हें भाषण मुनिजनास योग्य नाहीं. हें राक्षसास योग्य आहे.

**राक्षस**— ( आपल्या मनांत ) यानें मला ओळखलें काय ? ( बाहेर ) अरे कंचुक्या, मी असें कां बोललों याचें कारण तूं समजलास नाहीं सध्यां अर्जुन आणि दुर्योधन ह्यांचें गदायुद्ध चाललें आहे. आणि गदायुद्धाविषयीं कोणाचें सामर्थ्य किती आहे हें ही मला ठाऊक आहे. हा बिचारा राजर्षि एका दुःखानें इतका दुःखित झाला आहे. त्यांत हा तिकडे गेला आसतां, न जाणों दुसरें दुःख याच्या गळीं पडलें तर कसें होईल ? तसें नव्हावें याकरितां मी असें बोललों

**युधि०**— ( अश्रु टाकीत टाकीत ) शाबास मुने, फारच दयायुक्त भाषण तुमचें हें.

**कंचु०**— महाराज, आपण देवासारखे समर्थ असून प्राकृत पुरुषा प्रमाणें शोकग्रस्त होऊन क्षात्रधर्माचा त्याग करतां हें काय ?

**युधि०**— आर्या जयंधरा, ऐकतोस ?

श्लोक २४.

ज्यांहीं सुरांसि निज विक्रम दर्शवीला;
तेजें रणांत बहु लाजविलें रवीला;
ते भीम अर्जुन रणीं पडले तयांला,
पाहीन तोहि[4] रिपु जो सुकृतार्थ झाला. २४

---

१ भीमाच्या. २ अर्जुनानें. ३ विजयानें. ४ सुयोधन.

अगे पांचाल राजतनये द्रौपदी, माझ्या दुष्ट आचरणानें तुला अशी दुःखदशा प्राप्त झाली. तर हा अग्नि पेटला ह्मणजे, आपण बरोबरच यांत प्रवेश करून प्रियबंधूंच्या भेटीस जाऊं.

द्रौपदी— महाराज, बरें आहे. तर मग काष्ठांचा राशि लौकर करवावा. कायरे ? कोणी महाराजांची आज्ञा ऐकत नाहीं काय ? हाय हाय प्राणनाथ, आज महाराजांस तुह्मी नाहींसे झाल्यामुळें परिजनही यांचा तिरस्कार करतात.

राक्षस— भरतकुलांतील स्त्रियांस पतीशीं सहगमन करणें योग्यच आहे.

युधि०— महर्षे, आमचें वचन यासमयीं कोणीच ऐकत नाहीं. कसें करावें. आपण तरी कृपा करून आह्मांस काष्ठराशि करून द्यावा.

राक्षस— छी छी, हें कर्म मुनिजनास फार विरूद्ध आहे. ( मनांत ) हाँ— आतां बरीक माझे मनोरथ पूर्ण झाले. आतां यांच्या दृष्टीस नपडतां जवळच राहून मी स्वतां यांची चिता पेटवितों. ( बाहेर ) राजा, याउपर मी येथें राहावयास समर्थ नाहीं. हा मी चाललों पहा. ( असें बोलून निघून जातो. )

युधि०— गे कृष्णे, आमचें वचन कोणीच करीत नाहीं, काय करावें ! असो. आतां मीच जातीनें काष्ठें मिळवूनआणून चितेस आग लावतों.

द्रौपदी— तर महाराज, त्वरा करा आतां. त्वरा करा.

( इतक्यांत पडद्यापलिकडे गलबला होतो,

द्रौपदी— ( ऐकून भय पावते. ) महाराज, हा कोणाचा तरी महा गर्विष्ठाचा उद्दाम शब्द ऐकूयेतो. तर आणखी दुसरें कांहीं अप्रिय ऐकावयाचें आहे ह्मणून विलंब करतां काय ?

युधि०— नाहीं, विलंब कशाचा. हीं केली सिद्धता. ऊठ आतां. ( सर्व उठतात. ) अगे पांचाली, तूं आपल्या सासूला आणि सपत्नीजनाला निरोप सांगावयास सांगून, परिजनास जावयास आज्ञा दे. येथून त्यांस जाऊंदे.

द्रौपदी– बरें तर महाराज, मी सासूबाईला असा निरोप सांगून पाठवितें कीं, हिडिंब किर्मीर जरासंध इत्यादिकांपासून ज्यानें जय मिळविला तो तुमचा मध्यमपुत्र माझ्या दुर्भाग्येच्या पक्षपातामुळें परलोकास गेला.

युधि०– अगे बुद्धिमतिके, माझाही निरोप मातृश्रीला असाच सांग. कांकीं,

**श्लोक २५.**

माते तुला जतुगृहांतुनि[1] काढियेलें,
जेणें सुतांसह बळें वनिं रक्षियेलें;
ऐशा प्रिया तव बळिष्ठ वरा सुताचें[2],
सांगेल कोण तुज याविण पाप साचें[3]. २५

आर्या जयंधरा, तूंही, पांडुकुलामध्यें बृहस्पतीसारखा बुद्धिमान् आमचा कनिष्ठबंधु जो माद्रीपुत्र सहदेव, त्याजकडे जाऊन त्याला सांग, कीं कुरुकुलकमलवनाचा दावानल जो तुझा ज्येष्ठ भ्राता युधिष्ठिर, तो परलोकास जावयास निघाला तेव्हां त्यानें तुला सांगितलें आहे कीं तूं माझा आवडता धाकटा भाऊ, माझ्या वचनांत वागणारा, व्यसनांत किंवा अभ्युदयांत मोह पावणारा नव्हेस, सदा धैर्यवान्, नीतिमान्, सदा तुझे गुण आठवावे, अशा तुला आलिंगन देऊन तुझा मस्तक हुंगून मी प्रार्थना करतों.

**श्लोक २६.**

लहान आहेस जरी वयानें, आहेस तूं तुल्य मशीं श्रुतानें[4];
तूं बुद्धिनें श्रेष्ठ खरा गणावा, मनीषितेनेंहि[5] गुरू ह्मणावा. २६

**आर्या २७.**

तुज विनवितों करावा, मजवरिल स्नेहशिथिल जाचकसा[6];
द्यावया उदक पित्या तूं आह्मांसिहि पूर्णकाळ वांचकसा. २७

आणखी. **साक्या २८.**

नकुल तुझा जो भ्राता लहान आहे बहु अभिमानी,

---

१ लाक्षागृहांतुनी. २ भीमसेनाचें. ३ मरणवार्ता. ४ शास्त्राभ्यासानें. ५ विचारीपणानें.
६ दुःखप्रद.

अगे पांचाल राजतनये द्रौपदी, माझ्या दुष्ट आचरणानें तुला अशी दुःखदशा प्राप्त झाली. तर हा अग्नि पेटला ह्मणजे, आपण बरोबरच यांत प्रवेश करून प्रियबंधूंच्या भेटीस जाऊं.

द्रौपदी— महाराज, बरें आहे. तर मग काष्ठांचा राशि लौकर करवावा. कायरे ? कोणी महाराजांची आज्ञा ऐकत नाहीं काय ? हाय हाय प्राणनाथ, आज महाराजांस तुह्मी नाहींसे झाल्यामुळें परिजनही यांचा तिरस्कार करतात.

राक्षस— भरतकुलांतील स्त्रियांस पतीशीं सहगमन करणें योग्यच आहे.

युधि०— महर्षे, आमचें वचन यासमयीं कोणीच ऐकत नाहीं. कसें करावें. आपण तरी कृपा करून आह्मांस काष्ठराशि करून द्यावा.

राक्षस— छी छी, हें कर्म मुनिजनास फार विरुद्ध आहे. ( मनांत ) हां— आतां वरीक माझे मनोरथ पूर्ण झाले. आतां यांच्या दृष्टीस नपडतां जवळच राहून मी स्वतां यांची चिता पेटवितों. ( बाहेर ) राजा, याउपर मी येथें राहावयास समर्थ नाहीं. हा मी चाललों पहा. ( असें बोलून निघून जातो. )

युधि०— गे कृष्णे, आमचें वचन कोणीच करीत नाहीं, काय करावें ! असो. आतां मीच जातीनें काष्ठें मिळवूनआणून चितेस आग लावतों.

द्रौपदी— तर महाराज, त्वरा करा आतां. त्वरा करा.

( इतक्यांत पडद्यापलिकडे गलबला होतो,

द्रौपदी— ( ऐकून भय पावते. ) महाराज, हा कोणाचा तरी महा गर्विष्ठाचा उद्दाम शब्द ऐकूंयेतो. तर आणखी दुसरें कांहीं अप्रिय ऐकावयाचें आहे ह्मणून विलंब करतां काय ?

युधि०— नाहीं, विलंब कशाचा. हीं केली सिद्धता. ऊठ आतां. ( सर्व उठतात. ) अगे पांचाली, तूं आपल्या सासूळा आणि सपत्नीजनाला निरोप सांगावयास सांगून परिजनास जावयास आज्ञा दे. येथून त्यांस जाऊंदे.

द्रौपदी— बरें तर महाराज, मी सासूबाईला असा निरोप सांगून पाठवितें कीं, हिडिंब किर्मीर जरासंध इत्यादिकांपासून ज्यानें जय मिळविला तो तुमचा मध्यमपुत्र माझ्या दुर्भाग्येच्या पक्षपातामुळें परलोकास गेला.

युधि०— अगे बुद्धिमतिके, माझाही निरोप मातृश्रीला असाच सांग. कांकीं,

श्लोक २५.

माते तुला जतुगृहांतुनि[1] काढियेलें,
जेणें सुतांसह बळें वनिं रक्षियेलें;
ऐशा प्रिया तव बळिष्ठ वरा सुताचें[2],
सांगेल कोण तुज याविण पाप साचें[3]. २५

आर्या जयंधरा, तूंही, पांडुकुलामध्यें बृहस्पतीसारखा बुद्धिमान् आमचा कनिष्टबंधु जो माद्रीपुत्र सहदेव, त्याजकडे जाऊन त्याला सांग, कीं कुरुकुलकमलवनाचा दावानल जो तुझा ज्येष्ठ भ्राता युधिष्ठिर, तो परलोकास जावयास निघाला तेव्हां त्यानें तुला सांगितलें आहेकीं तूं माझा आवडता धाकटा भाऊ, माझ्या वचनांत वागणारा, व्यसनांत किंवा अभ्युदयांत मोह पावणारा नव्हेस, सदा धैर्यवान्, नीतिमान्, सदा तुझे गुण आठवावे, अशा तुला आलिंगन देऊन तुझा मस्तक हुंगून मी प्रार्थना करतों.

श्लोक २६.

लहान आहेस जरी वयानें, आहेस तूं तुल्य मशीं श्रुतानें[4];
तूं बुद्धिनें श्रेष्ठ खरा गणावा, मनीषितेनेंहि[5] गुरू ह्मणावा. २६

आर्या २७.

तुज विनवितों करावा, मजवरिल स्नेहशिथिल जोंचकसा[6];
द्यावा उदक पित्या तूं आह्मांसिहि पूर्णकाळ वांचकसा. २७

आणखी. साकया २८.

नकुल तुझा जो भ्राता लहान आहे बहु अभिमानी,

1 लाक्षागृहांतुनी. २ भीमसेनाचें. ३ मरणवार्ता. ४ शास्त्राभ्यासानें. ५ विचारीपणानें. ६ दुःखप्रद.

आह्मां ऐसें हृदय तयाचें तरि त्यातें बहु मानी. १
वात्सल्यानें बाळपणीं जरि वाढविलें नकुळाला;
त्याच्या वचनीं त्वां वागावें नाहीं दोष कुळाला. २
सांप्रत म्यां जी पदवी[1] वरिली ठावी झाली तुजला;
वत्सा ती त्वां न वरावी हें, देणें द्यावें मजला. ३
स्नेह पाशहा बहु दुःखप्रद ठाउक आहे तुजला;
यास्तव भीमाविजयातें ही विसरुनि विसरें मजला. ४
गेला पांडू परलोकातें, नाहीं हृदय निवालें;
साश्रूदक त्या तुवांचि द्यावें, भागा तुझ्याचि आलें. ५
दायादांचे[2] गृहीं रहावें, होउनि शरण तयांला;
किंवा यादवकुळीं वसावें, आश्रय योग्य तुह्मांला. ६
अथवा वनांत जाउनि राहीं, धरुनि कास सुतपाची;
रक्षीं देह कसातरि वत्सा, आण तुला बापाची[3].
ऐसा निरोप त्या धर्मानें, सहदेवा पाठविला,
त्याचा प्रेमा शतवार मनीं, त्यासमयीं आठविला. ८

अरे जयंधरा. तुला माझ्या गळ्याची शपथ आहे, तूं लौकर जाऊ न हें सर्व वर्तमान त्याला अवश्य सांग बरें.

द्रौपदी– अगे बुद्धिमतिके, माझी प्रियसखी सुभद्रा इला सांग, कीं वत्से उत्तरेस पाळी चुकून तीन महिने होऊन चवथा महिना लागला आहे. तर तिच्या गर्भाचें सावधपणें संरक्षण कर. कांकीं, तोच गर्भ आतां कुलप्रतिष्ठापक आहे. परमेश्वराच्या कृपेनें सुरक्षित वाढला तर परलोकास गेलेल्या श्वशुरकुलास आणि आह्मांस उदक देणारा तोच होईल.

युधि०– (डोळ्यांस पाणी आणून,) हाय हाय कायही दुराशा!

श्लोक २९.

ज्याच्या शाखा दुर पसरुनी व्यापिल्या भूतळातें,

[1] प्राणत्यागरूप. [2] कौरवांचे. [3] पांडूची.

ज्याचीं अग्रें[1] वर सरकुनी चुंबणारीं नभातें;
दैवें ऐसा तरु करपला शोभवी जो वनाला,
आतां आशा उरलि तरुच्या अंकुरीं या जनाला.२९

द्रौपदी— महाराज, आतां आपला बेत लौकर सिद्धीस न्यावा हें बरें. (कंचुकीकडे पाहून) जयंधरा, तुला शपथ घातली तरी तूं जात नाहींस काय?

कंचुकी— (मोठ्यानें रडतो.) हारे पांडुराजा, तुझे सार्वभौमाचे पुत्र हे अजातशत्रु, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, ह्यांचा असा दारुण परिणाम व्हावा काय? हे देवी कुंती, भोजराजाच्या मंदिराची पताका तूं, काय तुला दुःख हें!

श्लोक ३०.

भावाच्या तनयें तुझ्याचि हरिनें पार्थाचिया शालकें,
भीमाच्या गुरुनें हि मत्तहलिनें शत्रूचियापालकें;
बाई त्वत्सुतकाननासि सहसा कैसें पश झाळिलें,
ज्यांनीं[2] बाहुबळें महीस सुसुखा देऊनियां पाळिलें. ३०

दिंड्या ३१

बाईकुंतीहेंनवलकसेंझालें, तुझ्याभाच्यांनींकायअसेंकेलें; भरींघालुनिअभिमानि गुंतवीलें, गोडबोलुनिशेवटींनागवीलें. १ तुझ्याभावाचेपुत्रबाइसाचे, रामकृष्ण प्रत्यक्षतुझेभाचे; मेहुणेकींहेभीमअर्जुनांचे, कायएसेवीनोदहेतयांचे. २ एक कपटीजोचाळवीजगातें, दुजादांडगाह्मणतिहलीज्यातें; नाठवीलेंमानसींतिहीं नातें, तुझ्याजाळीलेंपुत्रकाननातें. ३ ज्याच्याअंकींठेवलेंशीरभावें, कायत्यानेंतें स्वतांनराखावें; शत्रुपक्षघेतलाबळदेवें, तरीहरिनेंत्याकायनवारावें. ४ जेणेंबहु तांसंकटींधांचवीलें, भक्तरक्षणेंयशसांचवीलें; तयाकृष्णींप्रेमहीवाढवीलें, शेवटीं तेंसर्वहीव्यर्थगेलें. ५ प्रेमज्याचेंत्वत्सुतींजसेंतोकीं, पहासमयींउदासहोयतोकीं; अर्जुनाचाह्मणवितासखालोकीं, तेणेंकैसेंघातलेंतूजशोकीं. ६ तुझानंदनभीमजो

१ आकाशातें. २ व्यासुतांनीं.

शहाणा, धार्तराष्ट्राच्याकाळहोयप्राणा; तोचरामाचामुख्यशिष्यराणा, रामें कैसाफोडिलावीरदाणा. ७ उभयतांचेंवारणकरायाला, कायशक्तीनव्हतीच त्याहरीला; राज्यसारेंदेऊनिकौरवांला, बरेंहोतेंधडितावनाह्यांला. ८ बाइकुंती दैवचीतुझेंफुटलें, आयुष्याचेंसूत्रतेंजयींतुटलें; प्रेमराहिलत्यांचियामनींकुठलें, तुजवारेंवाटेलउभेंसुटलें. ९ असाकंचुकिनेंफारशोककेला, खालेंघालुनिवदना सिउभाठेला; जरीजायाहोइनाधीरत्याला, तरीवंदूनीजावया निघाला.१०

(रडत रडत निघून चालता होतो)

युधि०– आर्या जयंधरा,

कंचुकी– (माघारा फिरून) काय आज्ञा महाराज.

युधि०– कांहीं बोलावयाचें आहे. अगोधर असें दैव तुमचें कोठें आहे, नाहींच, पण जर कदाचित् अर्जुन विजयी झाला, तर येवढा निरोप त्याला सांग.

**आर्या ३२.**

झाला यद्यापि हलधर[1], भीमाच्या सत्य हेतु मरणाचा;
क्रोधमनीं न धरावा, आप्ततुझा बंधु कंसहरणाचा[2].३२

**आर्या ३३.**

मजवरचें प्रेमउणें करुनि वरावें अरण्यपदवीतें;
परि पुनरापि न करावें, क्षत्राचें कर्म हाय वदवीतें.३३

कंचुकी– आज्ञा महाराज, (ह्मणून निघून जातो.)

युधि०– (हर्षयुक्त होऊन,) वाहवा, पहा हा भगवान् हुताशन[3] उंचउंच ज्वालारूप हस्तांनीं आह्मांसारख्या व्यसनी जनांसही बोलावीत आहे. तर यामध्यें मी आपलें शरीर समिधेप्रमाणें टाकून देईन.

द्रौपदी– महाराज, कृपा करावी, पहिल्यानें मला अग्नींत प्रवेश करूंद्या.

युधि०– असें आहे तर, दोघें बरोबरच प्रवेश करूं आणि परलोकींचें सुख बरोबरच भोगूं.

---

१ बलराम. २ कृष्णाचा. ३ अग्नि.

दासी– हे इंद्रादिलोकपालांनो तुह्मीं यासमयीं या उभयतांचें रक्षण करा. हा एक चंद्रवंशांत उत्पन्न झालेला राजर्षि, ज्यानें स्वतां राजसूय यज्ञें करून अग्नि तर्पिला, तसाच खांडव वनानें अग्नीस तृप्त करणाऱ्या अर्जुनाचा ज्येष्ठ बंधु, ज्याला पुण्यश्लोक ह्मणतात, तो हा राजा युधिष्ठिर, आणि ही देवी पांचालराजाची साक्षात् कुलदेवताच, यज्ञवेदीपासून जिची उत्पत्ति, ती ही याज्ञसेनी, हीं उभयतां सध्यां ह्या निर्दय कालानल[1]ाच्या मुखांत इंधना[2]प्रमाणें दग्ध होत आहेत, ह्यांचें रक्षण करा. (त्या उभयतां पुढें अडवीपडून ह्मणते.) उभयतां महाराजांनीं हें काय आरंभिलें आहे?

युधिष्ठिर– अगे बुद्धिमतिके, प्रियपतीच्या वियोगीं हिला, आणि प्रियभ्रात्याच्या वियोगीं मला हेंच करणें योग्य आहे. यांत कांहीं वाईट नाहीं. बाई, ऊठ ऊठ थोडें उदक आण.

दासी– आज्ञा महाराज, (असें ह्मणून बाहेर जाते आणि पाणी घेऊन आंत येते.) जय असो महाराजांचा. हें उदक आणिलें.

युधिष्ठिर– हे पांचाली, तुझा पक्षपाती जो भीमसेन त्यास आणि प्रिय जो अर्जुन त्यास तूंही उदकांजळी दे.

द्रौपदी– तें महाराजांनीं करावें. मी अग्नींत प्रवेश करितें.

युधिष्ठिर– असो, लोकांत जी चाल आहे तसें केलें पाहिजे. अगे बुद्धिमतिके, इकडे आण तें उदक.

दासी– (उदकपात्र जवळ नेते,) हें आणलें महाराज.

युधि०– (हातपाय धुऊन आचमन करून ओंजळींत उदक घेतो.) हा जलांजलि गुरुगांगेया भीष्माकारणें असो; हा प्रपितामहा शंतनूकारणें असो; हा पितामहा विचित्रवीर्याकारणें असो; (डोळ्यांत अश्रु आणून,) ताता पांडो, आतां तुलाही उदक देण्याचा समय हाच आहे. हें शेवटचें उदक तुला देतों. हा जलांजलि स्वर्गस्था पित्या पांडूकारणें असो.

१ प्रळयाग्नीच्या. २ काष्ठाप्रमाणें.

**श्लोक ३४.**

आजपर्यंत दिधलें, तुह्मां यावरि दुर्मिळ;
ह्मणूनि तात हे अंब, प्यावें म्यां दिधलें जळ. ३४

हा कमलनेत्रा वत्सा भीमा, हा तुलाही जलांजलि देतों. पण,

**श्लोक ३५.**

देतों तुला भरुनि अंजलि तोय घ्यावें,
माझें तुझेंहि अविभक्त असोंचि द्यावें;
आहे तृषा तुज तरी क्षण वाट पाहे,
प्याया तुझ्यासहचि लौकर येत आहें. ३५

अथवा सुक्षत्रियाच्या गतीस पावलेला माझा वत्स भीमसेन त्याला भेटावया जोगें माझ्या पदरीं पुण्य कोठचें. आणि जो मला टाकून गेला तो माझी वाट तरी कशाला पाहील.

**पद ३६.**

भीमाअतांचिकांरेरोष, केलामजवरती. भी० ध्रु०
पहिल्यापासुनिमाझामान,कांतूंकरितोसिअवमान;
घ्यालोंमातेचेंमीथान, त्याचेंपानकेलेंत्वां. भीमा० १
आधींम्यांरसचाखावे, पिउनिउरलेतेत्वांप्यावे;
तेणेंसंतोषामानावें, तृप्तव्हावेंनिजचित्तीं. भीमा० २
यज्ञामध्येंहेंचिविधान, केलेंसोमा[1]चेंआदा[2]न;
मागुनिकेलेंतुवांपान, त्याचेंभाननाहींका. भीमा० ३
आतांपरलोकींचेजळ, पीशिलएकटाचिकेवळ;
कैशीनाहींतुजहळहळ, मीतळमळकरितोंकीं. भीमा० ४

हे कृष्णे, त्या भीमसेनाला तूं जलांजलि दे.

**द्रौपदी—** अगे बुद्धिमतिके, मजकडे उदक आण.

**दासी—** ( उदक नेऊन देते, ) हें घ्या.

---

१ सोमरसाचें. २ ग्रहण.

द्रौपदी– ( पुढं होऊन आणि जलानें ओंजळ भरून ह्मणते, ) कोणाला जळ देऊं आधीं ?

युधि०– मी सांगतों कोणाला तें.

आर्या २७.

आधीं त्याला दे जळ गेला आतांचि जो परालोका[1];
गांधारिसह देता झाला कुंतीस जो महाशोका. २७

द्रौपदी– हे प्राणनाथा, हें दासीनें दिलेलें जळ तुह्मांस स्वर्गलोकीं पादप्रक्षालनाच्या कामीं पडो.

युधि०– हे फाल्गुनाग्रजा भीमा,

आर्या २८.

अकृतप्रतिज्ञ जरिं तूं स्वर्गा गेलासि टाकुनी देहा;
तरि अंजलिप्रियेनें[2] मुक्तकचेनें दिला तुला घे हा. २८

द्रौपदी– महाराज, उठावें लौकर. तुमचा भाऊ फार दुर गेला असेल.

युधि०– ( उजवा डोळा लवलासें दाखवितो. ) हे पांचाळी, हें सुचिन्ह सुचवितें कीं वृकोदराची भेट लौकरच होईल. असो, आतां आपण अग्नींत सत्वर प्रवेश करावा. ( उभयतां जवळ जातात. )

द्रौपदी– आहा केवढा अग्नि पेटला आहे हा !

( इतक्यांत पडद्यापलीकडे मोठा गलबला होतो. )

कंचुकी– ( घाबऱ्या घाबऱ्या येतो, ) महाराज, रक्षण करा, रक्षण करा! अहो हा खचित दुरात्मा कौरवाधम दुर्योधन रक्तानें भरलेला होत्साता हातांत भयंकर गदा घेऊन दंडधर कृतांताप्रमाणें[3] ओरडत ह्या पांचालराजतनयेला शोधीत शोधीत इकडेसच येत आहे.

युधि०– हाय हाय, दैवाची परीक्षा झाली. हारे दैवा तुझ्या दुष्टत्वाची पराकाष्ठा पाहिली. हा गांडीवधरा अर्जुना, शेवटीं तूं– ( असें ह्मणून मूर्छा पावतो. )

---

१ स्वर्गलोकास. २ द्रौपदीनें. ३ यम.

द्रौपदी— हे राजपुत्रा धनंजया, माझ्या स्वयंवरांत पण पुरवून माझा संग्रह तुवांच केला, तर ह्या महाराजांस आणि मला दासीला भेटावयाचें सोडून अगोदर प्रिय भ्रात्याच्या भेटीस गेलास हें काय ? ( असें ह्मणून मूर्छित पडते. )

युधि०— हे शिवप्रतिमल्ला[1], हे निवातकवचोद्धरणा, हे अमरशत्रुविध्वंसना, हे बदरिकाश्रमवासी नारायणसखा, हे द्रोणाचार्यप्रियशिष्या, अरे आपल्या अस्त्रशिक्षाबलांहींकरून पितामहा भीष्मास संतोषविणाऱ्या, अरे गंधर्वांनीं धरलेल्या दुर्योधनास सोडविणाऱ्या, अरे दुर्जया कर्णास मारणाऱ्या, अरे पांडुकुलकमलिनीच्या राजहंसा, हे प्रियभ्रात्या अर्जुना, हें त्वां काय केलें ?

### श्लोक ३९.

मातेसही न करितां अभिवंदनातें,
आलिंगितां न मजला पुसतां न मातें!
याही स्वयंवर वधूस न भेटतां हा,
दीर्घ प्रवास वरिलासि कसा अहाहा. ३९

कंचुकी— कायहो संकट हें! हा दुरात्मा दुर्योधन निःशंकपणें इकडेसच येत आहे. यासमयीं सर्वथा हाचउपाय योग्य दिसतो. अगे बुद्धिमतिके, ह्या द्रुपद कन्यकेला चितेच्या जवळ लौकर ने. नाहीं तर हिचा भाऊ धृष्टद्युम्न किंवा नकुलसहदेव ह्यांस तरी जाऊन लौकर सांग ह्मणजे ते येऊन परित्राण करतील. अथवा आतां कशाचें परित्राण. हे महाराज अशा संकटावस्थेंत पडले आहेत, आणि भीमार्जुनांची तर तशी गति झाली; आतां ईश्वरावांचून परित्राण कर्ता दुसरा कोणी दिसत नाहीं.

( पडद्यापलीकडे कलकल्यानंतर शब्द होतो. )

अहो स्यमंतपंचकांत संचार करणारे योधहो, रक्त मांस भक्षणानें मत्त यक्ष, राक्षस पिशाच, भूत, वेताळ, तसेच कंकगृध्रादि पक्षी, आ-

---

[1] शिवाशीं बाहुयुद्ध करणाऱ्या.

णि उलूक जंबुकादि श्वापदें यांपासून तुह्मी वांचलां आहां. तर मला पाहून तुह्मी भिऊन पळूं नका. द्रौपदी कोणे ठिकाणीं आहे तें ठाऊक असेल तर सांगा. तिच्या खुणा कोणत्या ह्मणून विचाराल तर तिचें दुसरें उपलक्षण कोणतें सांगूं ? जें प्रसिद्ध आहे तें सांगतों.

ओंव्या ४०.

तिचें पुसतां उपलक्षण, तरी सांगतों जाणा खुण;
ऊरू[1] करांचें[1] संघट्टण, ज्यानें केलें सभेंत. १
तो असेल तुह्मां अवगत, त्याच दुर्योधना देखत;
नग्न करावया अवचित, वस्त्र जीचें ओढिलें. २
दासी ह्मणूनि जी सभे नेली, जिची दुःशासनें वेणी ओढिली;
अनाथा परी दीन झाली, तीच द्रौपदी जाणावी. ३
ती आहे कोण्या ठाया, ठाऊक असेल तरी सांगावया;
भिऊं नका तुह्मीं वायां, समाधान तिचें करीन मी. ४

कंचुकी— हे याज्ञसेनी, यासमयीं खरीच तूं अनाथ झालीस. पहा तो दुष्ट दांडगा याज्ञसेनी कोठें आहे याज्ञसेनी कोठें आहे, असें विचारीत इकडे येत आहे. आतां बरीक त्या कुरुकुलाधमा दुर्योधनापासून दुर्दशा पावतेस असें दिसतें.

युधिष्ठिर— ( झटकन उठतो. ) अगे पांचाली, भिऊंनको भिऊं नको. अरे आणा माझें सज्ज धनु. अरे दुष्टा दुर्योधना. पुढें तर ये पाहूं ? गदायुद्धापासून जो तुला गर्व झाला आहे तो बाणांच्या वृष्टीनें मोडून टाकतों. अरे कुरुकुलकलंका, आणखी एक तुला सांगतों.

श्लोक ४१.

न देखतां मागधराजहंता[2], रणीं शिवाची हरिता[3] अहंता;
वांचावया धर्म समर्थ नाहीं, हरावया प्राण तुझे शरांहीं. ४१

---

१ मांड्या हात यांचें संमेलन. २ भीम. ३ अर्जुन.

( इतक्यांत सर्वांगीं रक्तानें भरलेला भीमसेन हतांत गदाघेऊन येतो.)

**भीमसे०**– ( उद्धतपणें इकडे तिकडे फिरतो. ) अरे स्यमंतपंचकांत संचार करणारे जनहो, अरे तुह्मी असे घाबरे कां होतां ?

**अभंग ४२.**

नव्हें मी राक्षस किंवा नव्हे भूत; नव्हें यम दूत कांहो भीतां. १
शत्रूच्यारक्तानें भरलें माझें अंग; केला यज्ञ सांग युद्धाचा मी. २
प्रतिज्ञासागर असतां अपार; पडलों मी पार दैवयोगें. ३
जातीचा क्षत्रिय स्वभावें क्रोधन; करूंनका मन त्रस्त[1] कांहीं. ४
रणाग्निज्वाळेंत वीरक्षय झाला; त्यामाजी वांचलां दैवेंतुह्मी. ५
अश्व गज प्रेताआड कां लपतां; कांहो ओरडतां धाकें आतां. ६
आतां भयनाहीं कोणाचें तुह्मांसी; स्वस्छ व्हा मानसीं पळूंनका. ७
पुसतों तें सांगा भिऊंनका मनीं; कोठें याज्ञसेनी आहे दावा. ८

**कंचुकी**– हे पांडुराजस्नुषे द्रौपदी, ऊठ ऊठ सत्वर, यासमयीं लौकर चितेंत प्रवेश करशील तर बरें होईल.

**द्रौपदी**– ( झटकर उठते, ) अझून ही चितेंत प्रवेश म्यां कसा न करावा ? ( चितेच्या जवळ जाते. )

**युधि०**– कोण आहेरे तेथें, माझा तीरकमठा आणि भाता इकडे आण. कोणीच चाकर माणूस जवळ नाहीं काय ? असो, नाहीं धनुष्य तर नाहीं. बाहुयुद्धानेंच ह्या दुष्टाला वळकट मिठी मारून ह्या अग्नींत ढकलून देतों. ( कमर बांधतो. )

**कंचुकी**– अगे बाई द्रौपदी, दुःशासनानें ओढलेले हे तुझे केंस तुझ्या डोळ्यांवर येतात, यासाठीं आतां तूं तरी आपल्या हातांनीं ते बांध. याउपर तुझ्या दुःखाचा प्रतीकार कोणी करील अशी आशा उरली नाहीं. आणि चितेंत प्रवेश कर लौकर.

**युधि०**– नको नको. तो दुरात्मा कौरवाधम मेल्यावांचून तूं केश बांधूं नको.

**भीमसेन**– ( दुरून हाक मारून, ) नकोगे नको पांचाली, मी जिवंत अ-

---

१ भयभीत.

सतां दुःशासनानें ओढलेलीवेणी तूं आपल्या हातांनीं बांधूं नको.

**द्रौपदी०**– ( भयानें इकडे तिकडे फिरते. )

**भीमसेन**– हे भयशीले उभीरहा, उभीरहा, कोणीकडे जातेस ? ( असें ह्मणून तिचे केश धरावयास जवळ जातो. )

**युधि०**– ( दुर्योधन समजून भीमास मिठी मारतो, ) अरे दुष्टा दुर्योधना, भीमार्जुनांस मारणारा तो तूंच ना ?

श्लोक ४३.

त्वां शैशवापुनि सदा अपराध केले,
मत्तें तुवां मदनुज प्रशमासि नेले;
माझ्या भुजीं गवसलासि अतां जिवंत,
जाशी न पाउलहि मी करितों त्वदंत. ४३

**भीमसेन**– ( मनांत ) अहो हें काय ! दुर्योधनाच्या शंकेनें धर्मराजदादा मला निर्दयपणें आलिंगितात ! दादा हें काय ? कृपा करा, सोडा मला.

**कंचुकी**– ( जवळ जाऊन हर्ष पावून ह्मणतो, ) महाराज, तुह्मी चकलां, भलतेंच समजलां. अहो हा आपला आयुष्मान् युवराजा भीमसेन. पहा दुर्योधनाच्या रक्तानें याचें सर्वांग वस्त्रासुद्धां लाल भडक झालें आहे. तेणेंकरून याचें स्वरूप भयंकर झाल्यामुळें ओळखूं आलें नाहीं. पण खचीत भीमसेनच हा. आतां तुह्मी कांहीं संदेह मनांत आणूं नका.

**दासी**– ( द्रौपदीस आलिंगून, ) हे देवी, पहा तुझा नाथ आपली प्रतिज्ञा शेवटास नेऊन तुझ्या वेणीचें संहरण करण्याकरितां तुला सोधीत सोधीत आला आहे.

**द्रौपदी**– कायगे तूं मिथ्या भाषणानें माझें समाधान करावयास पाहातेस !

**कंचुकी**– महाराज, तुह्मी चकतां बरें चकतां. अहो हा दुर्योधन नव्हे.

**युधिष्ठिर**– जयंधरा, खरेंच कायरे हा माझा वैरी दुर्योधन नव्हे !

---

१ बाल्यापासून-

**भीमसेन—** हे आर्या, धर्मराजा, अजातशत्रो, भीमार्जुनगुरो, अझून तो मुडदार दुर्योधन कोठून राहाणार. तो दुष्ट पांडुकुलवैरी म्यां केव्हांच संपविला. आतां त्याची कथा कशास पाहिजे.

श्लोक ४४

भूपृष्ठीं देह त्याचा रगडुनि रुधिरें माखिलें भीमगात्र,
लक्ष्मीभूमीस झाले सहजचि गुरुचे आश्रया पाद पात्र;
भृत्यां मित्राप्तयोधांसह कुरुकुल तें जाळिलें म्यां अशेष,
तूं ज्या नामास घेशी क्षितिवर उरलें तेवढें मात्र शेष.४४

**युधि०—** (हळूच भीमसेनाला सोडून डोळे पुसून त्याजकडे निरखून पाहातो.)

**भीमसेन—** (त्याच्या पायांवर मस्तक ठेवून,) महाराजांचा जयजयकार असो.

**युधिष्ठिर—** वत्सा भीमसेना, पाण्यानें माझे डोळे भरले होते यामुळें म्यां तुझा मुखचंद्र पाहिला नाहीं तर आतां खरेंच सांग तूं जिवंत आहेस काय? आणि तो किरीटी खुशाल आहेना?

**भीमसेन—** ज्याचे सकल शत्रु नष्ट झाले असा तूं राजा असतां भीमार्जुनांच्या जिवास भय कशाचें? आर्या, भीम अर्जुन जिवंत आहेत बरें.

**युधि०—** (पुन्हा भीमास प्रेमानें दृढ आलिंगितो.)

श्लोक ४५ पूर्वार्ध.

रिपूचें राहूंदे निधन मज हें सांग शतदा,
प्रियभ्रातामाझा वकरिपुचि तूं जो धरिगदा;

**भीमसेन—** आर्या तोंच मी.

**युधि०—** (उत्तरार्ध ह्मणतो.)

जरासंधोराचें भुज समरिं जो पाटन करी,
खरें कारे तो तूं वद वद पुन्हा नर्म नकरीं.४५

**भीमसेन—** हो हो तोच मी भीम. पण महाराज, आपण मला क्षणभर

सोडावें. कांहीं कर्त्तव्य आहे.

युधि०— वत्सा आतां कोणतें कार्य उरलें आहे?

भीमसेन— महाराज, मुख्य कार्य तेंच उरलें आहे. कोणतें ह्मणाल तर, दुःशासनानें ओढलेली पांचालीची वेणी, दुर्योधन दुःशासन यांच्या रक्तानें भरलेल्या हातांनीं घालावयाची आहे. तें कार्य अगोदर केलें पाहिजे.

युधि०— हो हो, खरेंच, वत्सा, जा जा लौकर, त्या दुःखभागिनीची वेणी बांधून वेणीसंहारमहोत्सवाच्या सुखाचा अनुभव घे.

भीमसेन— अगे पांचालराजतनये, तुझ्या दैवयोगानें शत्रुकुलाचा क्षय झाला, ह्मणून तूं माझ्या दृष्टीस पडलीस. आतां स्वस्थ हो.

द्रौपदी— (जवळ जाऊन) प्राणनाथाचा जयजयकार असो. (भीमाचें भयंकर रूप पाहून भयानें मागें सरते)

भीमसेन— अगे राजपुत्री, मला पाहून तुला इतका त्रास कां झाला? पुरे आतां भिऊं नको. तूं मला ओळखलें नाहीं काय? अगे मी भीमसेन आपली प्रतिज्ञा शेवटास नेऊन तुझें समाधान करावयास आलों. पहा,

### श्लोक ४६.

ज्यानें ओढून नेलें तुज नृपतिसभे त्याच दुःशासनाचीं,
जीं रक्तें लिप्त झालीं शिउनि ममकरीं तीं पहा दुर्जनाचीं;
कांते त्याही कुरूच्या बघ अधिपतिचें रक्त साऱ्या ममांगीं;
हें झालें लिप्त तूझ्या परिभव जनिता अग्निच्या शांतिलागीं. ४६

अगे बुद्धिमतिके, आतां ती भानुमती कोठें आहे? जी पांडवांच्या स्त्रियेस हांसत होती? अगे याज्ञसेनी?

द्रौपदी— काय आज्ञा प्राणनाथा?

भीमसेन— तुला स्मरण आहे काय, जें मी पूर्वी बोललों होतों त्यानें

( पूर्वोक्त श्लोक ह्मणतो )

जी ही गदा ममकरांत सदैव नाचे,
घातें इच्या चुरिन ऊरु सुयोधनाचे;
रक्तें तयांतिल विलेपिन मी स्वपाणी,
त्यांहींच बांधिन सखे तव मुक्तवेणी.

**द्रौपदी**– प्राणनाथा, तें मी केवळ स्मरतें इतकेंच नाहीं. तर त्याचा अनुभव ही घेत आहें.

**भीमसेन**– बरें तर, प्राणप्रिये, धृतराष्ट्राच्या वंशास कालरात्रीसारखी संहार करणारी जी दुःशासनानें ओढून विसकटलेली तुझी वेणी, ती म्यां बोलल्याप्रमाणें बांधिली, परंतु चांगली झाली नाहीं. ह्मणून आतां त्वां वेणी नीट घालावी.

**द्रौपदी**– प्राणनाथा, वेणी घालण्याचा प्रकार आलीकडे मी अगदीं विसरलें. आतां प्राणनाथाच्या प्रसादानें पुनः शिकेन. बुद्धिमतिके, आतां माझी वेणी घाल नीट.

**दासी**– आज्ञा बाईसाहेब ( वेणी घालिते. ) ( इतक्यांत पडद्यापलीकडे शब्द होतो. )

श्लोक ४७.

ज्याच्या मोक्षेंचि झाले प्रकुपित सहसा अंश पांचां सुरांचे,[1]
त्यांनीं सारेच केले शिथिल कच बळें कौरवांतः पुरांचे;
कृष्णेचा केशपाश प्रकुपित यमसा केतु जो कौरवांतें,
तो झाला बद्ध राहो निधन नृपतिच्या स्वस्ति होवो कुलातें. ४७

**युधिष्ठि०**– हे देवी पांचालीं. पहा तुझ्या वेणीसंहारमहोत्सवाचें अभिनंदन आकाश संचारी सिद्धजन करीत आहेत ( इतक्यांत कृष्णार्जुन उभयता येतात. )

( दोघे धर्मराजाजवळ जातात. )

---

१ अंक १ श्लोक २७.

कृष्ण— ज्याचे सर्व शत्रु नष्ट झाले, जो पांडुकुलकमलांस चंद्रमा, असा महाराज युधिष्ठिर अनुजांसहवर्तमान विजयी असो.

अर्जुन— आर्या, जय असो. ( नमतो. )

युधिष्ठि०— ( दोघांस पाहून ) अहो हा भगवान् पुंडरीकाक्ष! आणि हा वत्स अर्जुन ! हे भगवन्, साक्षात् पुराणपुरुष नारायण तूं आणि हा तुझा सखा नर हे तुह्मी उभयतां माझ्या विजयाची इच्छा करितां मग मला विजय न होईल तर दुसरें काय होणार ?

श्लोक ४८.

श्रुतिशिर जगदात्मा तूं असें तूं जगातें,
असासि उदयनाशस्थानहेतू जगातें;
अखिल तुज परेशा चिंतितां दुःख जावें,
कुशल मग जगाचें दर्शनें कां न व्हावें. ४८

( अर्जुनास आलिंगून, ) वत्सा मला गाढ आलिंगन दे.

कृष्ण— राजा, हे पाहा भगवान् व्यास वाल्मीकि जामदग्न्य जाबालि प्रभृति महर्षि, आणि नकुल सहदेव सात्यकि प्रमुख सेनापति, तसेच यादव मत्स्य मागधकुलोत्पन्न राजकुमार सर्व तुला मंगलाभिषेक करावा असें कल्पून स्कंधावर तीर्थजलांनीं परिपूर्ण कलश घेऊन आले आहेत. आणि तुला मंगलाभिषेक करावयास इच्छिताहेत. आणि त्या दुष्ट चार्वाकानें तुझी प्रतारणा करून तुला फार दुःख शोकांत घातलें असें ऐकून अर्जुनास घेऊन सत्वर मी तुझ्या दर्शनास आलों.

युधि०— काय चार्वाकानें अशी ठकबाजी केली काय? (रोषानें) कोठें आहे तो धार्तराष्ट्रसख राक्षसाधम, ज्यानें मला चिंतासागरांत लोटलें?

श्रीकृष्ण— नकुलानें त्या दुष्टास धरून बद्ध करून टाकिलें आहे. आता महाराजा युधिष्ठिरा, या उपर कोणती इच्छा आहे सांग.

युधि०— हे पुंडरीकाक्षा पुराणपुरुषा नारायणा, आपण प्रसन्न झालां अ-

सतां काय नाहीं देणार. मी तर पुरुष साधारणबुद्धिनेंच संतुष्ट आहें. याउपर मागण्यास मी समर्थ नाहीं.

श्लोक ४९

केला शत्रुकुलक्षय द्रुपदजा निस्तीर्णदुःखा करा,
आह्मां अक्षत रक्षिलें सदयतूं भक्ताभिमानी खरा;
हे देवा पुरुषोत्तमा पुससि तूं अत्यादरें कीं मला,
आतां याहुनि काय अन्य उरलें मागूं प्रसन्नातुला.४९

आर्या ५०

आह्मां उपकारांचा सागर लंघावया नसे नांव;
सर्व वदान्यांमध्यें घ्यावें पहिलें सदा तुझें नांव.५०

आणखी आर्या. ५१

उपकारकिति वदावा आह्मांरोपांसि तूं खरें आळें;
तूं माय बाप आह्मां देवा आह्मी तुझीं असों बाळें.५१

(भरताचें वाक्य.)

तथापि भगवान् प्रसन्न होऊन देणार तर हें द्यावें.

पद ५२

देतां आह्मां तरि हें द्यावें, दीनादासापदरीं घ्यावें. ध्रु०
अकृपणमतिहा लोक असावा; पुरुषायुषवरि येथ वसावा. १
विद्वानावरि प्रीति करीसा; भूपमिळावा आह्मां ऐसा. २
अकपट मित्र मिळावा देवा, कोणाचा ही नघडो हेवा. ३
साधुसमागम नित्य घडावा; कलंक मतिचा सर्व झडावा. ४
सन्मार्गीं मन सतत वळावें; अंतर्गत तम सर्व जळावें. ५
प्रभुच्या चरणीं भक्ति असावी; द्वैतासोडुनि पूर्ण ठसावी. ६

१ लोक रीतीनें. २ द्रौपदी. ३ दुःखपारंगता. ४ करित/ झाली.

अंतीं उत्तम गति ही व्हावी; हेच शिराणी दासा द्यावी. ७
ग्रंथ कवीचा रसें भरावा; आशीर्वादें पूर्ण करावा. ८

श्रीकृष्ण— असेंच असो.

( असें बोलून सर्व निघून जातात. )

---

साहावा अंक समाप्त.

---

साहाव्या अंकांतील पद्यें.

| श्लोक. | आर्या. | ओंव्या. | अभंग. | दिंड्या. | साक्या. | पदें. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | १० | ४ | ८ | १० | ८ | ५ | ७७ |

---

वेणीसंहारनाटकग्रंथसमाप्त.

# ग्रंथ कर्त्यांची प्रार्थना.

श्लोक १.

वेणीसंहरणाख्य नाट्य कविनें केलें असे संस्कृतीं,
तें म्यां पाहुनियां तसें उतरिलें भाषांतरीं प्राकृतीं;
तें कृष्णें रसवित्तमें बुधवरें अत्यादरें शोधिलें,
कीं तेणें रसिकांचिया निजरसें चित्तासि संरोधिलें. १

श्लोक २.

सौवर्णपात्रीं सुरसासि गोडी,
जी तीहुनी पर्णपुटीं न थोडी;
परंतु तें दुर्लभ पात्र ज्याला,
ती भ्रांत सारीच मिळेल त्याला. २

श्लोक ३.

आहे समर्थ तरु पुष्पफलादि द्याया,
सद्यः सुखावह तयाहुनि फार छाया;
छायाच मूल कृति सत्तरुची गणावी,
तत्याहुनी विकृति भिन्न कशी ह्मणावी. ३

आर्या ४.

हा केला ग्रंथ महा कवि प्रसादें चि परशुरामानें;
यावद्बुद्धिबलानें विद्वत्सद्रसिकतोषकामानें. ४

आर्या ५.

हंसजसे उदकातें टाकुनि घेतात दुग्धमात्र कृती;
तैसेच दोषटाकुनि गुणकण घेवोत कौतुकें सुकृती. ५

## सर्वं अंकांतील एकंदर पद्यें.

| अंक | श्लो० | आ० | ओं० | दिं० | सा० | पदें. | अभं० | कटा० | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३ | १२ | १७ | ० | ० | २ | ० | ० | ४४ |
| २ | २१ | ३ | १३ | २ | १० | ० | ० | १ | ५० |
| ३ | ३० | १५ | १३ | ० | २ | २ | ० | ० | ६२ |
| ४ | ११ | ४ | १ | ० | ० | २ | ० | ० | १८ |
| ५ | २७ | १५ | ० | ० | १० | १ | ० | ० | ५३ |
| ६ | ३२ | १० | ४ | १० | ८ | ५ | ८ | ० | ७७ |
| | १३४. | ५९. | ४८. | १२. | ३०. | १२. | ८. | १. | ३०४. |